# महापशुधन वार्ता

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
पशुधन हिताय: बहुजन सुखाय:

वर्ष १ ले, अंक १० वा, फेब्रुवारी-२०२६



प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

डिजीटल ई-मासिक

# महापशुधन वार्ता

वर्ष १ ले, अंक १० वा

**मुख्य संपादक**

**डॉ. देवेंद्र सुरेश जाधव**
सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
(पशुधन व नियोजन) पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-६७

**सहसंपादक**

**डॉ. प्रशांत दयाराम भड**
उपआयुक्त पशुसंवर्धन, तथा सदस्य सचिव
महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन
प्राधिकरण, पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र
राज्य, औंध, पुणे-६७

**संकलन, संपादन, मांडणी व सजावट:**

**श्री. संतोष शिवराम पवार,** पशुधन पर्यवेक्षक
**'महापशुधन वार्ता' कक्ष,**
पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :**

**महापशुधन वार्ता कक्ष**
**पसं-१३, पशुसंवर्धन आयुक्तालय,**
**महाराष्ट्र राज्य,**
**औंध, पुणे - ४११०६७**

**020-25690484**

Email:
mahapshudhanvarta@gmail.com

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११०६७

## पशुसंवर्धन विभाग

**मागील अंक वाचण्यासाठी भेट द्या**

dahd.maharashtra.gov.in

**अथवा स्कॅन करा**

या अंकातील लेखांमध्ये व्यक्त करण्यात आलेल्या मतांशी संपादक व पशुसंवर्धन विभाग सहमत असेलच, असे नाही ( पुणे न्यायकक्षेत ).



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री

# मा. अजितदादा पवार

यांना भावपूर्ण श्रद्धांजली

(दि. २४ जुलै, १९५९ ते २८ जानेवारी, २०२६)

“प्रगत व उन्नत गावं महाराष्ट्राच्या विकासात खूप मोठे योगदान देऊ शकतात आणि गावांना स्वयंपूर्ण बनविण्याची क्षमता पशुसंवर्धनात आहे. ग्रामीण अर्थचक्र गतिमान करणारा हा पशुसंवर्धनाचा व्यवसाय आपल्याला जोपासावा लागेल, वाढवावा लागेल.” **- मा. अजितदादा पवार**

महापशुधन वार्ता

# पशुसंवर्धनाच्या विकासात मा. अजितदादा पवार यांच्या दूरदृष्टीचा अविष्कार



महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या पशुसंवर्धन क्षेत्राला आधुनिकतेची जोड देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या ध्येयाने मा.उपमुख्यमंत्री दिवंगत श्री. अजितदादा पवार यांनी गेल्या काही वर्षांत अनेक धाडसी पावले उचलली. पशुसंवर्धनाच्या व्यवसायाला केवळ 'जोडधंदा' न मानता त्याला 'कृषी समकक्ष दर्जा' मिळवून देण्यात त्यांचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण राहिले. पुण्यातील औंध येथील जागतिक दर्जाच्या सुविधांची उभारणी हे त्यांच्या दूरदृष्टीचे उदाहरण आहे. प्राण्यांपासून मानवाकडे संक्रमित होणाऱ्या 'झुनोटिक' रोगांचा (उदा. एव्हियन इन्फ्लुएन्झा) धोका लक्षात घेता राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून ७५.६१५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. यातून औंध, पुणे येथे BSL-II आणि BSL-III (जैव सुरक्षा स्तर ३) प्रयोगशाळांची उभारणी करण्यात आली आहे. यामुळे रोगांचे वेळेत निदान होऊन पशुपालकांचे आर्थिक नुकसान टळणार आहे, तसेच प्रयोगशाळेत काम करणाऱ्या तंत्रज्ञांच्या आरोग्याचीही सुरक्षा सुनिश्चित झाली आहे. विशेष म्हणजे या प्रयोगशाळांच्या उभारणीचे भूमीपूजन व उद्घघाटन, अशा दोन्हीबाबी अजितदादा पवार यांच्याच हस्ते पार पडल्या.राज्यातील पाळीव प्राणी आणि पक्ष्यांच्या लसीकरणासाठी औंध येथील पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था ही एकमेव शासकीय संस्था आहे. सध्या या विभागात 'फरमेंटर' तंत्रज्ञानाचा व 'आदर्श उत्पादन पद्धती'(cGMP) मानकांचावापर करून उत्पादन केले जाते. या संस्थेसमिळालेल्या मानांकन पत्राचे अनावरणही अजितदादा पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

पुणे आणि पिंपरी-चिंचवडसारख्या वाढत्या शहरीकरणामध्ये पाळीव प्राण्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर होता. हे लक्षात घेऊन अजितदादांनी दोन्ही महापालिकांकडून ५ कोटींचा निधी व जिल्हा वार्षिक योजनेतून ४.७८ कोटींचा निधी मंजूर करून दिला. आधुनिक तंत्रज्ञान, भव्य इमारती आणि संशोधनासाठी कोट्यवधींचा निधी उपलब्ध करून देऊन अजितदादा पवार यांनी पशुसंवर्धन विभागाच्या आधुनिकीकरणात मोलाचे योगदान दिले.

औंध येथील या संस्था आता केवळ राज्याच्याच नव्हे, तर देशाच्या पशुवैद्यकीय क्षेत्रात मैलाचा दगड ठरत आहेत.अजितदादांच्या दूरदृष्टीमुळे व पशुसंवर्धन क्षेत्राला कृषी समकक्ष दर्जा मिळाल्यामुळे कृषी क्षेत्राप्रमाणेच सवलती व प्राधान्य मिळणे सुलभ झाले आहे. 'शेतकऱ्याच्या गोठ्यातील पशुधन सुरक्षित, तरच शेतकरी सुरक्षित' ही त्यांची भूमिका प्रशासकीय निर्णय घेताना नेहमीच पथदर्शी ठरणार आहे. लोकविकासाच्या स्वप्नांना प्रत्यक्ष कृतीचे बळ देऊन गतिमान प्रशासनासाठी नेहमीच आग्रही असणाऱ्या या लोकनेत्याला

**पशुसंवर्धन विभागामार्फत भावपूर्ण आदरांजली!**

## या अंकात





- महाराष्ट्राच्या परिवर्तनाची मुहूर्तमेढ: मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा '१०० दिवसांचा सुधारणा कार्यक्रम-
- पशुपालनाची नवी दिशा, परळी प्रदर्शनाची नवी आशा!
- पशुपक्षी प्रदर्शनातून उलगडेल आर्थिक विकासाचे तत्व, पशुपालक जाणून घेतील'पंचसूत्री'चे महत्त्व!
- शाश्वत पशुसंवर्धन निर्णय गतिमान, समृद्ध पशुधन शेतकऱ्यांचा अभिमान
- महापशुधन एक्स्पो-२०२६ लोगोचे मा. मुख्यमंत्री, यांचे हस्ते अनावरण
- महापशुधन एक्स्पो-२०२६ तयारीचा मंत्री पंकजा मुंडे यांनी घेतली आढावा
- मंत्री पंकजा मुंडे यांना अजिंक्य डी.वाय.पाटील विद्यापीठाची मानद डॉक्टरेट(डी.लिट) पदवी प्रदान
- दुग्ध व्यवसायातून विदर्भाच्या प्रगतीला नवी दिशा,'ॲडव्हान्टेज विदर्भ'मधील सेमिनारला मोठा प्रतिसाद
- जपानमधील सागा प्रांताचे गव्हर्नर यामागुची योशिनोरी यांनी घेतली मा. मंत्री पंकजा मुंडे यांची भेट
- पशुसंवर्धन आयुक्तालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा
- सर्वोत्कृष्ट गोशाळांना 'शुद्ध देशी गोवंश सन्मान पुरस्कार' प्रदान
- केंद्रिय पशुसंवर्धन आयुक्तपदी प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. बी. महेश्वरप्पा नवीना यांची नियुक्ती
- पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्थेच्या बळकटीकरणासाठी, मा. आयुक्त पशुसंवर्धन यांचेकडून प्रकल्पाचा आढावा
- पशुसंवर्धन आयुक्तांकडून मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र, खडकीची पाहणी
- पशुसंवर्धन विभागात 'मोबाईल डायग्नोस्टीक लॅबोरेटरी व्हॅन' दाखल

दुधनी येथील सिद्धरामेश्वर महायात्रेत जातिवंत खिल्लार जनावरांचे प्रदर्शन

- जळगाव जिल्हा प्रशासनद्वारा आयोजित खान्देश कृषी संस्कृती व पशु प्रदर्शनी महोत्सवाला शेतकरी-पशुपालकांचा प्रतिसाद
- कोडोलीच्या सुपुत्राचा राष्ट्रीय स्तरावर गौर
- ३ फेब्रुवारीपासून लाळखुरकत रोगप्रतिबंधक लसीकरणाची आठवी फेरी
- पशुपालन क्षेत्रासाठी मोठी घोषणा: पशुवैद्यकीय पायाभूत सुविधांच्या विकासाला सरकारचे प्राधान्य
- पडेगाव येथे ३ दिवसीय शेळीपालन प्रशिक्षण संपन्न, १२० लाभार्थ्यांनी गिरवले आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे
- रांजणी प्रक्षेत्रातून १७.७० मेट्रिक टन मुरघासाची विक्री
- गाढवांसाठी लसीकरण, जंतनिर्मूलन व आरोग्य तपासणी शिबिर
- जरोडा तांडा येथे पशुपालनविषयक जनजागृती अभियान संपन्न
- माध्यमांनी घेतलेली दखल
- पशुधनाच्या आरोग्याची अग्रदूत: पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था (IVBP), औंध, पुणेराष्ट्रीय पशुधन प्रणाली

- पशुधनसंपन्न महाराष्ट्र
- ओळख पशुधनाची: मराठवाडी म्हैस
- पोल्ट्री फार्म्ससाठी जैवसुरक्षा उपाययोजना
- पशुआहाराची दशसुत्री
- गाभण गायीचे संगोपन व वितांना घेण्याची काळजी
- गायी-म्हशींतील कासदाह
- अशी घ्या नवजात वासरांची काळजी
- निकृष्ट चाऱ्यावर युरिया प्रक्रिया
- अंधश्रद्धेला सोडा, विज्ञानाची कास धरा!




१३ - १५ फेब्रुवारी, २०२६
महा पशुधन एक्स्पो
परळी वैजनाथ

# महाराष्ट्राच्या परिवर्तनाची मुहूर्तमेढ

## मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा '१०० दिवसांचा सुधारणा कार्यक्रम'

दि. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचे राज्याचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. 'प्रशासकीय कामकाजाचा वेग वाढवणे व प्रशासकीय कामात पारदर्शकता आणणे' या मुख्य उद्देशाने त्यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर लगेचच १०० दिवसांचा सुधारणा कार्यक्रम जाहीर केला. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या फाइल्सचा निपटारा करून प्रशासनात 'डिलिव्हरी ओरिएंटेड' संस्कृती निर्माण करणे, भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी 'सेवा हक्क कायदा' व 'ई-टेंडरिंग' प्रणालीची निर्मिती १०० दिवसांच्या सुधारणा कार्यक्रमांतर्गत करण्यात आली. या उपक्रमांमुळे प्रशासकीय कामकाजात गतिमानता व पारदर्शकता निर्माण होऊन प्रशासन व लोक यांतील संवादाची पातळी निश्चितच उंचावली.

१०० दिवसांच्या सुधारणा कार्यक्रम अंतर्गत 'जलयुक्त शिवार' सारख्या योजनांनी विकासाला लोकचळवळीचे स्वरूप दिले, ज्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत विश्वासाचे वातावरण निर्माण झाले. 'मेक इन महाराष्ट्र' अंतर्गत परवानग्यांचे सुलभीकरण केल्यामुळे जागतिक कंपन्यांचा महाराष्ट्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. थोडक्यात, हा कार्यक्रम म्हणजे केवळ प्रशासकीय बदल नसून, राज्याला डिजिटल, गतिमान व पारदर्शक कारभाराकडे नेणारा एक पायाभरणीचा टप्पा होता.

मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या अजेंड्यातील सर्वात महत्त्वाचा व क्रांतिकारी टप्पा म्हणजे 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश'. सामान्य नागरिकांना सरकारी कार्यालयांत चकरा माराव्या लागू नयेत आणि विहित वेळेत सेवा मिळावी, यासाठी हा कायदा आणला गेला. जन्म-मृत्यूचे दाखले, सात-बारा उतारा, उत्पन्न प्रमाणपत्र यांसारख्या सेवा वेळेत न मिळाल्यास संबंधित अधिकाऱ्यावर दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद यात करण्यात आली. यामुळे 'लाल फितीचा कारभार' कमी होऊन प्रशासनात उत्तरदायित्व निर्माण झाले.

मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्या १०० दिवसांत 'जलयुक्त शिवार अभियान' या त्यांच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची घोषणा केली. नदी पुनरुज्जीवन, ओढे खोलीकरण, सिमेंट साखळी बंधारे व शेततळ्यांच्या माध्यमातून पावसाचे पाणी जमिनीत जिरवण्यावर भर दिला गेला. हे अभियान केवळ सरकारी न ठेवता त्यात लोकसहभाग अनिवार्य केला. यामुळे राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला उभारी मिळण्याची आशा निर्माण झाली. शासकीय कामात मानवी हस्तक्षेप कमी करण्यासाठी व भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी 'aaplesarkar.maharashtra.gov.in' या पोर्टलची घोषणा केली.




१०० दिवसांच्या आत जास्तीत जास्त शासकीय सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. सामान्य जनतेला थेट मुख्यमंत्र्यांकडे तक्रार नोंदवण्यासाठी 'मुख्यमंत्री तक्रार निवारण कक्ष' सक्रिय करण्यात आला. औद्योगिक गुंतवणुकीत महाराष्ट्राचे अव्वल स्थान टिकवून ठेवण्यासाठी त्यांनी 'मेक इन महाराष्ट्र' ही संकल्पना मांडली. नवीन उद्योग सुरू करण्यासाठी लागणाऱ्या परवान्यांची संख्या ७६ वरून २५ पर्यंत कमी करण्याचा निर्णय पहिल्या १०० दिवसांत घेण्यात आला. केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्यातील शहरांचा कायापालट करण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला.

भ्रष्टाचाराविरुद्ध कठोर पावले उचलत १०० दिवसांच्या सुधारणा कार्यक्रमांतर्गत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला अधिक अधिकार देऊन अनेक बड्या प्रकरणांची चौकशी करण्याचे आदेश दिले गेले. सर्व शासकीय कंत्राटांसाठी ३ लाख रुपयांवरील कामांना ई-टेंडरिंग अनिवार्य केले, ज्यामुळे कंत्राटदारीमध्ये अधिक पारदर्शकता निर्माण झाली. मुंबई व पुण्यासारख्या शहरांतील घरांचा प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी 'म्हाडा' व 'सिडको' च्या कार्यपद्धतीत सुधारणा केल्या. रखडलेले पुनर्विकास प्रकल्प मार्गी लावण्यासाठी विशेष धोरण आखले गेले.

### आधुनिक प्रशासनाची नवी ओळख, सक्षम कर्मचारी, सशक्त शासन

देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखले जाणारे महाराष्ट्र राज्य मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मार्गदर्शनाखाली सुशासन आणण्यासाठी कार्यरत आहे. सुशासनाचाच एक भाग म्हणून सहा लाखांहून अधिक शासकीय कर्मचाऱ्यांचा नियुक्ती ते सेवानिवृत्तीपर्यंतचा प्रवास सुकर, सक्षम व अधिक विश्वासार्ह बनवण्यासाठी शासनाने 'महा-आस्था' या नावाने डिजीटल युगातले स्मार्ट प्रशासनाचे कार्यान्वयन सुरु केले आहे. सद्यस्थितीत स्वतंत्ररित्या कार्यरत असलेल्या सेवार्थ, महापार निवृत्ती वाहिनी यासारख्या प्रणालींचे एकाच डिजीटल छताखाली एकात्मिकरण करण्यात येत आहे. सुमारे ९० वर्षांच्या कार्यपद्धतीनुसार जुने, हाताने लिहिलेले सेवा अभिलेख आता डिजीटल स्वरुपात रुपांतरीत होतील. कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक प्रलंबित न्यायालयीन व इतर प्रकरणांची संख्या कमी होईल व कार्यक्षमता वाढेल.

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत सेवाविषयक बाबींच्या डिजीटल पोर्टलवर सेवापुस्तके अद्यावत करणे व अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक तपशीलवार माहितीचे ऑन बोर्डिंग करणे यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले. शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत प्रदान करण्यात येणारे सेवाविषयक लाभ (उदा. स्थायित्व प्रमाणपत्र, सेवेतील नियमित दिनांक, वेतनविषयक लाभ इ.) तसेच सेवानिवृत्तीविषयक लाभ (उदा. सेवानिवृत्ती वेतन, उपदान, रजा रोखीकरण इ.) वेळेवर व सुलभरित्या देणे शक्य व्हावे, यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांच्या 'नियुक्ती ते सेवानिवृत्ती' पर्यंतच्या सेवा एकाच प्रणालीशी संलग्न करण्याचा शासनाचा मानस आहे. याकरिता, सामान्य प्रशासन विभागामार्फत ई-मानव संसाधन व्यवस्थापन प्रणाली (e-HRMS) (महा-आस्था Maharashtra Advanced Administrative System for Transparent Human Resource Administration- Maha-AASTHA) विकसित करण्यात येत आहे.




# १०० दिवसांचा सुधारणा कार्यक्रम: पशुसंवर्धन विभागाचा दुहेरी सन्मान

शासनात लोकाभिमुखता आणणारा '१०० दिवसांचा सुधारणा कार्यक्रम' या उपक्रमाचा पहिला टप्पा यशस्वीपणे पार पडला व पहिल्या टप्प्यात १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या शासनाच्या पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाला दुहेरी सन्मान प्राप्त झाला. मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांना अभिनंदन पत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे व प्रभारी मुख्य सचिव मा. राजेश कुमार यांचेसह मंत्रीमंडळातील सदस्य व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पशुसंवर्धन विभागाने '१०० दिवसांचा सुधारणा कार्यक्रम' या उपक्रमातंर्गत मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयां कार्यालयांसाठी ७ कलमी कृति आराखडा तयार केला. यामध्ये विभागाचे संकेतस्थळ अद्यावतीकरण, सुकर जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारींचे निवारण, कार्यालयीन सोयीसुविधा, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी व गुंतवणूक प्रसार या बाबींचा समावेश होता. या लक्ष्यांकित बाबींची १०० टक्के पूर्तता करण्यासोबतच पशुसंवर्धन विभागाने ई-ऑफिस प्रणालींतर्गत आवश्यक सर्व सुविधा कार्यान्वित केल्या. याशिवाय अधिकारी-कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कार्यालयीन व क्षेत्रीय कामकाजासाठी कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करण्यावरही भर देण्यात आला.






# पशुपालनाची नवी दिशा, परळी प्रदर्शनाची नवी आशा!

> परळी ही प्रभु वैजनाथांची भूमी आहे. या पावनभूमीत १३ ते १५ फेब्रुवारी, २०२६ दरम्यान 'महापशुधन एक्स्पो-२०२६' चे आयोजन आहोत. आपल्या शेतकऱ्यांच्या दारात देशातलं सर्वोत्तम तंत्रज्ञान व जातीवंत पशुधन दिसलं पाहिजे, अशी यामागची संकल्पना आहे. हे देशातील पशुसंवर्धन विभागाचे सर्वात मोठे प्रदर्शन असणार आहे, जे जवळपास ३२ एकरांच्या भव्य परिसरात होणार आहे. याचा मुख्य उद्देश हाच आहे की, आपल्या शेतकऱ्यांना व बेरोजगारांना दूध, मांस, अंडी उत्पादनाची नवीन माहिती मिळावी व त्यातून त्यांच्या हाताला काम मिळून त्यांचा आर्थिक विकास व्हावा. या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करणं हाच यामागचा व्यापक संदेश आहे.

देशाचा आर्थिक कणा हा शेतीवर अवलंबून आहे. शेतकरी शेतीबरोबरच पशुपालनसुद्धा करतात. अशावेळी या व्यवसायाची अधिक चांगली ओळख मराठवाड्यातील शेतकऱ्यांना व्हावी, त्यांच्या पशुपालनामध्ये अधिक व्यावसायिकता यावी, त्यांना पशुपालनातील फायद्याचे गणित अधिक चांगल्याप्रकारे कळावे आणि तरुण पिढीला पशुपालन हा शाश्वत रोजगार आहे, याचे महत्त्व कळावे म्हणून हा महापशुधन एक्सपो आयोजित करण्यात आलेला आहे. जे अगोदरच या व्यवसायात आहेत, त्यांना व्यवसायाची नवीन दालने परिचित व्हावी, तसेच उपलब्ध व्हावी हासुद्धा या एक्सपोचा उद्देश आहे.

१३ - १५ फेब्रुवारी, २०२६
महा पशुधन एक्स्पो
परळी वैजनाथ

आजपर्यंत आपण पारंपरिक पद्धतीने पशुपालन करत आलो आहोत. पण या प्रदर्शनात देशातील विविध राज्यांतून १०० हून अधिक जातींचे पशुधन व ६५ प्रकारचे पशुपक्षी येणार आहेत. हे बघून आपल्या शेतकऱ्याचा दृष्टिकोन बदलेल. कमी उत्पादनक्षम पशुधन सांभाळण्यापेक्षा त्यातून 'उत्पादन खर्च कमी करून, नफा कसा वाढवायचा?', हे तंत्र त्यांना तिथे शिकायला मिळेल. त्यामुळे हे क्षेत्र केवळ उदरनिर्वाहाचं साधन न राहता, एक फायदेशीर उद्योग म्हणून पुढे येईल.



महापशुधन एक्स्पोच्या माध्यमातून शेतकरी आणि विशेषतः नवीन पिढीतील समाजमाध्यमे वापरणारा शेतकरी याचे ज्ञान अजून चौफेर होऊन नैसर्गिक शेतीसाठीही पशुपालनाचे महत्त्व, तसेच विविध प्रकारच्या डॉग-कॅट ब्रीडिंग, आधुनिक पद्धतीने शेळी-मेंढीपालन, फार्म प्रोड्युसर कंपन्यांच्या निर्मितीमधून व्यवसायाच्या संधी अशा अनेक नव्या गोष्टींची माहिती व एक्सपोजर त्यांना मिळावे, त्यातून या व्यवसायात रस निर्माण होऊन नवीन आधुनिक पद्धतीने हा व्यवसाय कसा करावा, अशी दिशा शेतकऱ्यांना नक्की मिळेल असे मला वाटते.

उत्पन्न तेव्हाच वाढतं जेव्हा आपण विज्ञानाची कास धरतो. या एक्स्पोमध्ये आपण मुरघास कसं करायचं, हायड्रोपोनिक चारा कसा उगवायचा, अझोला तंत्रज्ञान काय आहे, याचे थेट प्रात्यक्षिक दाखवणार आहोत. जेव्हा शेतकरी स्वतःच्या डोळ्याने बघतो की, कमी खर्चात जास्त दूध किंवा मांस उत्पादन कसे मिळवता येते, तेव्हा तो ते अंमलात आणतो. प्रदर्शनात तज्ज्ञांकडून मिळणारे मार्गदर्शन त्यांच्या शंकांचं निरसन करेल. त्यामुळे जिथे ज्ञान वाढते, तिथे उत्पन्नही वाढते.

पशुपालनाला केवळ शेतीपूरक व्यवसाय न मानता, मुख्य उत्पन्नाचे साधन म्हणून विकसित करण्यासाठी शासन ठोस पावले उचलत आहे. आपल्या सरकारने पशुसंवर्धनाला 'कृषी समकक्ष दर्जा' देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. याचा अर्थ आता शेतकऱ्यांप्रमाणेच पशुपालकांनाही सर्व सवलती व लाभ मिळतील. आमचं ध्येय हेच आहे की दुग्धव्यवसाय हा ग्रामीण भागातील उत्पन्नाचा मुख्य आधार व्हावा, कारण दुधाचा वाटा या क्षेत्रात ६८.५% इतका मोठा आहे. त्यामुळे आता पशुपालन हा 'साईड बिझनेस' नसून 'मेन बिझनेस' होणार आहे.

देशी गोवंश ही आपली खरी संपत्ती आहे. त्यांच्या संवर्धनासाठी आपण आनुवंशिक सुधारणा कार्यक्रम राबवत आहोत. प्रदर्शनात आपण खास देशी जनावरांच्या स्पर्धा ठेवल्या आहेत व विजेत्यांना बक्षिसेही देणार आहोत. शासनाने आता 'सेक्स सॉर्टेड सिमेन' (लिंग विनिश्चित वीर्यमात्रा) तंत्रज्ञान आणले आहे, ज्यामुळे ९०% कालवडी (मादी वासरं) जन्माला येतील. यामुळे देशी गाईंची संख्या वाढण्यास व त्यांचं जतन होण्यास मोठी मदत होणार आहे. जेव्हा आपण उत्कृष्ट प्रतीचे देशी पशुधन एकाच छताखाली आणतो, तेव्हा पाहणाऱ्याच्या मनात कुतूहल निर्माण होतं. या प्रदर्शनात देशातील विविध राज्यातील देशी पशुधनाच्या जाती शेतकऱ्यांना पाहायला मिळतील. आपण तिथे स्पर्धा घेतोय, त्यातून जातिवंत पशुधनाचे महत्त्व अधोरेखित होईल. चांगल्या देशी गाई-म्हशी पाहिल्यावर आपोआपच शेतकऱ्यांमध्ये त्यांच्या संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण होईल.

आजचं युग हे तंत्रज्ञानाचं युग आहे. या प्रदर्शनात आपण नागपूरच्या 'पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाला' सहभागी करून घेतलं आहे. तिथे शेतकऱ्यांना भ्रूण प्रत्यारोपण (IVF/ET) तंत्रज्ञान, पशुआहार व्यवस्थापन व आजारांवर मात कशी करावी, याचं शास्त्रोक्त मार्गदर्शन मिळेल. ३२ एकर परिसरात विविध यंत्रे व उपकरणांचे स्टॉल्स असतील, जिथे आधुनिक मशिनरी कशी वापरायची हे प्रत्यक्ष पाहता येईल. आम्ही तंत्रज्ञान थेट शेतकऱ्याच्या गोठ्यावर पोहोचवलं आहे. उदा. 'महापशुधन संजीवनी ॲप' आणि '१९६२' हा टोल फ्री क्रमांक.



'महापशुधन संजीवनी ॲप' आणि '१९६२' हा टोल फ्री क्रमांक यासारख्या उपक्रमांद्वारे एका फोनवर फिरते पशुवैद्यकीय पथक (Mobile Vet Unit) शेतकऱ्याच्या दारात येते. तसेच, उच्च क्षमतेच्या गाई-म्हशी तयार करण्यासाठी आपण IVF (In-Vitro Fertilization) प्रयोगशाळा सुरू केल्या आहेत व लिंग वर्गीकृत वीर्यमात्रांवर (Sex Sorted Semen) अनुदान देत आहोत.

माझ्या तरुण भावांसाठी आणि बहिणींसाठी या क्षेत्रात खूप संधी आहेत. महिलांच्या सक्षमीकरणासाठी आपण योजनांमध्ये ३०% वाटा महिलांना देतो. '१००० मांसल कुक्कुट पक्षी संगोपन' योजना असो किंवा '१० शेळ्या व १ बोकड' गट वाटप योजना, यात युवकांना आणि महिलांना प्राधान्य दिले जाते. यामुळे त्यांना कोणाकडे नोकरी मागण्यापेक्षा स्वतःचा हक्काचा रोजगार गावातच उपलब्ध होत आहे. आम्ही तरुणांना उद्योजक बनवू इच्छितो. त्यासाठी केंद्र पुरस्कृत 'राष्ट्रीय पशुधन अभियान' (NLM) ही योजना खूप महत्त्वाची आहे. यात कुक्कुटपालन, शेळी-मेंढी पालन, वराह पालन आणि वैरण विकासासाठी ५०% पर्यंत अनुदान दिलं जातं. अगदी ५० लाखांपर्यंतचं अनुदान मिळवून तरुण स्वतःचे मोठे प्रोजेक्ट्स उभे करू शकतात. या प्रदर्शनात आम्ही या योजनांचे स्टॉल्स लावणार आहोत, जेणेकरून तरुणांना याची पूर्ण माहिती मिळेल.

या प्रदर्शनात आपण 'मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना', 'राष्ट्रीय गोकुळ मिशन' व 'स्मार्ट' (SMART) प्रकल्पांतर्गत असलेल्या योजनांची माहिती देणार आहोत. तसेच दुधाळ जनावरांचे गट वाटप आणि शेळी-मेंढी पालनाच्या ज्या योजना आहेत, त्या प्रत्येक घटकापर्यंत कशा पोहोचतील, यावर आमचा भर असणार आहे.

> माझा सल्ला हाच राहील की शेतकऱ्यांनी थोडं जागरूक व्हावं. बहुतांश योजना आता ऑनलाईन आहेत. एन.एल.एम. (NLM) पोर्टल किंवा शासनाच्या अधिकृत वेबसाईटवर जाऊन माहिती घ्यावी. या प्रदर्शनात अधिकारी व तज्ज्ञ उपलब्ध करून दिले आहेत, त्यांच्याशी थेट संवाद साधावा. १९६२ या टोल फ्री क्रमांकाचा वापर करून आपल्या पशुधनाच्या आरोग्याची काळजी घ्यावी. मराठवाडा हा माझा आत्मा आहे व इथल्या दुष्काळाच्या वेदना मी जाणते. जेव्हा पाऊस दगा देतो, तेव्हा पिकांचं नुकसान होतं, पण अशावेळी दावणीला असलेले पशुधनच शेतकऱ्याला तारतात. शेळीला तर आपण 'गरीबाची गाय' किंवा 'चालता फिरता एटीएम' म्हणतो. कमी पाण्यात व कमी चाऱ्यावर जगणारी शेळी किंवा कुक्कुटपालन हे मराठवाड्यासाठी कायमस्वरूपी / शाश्वत उत्पन्नाचा मार्ग आहे. म्हणूनच परळीसारख्या ठिकाणी हे प्रदर्शन घेण्याचं प्रयोजन आहे.



विकास फक्त मोठ्या शहरांपुरता मर्यादित राहू नये. परळी, बीड हा भाग तसा दुष्काळी पट्ट्यात येतो. इथे एवढ्या मोठ्या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमाचं आयोजन करून आम्हाला इथल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना द्यायची आहे. जेव्हा लाखो लोक इथे येतील, तेव्हा इथल्या स्थानिक व्यापारालाही गती मिळेल. 'विकासाची गंगा ग्रामीण भागापर्यंत पोहोचवणे' हाच यामागचा प्रादेशिक व सामाजिक उद्देश आहे.

महाराष्ट्र सध्या मांस उत्पादनात देशात तिसऱ्या क्रमांकावर आहे. पशुवैद्यकीय शिक्षणावर आपण भर देतो आहे. राज्यात नव्याने ४ पशुवैद्यकीय महाविद्यालये सुरू करत आहोत, ज्यात परळी (बीड) चा सुद्धा समावेश आहे. याशिवाय 'Bovine Breeding Act' (गोजातीय प्रजनन नियमन अधिनियम) ची कडक अंमलबजावणी करुन उत्तम वंशावळ तयार करत आहोत. गुणात्मक वाढ हीच आमची पुढील दिशा आहे. परळीपासून आम्ही याची मोठी सुरुवात करत आहोत. आमचा विचार आहे की हे लोण राज्यभर पसरावं.

प्रदर्शनामुळे ज्ञानाची देवाणघेवाण होते. त्यामुळेच आम्ही या एक्स्पोमध्ये प्रत्येक विभागाला सहभागी करून घेतलं आहे. भविष्यात विभागीय व जिल्हा स्तरावरही अशी प्रदर्शनं व्हावीत, जेणेकरून स्थानिक शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळेल, असा आमचा मानस आहे.

बळीराजाला व तरुण मित्रांना एवढंच सांगेन की, पशुपालन व्यवसायात प्रचंड ताकद आहे. या व्यवसायात 'पंचसूत्री' (चांगली पैदास, आरोग्य, खाद्य, चारा व व्यवस्थापन) सांभाळा. याला केवळ जोडधंदा समजू नका, तर याकडे एक 'उद्योग' म्हणून बघा. तरुणांनी केवळ शासकीय नोकऱ्या किंवा छोट्या-मोठ्या नोकऱ्यांच्या मागे न धावता पशुपालनातून अधिकाधिक नफा मिळवावा, तसेच नैसर्गिक शेतीलाही हातभार लावावा. असा संदेश मी नवीन तरुणांना देईन. शासन तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, तुम्ही फक्त मेहनतीची तयारी ठेवा, यश नक्कीच तुमचेच आहे.

**जय हिंद, जय महाराष्ट्र!**



१३ - १५ फेब्रुवारी, २०२६

महा पशुधन एक्स्पो

परळी वैजनाथ

# पशुपक्षी प्रदर्शनातून उलगडेल आर्थिक विकासाचे तत्व

# पशुपालक जाणून घेतील 'पंचसूत्री'चे महत्त्व

सद्यस्थितीमध्ये राज्यात पशुउद्योजकता निर्माण करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाकडून उच्च उत्पादन व प्रजनन क्षमता असलेल्या वंशावळीची पैदास, पशुस्वास्थ्य, पशुखाद्य, पशुचारा व व्यवस्थापन या **पंचसूत्रीचे महत्त्व** पशुपालकांपर्यंत पोहचवण्यात येत आहे. तसेच पशुखाद्य निर्मिती योजनांच्या संदर्भात मार्गदर्शन करून 'चारा स्वयंपूर्ण गाव' संकल्पना राबविण्यास प्रोत्साहन देण्यात येत आहे. पंचसूत्रीचे महत्व पशुपालकांपर्यंत पोहचविण्यासाठी हे प्रदर्शन एक सक्षम व्यासपीठ ठरेल, अशी आम्हाला खात्री आहे. पशुपालकांनी या प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद देत पशुसंवर्धन विभागाच्या प्रयत्नांना पाठबळ द्यावे, अशी अपेक्षा!

विविध राज्यातील पशुधनाच्या शंभराहून अधिक जातींचा सहभाग, पशुसंवर्धनासह कृषी, दुग्ध व मत्स्यव्यवसाय यासंबंधींचे मार्गदर्शन करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील संस्थांचा व तज्ज्ञांचा सहभाग, देशी गोवंश संवर्धनासाठी जातीवंत पशुधनासाठी बक्षिसे अशी वैशिष्ट्ये असणारे राष्ट्रीय पातळीवरील महापशुधन एक्पो-२०२६ हे परळी वैजनाथ येथे १३ ते १५ फेब्रु, २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. पशुपालकांनी या प्रदर्शनाचा लाभ घेत ग्रामीण अर्थचक्र आणखी गतिमान करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

परळी वैजनाथ येथे पशुसंवर्धन विभागाच्या वतीने देशातील हे सर्वात मोठे राष्ट्रीय स्तरावरील पशुपक्षी प्रदर्शन असणार आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून देशी गोवंश संवर्धनाचे महत्त्व पटवून देत देशी गोवंशामध्ये अनुवंशिक सुधारणा घडवून आणणे, सुशिक्षित बेरोजगारांना पशुपालनाद्वारे स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे व त्यायोगे ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करणे, दूध, मांस व अंडी उत्पादनास चालना देणे, जनावरांची उत्पादन क्षमता वाढवून उत्पादन खर्च कमी करणे, वैरण उत्पादनास चालना देणे, मुरघास, हायड्रोपोनिक व अझोला तंत्रज्ञान यासारख्या विषयांबाबत तज्ज्ञांकडून पशुपालकांना प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

परळी वैजनाथ येथे सुमारे ३२ एकरच्या विस्तीर्ण परिसरात हे महापशुधन एक्पो आयोजित करण्यात येणार आहे. या प्रदर्शनात एकूण ३०० स्टॉल्स व एक हजारापेक्षा अधिक जातीवंत पशुधनाचा समावेश असणार आहे. याशिवाय पशुपालक / शेतकऱ्यांसाठी शास्त्रोक्त पध्दतीने पशुपालन करण्यासाठी आवश्यक यंत्रे उपकरणे तसेच पशुसंवर्धनाशी निगडीत बाबीसाठीच्या उत्पादनांच्या स्टॉल्सचा यामध्ये सहभाग असणार आहे. तसेच ६५ प्रकारच्या विविध पशुपक्ष्यांच्या जाती या प्रदर्शनात पहावयास मिळणार आहेत.

नागपूर येथील महाराष्ट्र पशु विज्ञान व मत्स्य विज्ञान विद्यापीठासह राज्यातील चारही कृषी विद्यापीठांचा या पशुपक्षी प्रदर्शनामध्ये सक्रीय सहभाग रहाणार आहे. या प्रदर्शनाच्या निमित्त आयोजित विविध विषयांवर आधारीत चर्चासत्रांमध्ये लाखो शेतकरी व पशूपालकांचा सहभाग या प्रदर्शनात राहील.

राज्यातील वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात पशुजन्य पदार्थांची उदा. दूध, अंडी व मांस यांची मागणी व उपलब्धता यात असलेली तफावत दूर करणे आणि त्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करून ग्रामीण भागातील बेरोजगारी दूर करणे हे विभागाचे मिशन आहे. त्यासाठीच अशा प्रकारचे भव्य प्रदर्शन पशुसंवर्धन विभाग आयोजित करत आहे.

योग्य नियोजनाद्वारे राज्यातील पशुधनाची उत्पादकता वाढविण्यासाठी व त्यांची आरोग्यसंपदा अबाधित राखण्यास आम्ही प्रयत्नशील आहोत. राज्यातील पशुधनाच्या व पशुपालक तसेच शेतकऱ्यांच्या हिताच्या विविध परिणामकारक योजना राबवून व या योजनांमधून आवश्यक निधीची उपलब्धता करून त्याद्वारे पशुधन विकासाच्या, पशुपालकाचे उत्पन्न वाढीच्या तसेच रोजगार निर्मिती कार्यक्रमांकरिता आपला पशुसंवर्धन विभाग कार्यरत आहे.

राज्यामध्ये २० व्या पशुगणनेनुसार गायवर्गीय पशुधन १,३९,९२,३०४ व म्हैसवर्गीय पशुधन ५६,०३,६९२ असे एकूण १,९५,९५,००० इतके पशुधन आहे. भारत पशुधन प्रणालीवरील नोंदीनुसार गायवर्गीय पशुधन व म्हैसवर्गीय पशुधन सांभाळणारे ६०.३७ लक्ष कुटुंबांना दुग्धव्यवसायातून अर्थाजन होत आहे. तसेच शेळ्या सांभाळणारे ४,६६,९९२ तसेच मेंढीपालन करणारे ८२,१७४ कुटुंब व मांसल तसेच अंडी देणाऱ्या कोंबड्यांचे संगोपन सुमारे ३६,५०० पोल्ट्री फार्मर्सव्दारे केले जात आहे.



महाराष्ट्रातील पशुधन क्षेत्र हे राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावत असून, ग्रामीण उपजिविकेसोबतच एकूण उत्पन्नातही मोठे योगदान देते. ग्रामीण भागातील आर्थिक, सामाजिक व पोषणाच्या दृष्टीने मोठा उपयोग होतो. राज्य शासनाने कृषी दर्जा दिल्यामुळे पशुसंवर्धनाला अधिक बळकटी मिळेल.

### स्थानिक बाजारपेठा व अर्थचक्र

❑ पशुसंवर्धनामुळे दूध संघ, बाजार समित्या, पशुखाद्य कारखाने व दुकाने, औषधालये यामुळे स्थानिक अर्थव्यवस्था सक्षम होते. तसेच रोजगारालाही मोठ्या प्रमाणावर चालना मिळते.

✓ **पशुधन क्षेत्राचा वार्षिक संमिश्र वाढ दर (CAGR) सन २०११ ते २०२४ या कालावधीत ६% असून, कृषी व संलग्न क्षेत्राचा वार्षिक संमिश्र वाढ दर ३.५% आहे.**

✓ **पशुधन क्षेत्राचा कृषी व संलग्न क्षेत्रामध्ये २५% वाटा असून राज्य उत्पन्नामध्ये तो ३ % इतका आहे.**



## महाराष्ट्रातील पशुसंवर्धन क्षेत्रातील विविध घटकांचे योगदान

- दूध गटाचा वाटा ६८.५% असून ग्रामीण भागातील उत्पन्नाचा मुख्य स्रोत म्हणून **दुग्धव्यवसायाचे** महत्त्व अधोरेखित होते.
- १९% मांस उत्पादनासह महाराष्ट्र हे **भारतामध्ये ३ नंबरचे मांस उत्पादन करणारे राज्य** आहे. यामध्ये कुक्कुटपालन, शेळीपालन व वराहपालन यांचा वाटा मोठा आहे.
- शेण गटाचा ९% वाटा जैविक खत, बायोगॅस, शेणखत निर्मितीसाठी उपयोग असून, **हरित ऊर्जेसाठी** हा गट महत्त्वाचा ठरू शकतो.

- ➢ अंडी गटाचा ३% वाटा असून, कुक्कुटपालन वाढवण्याची मोठी संधी.
- ➢ दूध उत्पादन हे महाराष्ट्राच्या पशुसंवर्धन अर्थव्यवस्थेचा एक प्रमुख घटक आहे.
- ➢ मांस व शेण उत्पादनही मोठे उत्पन्न देणारे क्षेत्र आहे.

महाराष्ट्रातील पशुधनात संख्यात्मक वाढ करण्यापेक्षा गुणात्मक वाढ करण्यावर पशुसंवर्धन विभागाचा विशेष भर आहे. उच्च उत्पादनक्षम व प्रजननक्षम पशुपैदाशीचे धोरण विभागाने राबविण्यास सूरुवात केली आहे. त्याअंतर्गत,

१. राष्ट्रीय कृत्रिम रेतन कार्यक्रम
२. देशी गायींच्या संवर्धनासाठी अनुवांशिक सुधारणा कार्यक्रम
३. पशुधन विमा योजना
४. राष्ट्रीय गुरे पैदास प्रकल्प
५. राष्ट्रीय पशुउत्पादकता अभियानातंर्गत पशुसंजीवनी, आधुनिक प्रजनन तंत्रज्ञान, ई-पशुहाट / नकुल प्रजनन बाजार, देशी जनावरांचे राष्ट्रीय जनुकीय केंद्र स्थापन करणे, तसेच सर्वसमावेशक अनुवांशिक सुधारणा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.
६. पशुस्वास्थ्य व रोग नियंत्रण कार्यक्रम
७. मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना
८. SEX SORTED SEMEN सेक्स सॉर्टेड सिमेनची सवलतीत उपलब्धता करुन मादी वासरांचे प्रमाण वाढविण्यावर विभागाचा भर आहे.
९. ET-IVF तंत्रज्ञान

यासह विविध योजना व उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी विभागामार्फत करण्यात येत आहे.






# शाश्वत पशुसंवर्धन, निर्णय गतिमान
# समृद्ध पशुधन, शेतकऱ्यांचा अभिमान






**शेतीला जोडधंद्याची जोड देऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारा कणा म्हणजे 'पशुसंवर्धन विभाग'. नवनवीन आव्हानांवर मात करुन आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरत, विभागाने आपल्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. धोरणात्मक निर्णय व त्याच्या प्रभावी अंमलबजावणीच्या जोरावर विभागाने गाठलेले हे यशाचे शिखर आगामी काळात धवल क्रांतीला नवी दिशा देणारे ठरेल. याच ध्येयधोरणांचा व गेल्या १८ महिन्यांतील महत्त्वपूर्ण निर्णयांचा धावता आढावा घेणारा हा विशेष लेख...**

**बीएसएल-२ व बीएसएल-३ नविन प्रयोगशाळेची स्थापना:**

सध्यस्थितीमध्ये देशात केवळ NIHSAD भोपाळ मध्यप्रदेश येथेच बर्ड फ्लू, ग्लॅडर, लंम्पीस्किन, इत्यादी घातक रोगाचे रोग निदान प्रयोगशाळा उपलब्ध आहे. या प्रकल्पामुळे बर्ड फ्लू, ग्लॅंडर, लम्पी स्किन डिसीज, इत्यादी घातक रोगाचे निदान हे आपल्या राज्यात होणार आहे. पशुरोग निदान वेळीच झाल्यामुळे तात्काळ योग्य ते उपचार पशुधनास करणे शक्य होणार आहे. त्यामुळे पशुपालकाचे होणारे आर्थिक नुकसान टाळता येणार आहे.

भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे-६७ संस्थेस राष्ट्रीय स्तरावर पश्चिम विभागिय संदर्भ प्रयोगशाळेचा दर्जा प्राप्त असल्याने संलग्न असलेल्या ७ राज्यांनाही या सुविधा उपलब्ध होणार आहेत. उक्त नमूद घातक रोगाचे निदान या प्रयोगशाळेतच करणे शक्य होणार आहे. त्यामुळे मानव व प्राणी यांच्यातील झुनोटिक आजारांवर सनियंत्रण करणे सहज शक्य होणार आहे.

**पुणे येथील पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्था या प्रयोगशाळेत शेळ्यांमधील गोट पॉक्स प्रतिबंधक लस निर्मिती:**

व्यावसायिक परवाना प्राप्त झाल्यानंतर Goat Pox लसीचे उत्पादन सुरु करून क्षेत्रीय स्तरावर लस पुरवठा करणे शक्य होईल. त्यामुळे सद्यस्थितीत खरेदी करण्यात येणाऱ्या Goat Pox लसीची उत्पादनानंतर आवश्यकता भासणार नाही.

**पुणे येथील पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्था या प्रयोगशाळेत लंपी चर्म रोग प्रतिबंधक लस निर्मिती:**

सन २०२१-२२ मध्ये लंपी चर्म रोग प्रादुर्भावामुळे राज्यात गोवंशीय पशुधनामध्ये फार मोठ्या प्रमाणावर मरतूक झाल्याने आर्थिक नुकसान झाले. राष्ट्रीय अश्व अनुसंधान केंद्र (National Research Center on Equines) हिस्सार व आय.सी.ए.आर.,इज्जतनगर, बरेली यांनी लम्पी चर्म रोग प्रतिबंधात्मक लसींचे तंत्रज्ञान विकसित केले आहे. महाराष्ट्र राज्य अशाप्रकारे लस उत्पादन करणारी प्रथम शासकीय संसथा आहे. सदर दोन्ही तंत्रज्ञान भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या Agrinnovate India या कंपनीमार्फत व्यावसायिक तत्वावर ( TOT-Transfer of Technology ) राज्याच्या पशुसंवर्धन विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले आहे.

**१०० % पशुधनाचे लाळ खुरकत (FMD) व पीपीआर (PPR) रोगप्रतिबंधक लसीकरण :**

NADCP -१ अंतर्गत सन २०२०-२१ पासून नियमित लसीकरण करण्यात येत आहे. आज अखेर ७ फेऱ्या पूर्ण झाल्या आहेत. पशुधनामधील लाळ खुरकत (FMD) रोगप्रतिबंधक लसीकरण नियमीत झाल्याने रोगप्रादुर्भाव कमी झाले आहेत. लाळ खुरकुत रोगप्रतिबंधक लसीकरणामुळे पशुधनाच्या दूध उत्पादन क्षमतेत वाढ झालेली दिसून येते. तसेच पशुंमधील वंध्यत्वाचे प्रमाण कमी होऊन आर्थिक नुकसान कमी होत आहे. राज्य लाळ खुरकुत मुक्त झाल्यास युरोपियन देशास दूध व दुग्धजन्य पदार्थ तसेच मांस व मांसजन्य पदार्थ निर्यातीस चालना मिळणार आहे.

सदर तपासणी लसीकरण करणेपुर्वी व लसीकरणानंतर २८ दिवसानंतर नियमीतपणे करणे येते. प्रथम फेरी लसीकरण करणेपुर्वी १४ टक्के असलेली रोगप्रतिकार शक्ती ३२ टक्के पर्यंत गेल्याचे निष्कर्ष आहेत. तर चौथ्या फेरीचे लसीकरण करणेपुर्वी ४२ टक्के असलेली रोगप्रतिकार शक्ती ८३ टक्के पर्यंत गेल्याचे निष्कर्ष आहेत.

**पुणे येथे c-GMP मानकांनुसार राष्ट्रीय संदर्भ लस चाचणी प्रयोगशाळेची स्थापना :**

या प्रकल्पाच्या कार्य सज्जतेमुळे पशुपालकांना उच्च गुणवत्तेच्या आदर्श मानांकन पद्धतीने उत्पादित केलेल्या विविध संसर्गजन्य प्राणघातक रोगांचा प्रतिबंध करण्यासाठी लस मात्रा मोफत उपलब्ध होणार आहेत. सदरच्या प्रकल्पातील रासायनिक प्रयोगशाळेमध्ये केल्या जाणाऱ्या चाचण्यांचा उपयोग इतर शासकीय, निमशासकीय व खाजगी औषध आणि लस उत्पादन करणाऱ्या संस्थांसाठी केल्यास महसूल उत्पादनाच्या संधी उपलब्ध होतील. त्यामुळे पशुपालकांना तथा नागरिकांना उच्च गुणवत्तेची जीवरक्षक औषधे व लस प्राप्त होईल. प्रकल्पाच्या कार्य सज्जतेमुळे पशुपालकांना उच्च गुणवत्तेच्या आदर्श मानांकन पद्धतीने उत्पादित केलेल्या विविध संसर्गजन्य प्राणघातक रोगांचा प्रतिबंध करण्यासाठी लसमात्रा मोफत उपलब्ध उपलब्ध होणार आहेत.





**खनिज मिश्रण निर्मिती केंद्र, नागपूर:**

प्रक्षेत्रानुसार खनिज मिश्रणाचे उत्पादन करून क्षेत्रीय स्तरावर पशुधनास पुरवठा केल्याने पशुधनाची उत्पादन क्षमता,प्रजनन क्षमता व रोग प्रतिकरशक्ती वाढण्यास मदत होईल.



**विदर्भ व मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प:**

शेतकऱ्यांच्या दारात गायी-म्हशींमध्ये पारंपारीक पध्दतीच्या तसेच, लिंग वर्गीकृत केलेल्या गोठीत रेतमात्राचां वापर करून कृत्रिम रेतनाची सुविधा तसेच भणृ प्रत्यारोपणांव्दारे दुधाळ जनावरांची संख्या वाढविणे, शेतकरी, पशुपालक यांना संतुलीत आहार सल्ला देणे, वैरण विकास कार्यक्रम व दर्जेदार चारा पुरवठा करून पशुंच्या आहार पद्धतीत सुधारणा करणे. गावपातळीवर पशुआरोग्य सेवा पुरविणे, उच्च दूध उत्पादन क्षमता असलेल्या गायी-म्हशींचे वाटप, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून त्यांची उन्नती करणे, रोजगार निर्मिती आदी उद्देशांच्या पुर्तीसाठी सदर प्रकल्प राबविण्यात येत आहे.

सदरचा प्रकल्प राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती -

अभियान यांच्याबरोबर अभिसरण करण्यासाठी सदर कार्यालयांना त्यांच्या विभागांतर्गत दुग्धोत्पादकामध्ये महिलांना या प्रकल्पात सहभागी करण्याकरिता तसेच त्यांच्या विभागातील योजना दुग्धोत्पादकांपर्यंत पोहचवण्याच्या दृष्टिने जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांना या प्रकल्पात सहभागी होण्याकरिता पत्राद्वारे कळविण्यात आले. सचिव, आदिवासी विकास विभाग व प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजिवनी प्रकल्प यांच्याबरोबर बैठक आयोजित करण्यात आली असून, कामकाज सुरु आहे.





**२१ वी पशुगणना:**

२१ वी पशुगणना नोव्हेंबर, २०२४ ते फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत पुर्ण करणेचे निश्चित करणेत आले. विधानसभा आचारसंहितेमुळे अतिशय कमी वेळेत १००% पशुगणना पूर्ण केली. राज्यातील ४३९९८ गावे व ७८२८ प्रभाग यांमध्ये ही गणना करण्यात आली. त्याकरीता ८०७५ प्रगणक व १२५८ पर्यवेक्षकांची नेमणूक करण्यात आली होती. सन २०२४-२५ मध्ये रु. १००.०० लक्ष निधी उपलब्ध निधी खर्च करणेत आला.




**राजे यशवंतराव होळकर महामेष योजना:**

सदर योजनेच्या माध्यमातून राज्यामध्ये अर्धबंदिस्त / बंदिस्त मेंढीपालन व्यवसायास चालना मिळत आहे, राज्यातील भटकंती करणारे मेंढपाळ पारंपारिक पद्धतीने करीत असलेल्या व्यवसायापासून त्यांना शाश्वत उत्पन्नाचा स्रोत निर्माण होऊन त्याद्वारे त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होत आहे. मेंढीपालनाचा पारंपारिक व्यवसाय असणाऱ्या समाजातील युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध होत आहे. राज्यामधील सातत्याने कमी होत असलेल्या मेंढयांच्या संख्येमध्ये वाढ होण्यास मदत होत आहे, तसेच उच्च प्रतीच्या सुधारित नरमेंढयांद्वारे पारंपारित प्रजातीच्या मेंढयांची अनुवंशिकता सुधारण्यास मदत होत आहे. त्यामुळे राज्यामध्ये राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेमुळे राज्यातील भटक्या जमाती (भज-क) या प्रवर्गातील अल्प उत्पन्न असणाऱ्या घटकांना उत्पन्नाचे शाश्वत साधन निर्माण झालेले आहे. त्यामुळे त्यांचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचविण्यास मदत होत आहे.



**मेंढपाळ कुटूंबांना राज्यस्तरीय योजनेंतर्गत माहे जून ते सप्टेंबर या चार महिन्याच्या कालावधीसाठी प्रतिमाह रु. ६०००/- असे एकूण रु. २४०००/- चराई अनुदान:**

राज्यातील मेंढीपालन व्यवसाय भटकंती स्वरूपाचा असल्यामुळे पावसाळ्यात जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये मेंढ्यांना चरण्याकरीता चराई क्षेत्र उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होतात. त्यामुळे चाऱ्याअभावी मेंढ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन त्यांची उत्पादकता कमी होते. परंतु, सदर योजनेच्या माध्यमातून मेंढपाळ कुटूंबांना माहे जून ते सप्टेंबर या चार महिन्याच्या कालावधीसाठी चराई अनुदान मिळाल्यामुळे मेंढ्यांना सकस चारा उपलब्ध होत आहे व यामुळे मेंढ्यांची उत्पादकता वाढून मेंढपाळाच्या उत्पन्नामध्ये भर पडत आहे. सन २०२४-२५ मध्ये या योजनेअंतर्गत एकूण ३२२२ लाभार्थींची निवड करण्यात आली असून, सर्व लाभार्थ्यांना DBT द्वारे अनुदान वाटप करण्यात आले आहे.

**राज्यस्तरीय योजनेंतर्गत अर्ध बंदिस्त, बंदिस्त मेंढीपालन करण्याकरीता जागा खरेदीसाठी किंवा ३० वर्षाच्या भाडे करारावर जमीन भाड्याने घेण्यासाठी अनुदानस्वरुपात एकवेळचे एकरकमी अर्थसहाय्य:**

सदर योजने अंतर्गत सन २०२४-२५ मध्ये सर्व लाभर्थींची निवड करण्यात आली असुन सर्व लाभार्थ्यांना DBT द्वारे अनुदान वाटप करण्यात येत आहे.




**सुधारीत गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना:**

सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेमध्ये गोशाळामधील पायाभूत / मुलभूत सुविधा जसे कि पशुधनासाठी नवीन शेड बांधकाम, चाऱ्याची,पिण्याची व्यवस्था व वैरण उत्पादनासाठी पाण्याच्या उपलब्धतेकरिता विहीर / बोअरवेल, कडबाकुट्टी यंत्र, मुरघास प्रकल्प, गांडूळखत निर्मिती प्रकल्प, गोमुत्र व शेण यापासून उत्पादन निर्मिती प्रकल्प व विक्री केंद्र अनुदान अनुज्ञेय आहे. त्या अंतर्गत प्रथम टप्प्यात ६०% अनुदान वितरीत करण्यात आलेल्या गोशाळांची जिल्हा पडताळणी समितीमार्फत पडताळणी पूर्ण करून विहित प्रपत्रात अनुदान मागणी प्रस्ताव प्राप्त झालेल्या २५ गोशाळांना उर्वरित ४०% अनुदान रक्कम रुपये १८३.३२ लक्ष करण्यात आले आहे. सदर अनुदान वाटपामुळे गोशाळाचे सक्षमीकरण उद्दिष्ट साध्य होणार असून, गोशाळा ह्या स्वावलंबी होणार आहेत.

**परिपोषण योजना :**

गोशाळांमधील देशी गोवंशास दैनंदिन चाऱ्याचा प्रश्न सोडविण्याकरिता सदर अनुदानाचा उपयोग प्रभावीपणे केला जात आहे. योग्य परिपोषणामुळे गोशाळेतील देशी गोवंश प्रजननक्षम व कमी उत्पादन क्षमता असलेल्या देशी गायींची प्रजननक्षम आणि उत्पादन क्षमता वाढविण्यात मदत होणार असून, गोशाळांमधील गायींचा भृण प्रत्यारोपण कार्यक्रमात दायी माता म्हणून वापर करण्यासाठी उपलब्ध होऊ शकतील.

**७५ टक्के अनुदानावर चार आठवडे वयाच्या सुधारीत देशी प्रजातीच्या १०० कुक्कुट पक्ष्यांच्या खरेदी व संगोपनासाठी अर्थसहाय्य:**

या योजनेंतर्गत भटक्या जमाती (क) या प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीच्या २५९० लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या प्रत्येक लाभार्थ्यास चार आठवडे वयाच्या सुधारीत देशी प्रजातीच्या (CARI Approved Low Input Technology Birds) १०० मिश्र कुक्कुट पक्ष्यांचा पुरवठा करण्यात येतो. निवड झालेल्या लाभार्थ्यांना प्रती पक्षी २.० कि. ग्रॅ. याप्रमाणे २०० कि. ग्रॅ. या मर्यादेत कुक्कुट पक्षी खाद्याचा पुरवठा करण्यात यावा, यासाठी सर्व लाभार्थ्यांना प्रकल्प किमतीच्या ७५ टक्के शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील. उर्वरित २५ टक्के हिस्सा लाभार्थ्याने स्वतः उभारावयाचा आहे. प्रत्यक्ष योजना राबविताना प्रतीपक्षी व खाद्याच्या प्रतीकिलो किंमतीमध्ये वाढ झाल्यास अनुदानाव्यतिरिक्तचा खर्च लाभार्थ्यांने स्वतः करावयाचा आहे. लाभार्थ्यांना या योजनेचा DBT द्वारे लाभ् देण्यात येत आहे.

**गोशाळांमधील गायींचा भृण प्रत्यारोपण कार्यक्रमात Surrogate Mother म्हणून वापर:**

गोशाळांमध्ये भ्रूण प्रत्यारोपण कार्यक्रमासाठीच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या असून, गोसेवा आयोगाकडील गोकुळधाम गोशाळा कोपरगाव जिल्हा अहिल्यानगर व दयोदय गोशाळा बारामती जिल्हा पुणे या दोन गोशाळामध्ये भृण प्रत्यारोपण प्रायोगिक तत्वावर ETIVF Lab पुणे यांच्या तांत्रिक सहकार्याने व मा. आयुक्त पशुसंवर्धन यांच्या संकल्पनेतून सुरु करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमामुळे गोशाळामधील प्रजननक्षम व कमी उत्पादन क्षमता असलेल्या देशी गायीपासून उच्च उत्पादन क्षमता असलेल्या देशी वासरांची निर्मिती करण्यात येणार असून, गोशाळेसाठी उच्च उत्पादन वासरांच्या विक्रीतून उत्पादनाचे नवे साधन उपलब्ध होणार आहे. प्रत्येक गोशाळेत गोबर गॅस प्लांट, तसेच इतर पशुजन्य उत्पादने तयार करून गोशाळा स्वयंपुर्ण करण्याच्या दृष्टीने आराखडा तयार करणे, प्रत्येक गोशाळेत गोबर गॅस प्लांट तसेच इतर पशुजन्य उत्पादने करून गोशाळा स्वयंपुर्ण करण्याच्या दृष्टीने आराखडा शासनास मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे. प्रत्येक गोशाळेत पशुधन संख्येनुसार गोबर गॅस प्लांट उभारणीमुळे गोशाळा स्वावलंबी व सक्षम बनणार असून, स्वच्छ उर्जा निर्मितीमुळे गोबर गॅस उत्पादित उपउत्पादनांच्या माध्यमातून गोशाळेच्या अर्थार्जनास चालना मिळणार आहे. तसेच गोमय मूल्यवर्धित उत्पादने निर्मित करून गोशाळा ह्या आर्थिक दृष्ट्या सक्षम होणार आहेत.



पर्यावरण विभागाच्या 'माझी वसुंधरा' अभियानाच्या नवीन बोधचिन्हाचे व परळी वैजनाथ (जि. बीड) येथे आयोजित राष्ट्रीय स्तरावरील 'महापशुधन एक्स्पो-२०२६' या पशुपक्षी प्रदर्शनाच्या बोधचिन्हाचे अनावरण मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री मा. श्री. एकनाथ शिंदे व मा. उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार तसेच मंत्रालयात मंत्रिमंडळ बैठकीनंतर झालेल्या कार्यक्रमास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य श्री. राजेश अग्रवाल, मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. आदींसह विविध खात्यांचे मंत्री तसेच सचिव उपस्थित होते.




# 'महापशुधन एक्स्पो-२०२६' साठी परळीमध्ये जय्यत तयारी

## मा. मंत्री, पशुसंवर्धन श्रीमती पंकजा मुंडे यांनी घेतला आढावा



**पुणे / परळी:** परळी वैजनाथ येथे आयोजित करण्यात येत असलेल्या 'महापशुधन एक्स्पो-२०२६' या अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शनाच्या पूर्वतयारीचा आढावा दि. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्याच्या मा. मंत्री (पशुसंवर्धन) श्रीमती पंकजा मुंडे यांनी घेतला. अखिल भारतीय स्तरावरील हे भव्य प्रदर्शन येत्या १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पार पडणार असून, प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे.

या आढावा बैठकीत आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.) यांनी प्रदर्शनाच्या नियोजनाबाबत सविस्तर सादरीकरण केले. पशुसंवर्धन विभागाने आतापर्यंत केलेल्या तयारीची माहिती देताना त्यांनी प्रदर्शन स्थळ, पशुपक्ष्यांची नोंदणी, शेतकरी व पशुपालकांसाठीच्या सुविधा आणि तांत्रिक सत्रांचे नियोजन यावर प्रकाश टाकला.

महापशुधन एक्स्पो २०२६ हे, एकूण ३२ एकर विस्तीर्ण जागेवर भव्य आयोजन, पशुसंवर्धनाशी संबंधित ३०० पेक्षा जास्त माहितीपूर्ण स्टॉल्स, विविध जातीवंत पशुप्रजातींचे १३०० पेक्षा जास्त पशुधन एकाच ठिकाणी पाहण्याची संधी, उत्कृष्ट जातीच्या देशी व संकरीत गायी-म्हशींचे विशेष प्रदर्शन, पेट शो, मुक्तसंचार गोठा व अर्धबंदिस्त शेळीपालन यासारख्या आधुनिक पशुपालन पद्धतींचे दर्शन, परसातील कुक्कुटपालन व विविध कुक्कुट प्रजाती एकाच छताखाली पाहण्याची संधी, विविध प्रकारच्या चारा पिकांच्या लागवडीबाबत मार्गदर्शन, पशुसंवर्धनातील विविध विषयांवर तज्ज्ञांच्या उपस्थितीत माहितीपूर्ण चर्चासत्रे, शासनाच्या विविध योजनांचे थेट सादरीकरण व मार्गदर्शन आदींचा समावेश असलेले एक परिपूर्ण पशुपक्षी प्रदर्शन असणार आहे.

मा. मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी यावेळी सूचना दिल्या की, हे प्रदर्शन केवळ पशूंचे प्रदर्शन न राहता, शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी एक दिशादर्शक मंच ठरावा. प्रदर्शनात येणाऱ्या पशुपालकांची गैरसोय होणार नाही, याची विशेष काळजी घेण्याचे निर्देशही त्यांनी प्रशासनाला यावेळी दिले. या प्रदर्शनामुळे मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील पशुपालन क्षेत्राला मोठी चालना मिळणार असून, शेतकरी / पशुपालकांसाठी हे प्रदर्शन मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरेल, यासाठी सांघिक प्रयत्न करावेत, असे निर्देश या बैठकीत मा. मंत्री महोदयांनी दिले.

"परळी ही प्रभु वैजनाथांची भूमी आहे. या पावनभूमीत १३ ते १५ फेब्रुवारी, २०२६ दरम्यान 'महापशुधन एक्स्पो-२०२६' चे आयोजन करीत आहोत. आपल्या शेतकऱ्यांच्या दारात देशातलं सर्वोत्तम तंत्रज्ञान व जातीवंत पशुधन दिसलं पाहिजे, अशी यामागची संकल्पना आहे. त्यातून त्यांच्या हाताला काम मिळून त्यांचा आर्थिक विकास व्हावा, हाच यामागचा उद्देश आहे. तसेच ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करणं हाच या प्रदर्श्नाच्या आयोजनामागील व्यापक संदेश आहे."

मा. मंत्री (पशुसंवर्धन) श्रीमती पंकजा मुंडे

# मंत्री पंकजा मुंडे यांना अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाची मानद डॉक्टरेट (डी. लिट.) पदवी प्रदान




**'ही पदवी जनतेच्या सेवेसाठी अर्पण' - पंकजा मुंडे**

"हा बहुमान म्हणजे माझ्यावर प्रेम करणाऱ्या जनतेचा आणि मी करत असलेल्या कार्याचा सन्मान आहे. अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाने माझ्या कार्याची दखल घेतल्याबद्दल मी आभारी आहे. ही डॉक्टरेट पदवी मला भविष्यात अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा देईल. या सन्मानामुळे लोकहिताचे अनेकोत्तम निर्णय घेण्याची प्रेरणा व ऊर्जा मला मिळाली आहे. भविष्यात पशुसंवर्धन व पर्यावरण क्षेत्रात आणखी अभिनव कार्य करण्याचा माझा मानस आहे"

**पुणे:** राज्याच्या पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरण बदल मंत्री श्रीमती पंकजा गोपीनाथ मुंडे यांच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत, पुणे येथील प्रतिष्ठित अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या वतीने त्यांना शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च मानली जाणारी मानद डॉक्टरेट (डी. लिट.) पदवी प्रदान करून गौरविण्यात आले.

विद्यापीठाच्या वतीने आयोजित एका भव्य दिक्षांत समारंभात हा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी विद्यापीठाचे कुलपती, मान्यवर शिक्षणतज्ज्ञ आणि विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या.

पंकजा मुंडे यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत जनसामान्यांच्या प्रश्नांवर दिलेला लढा, ग्रामीण भागातील विकासकामे व विशेषतः पशुसंवर्धन व पर्यावरण विभागाच्या माध्यमातून राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची विद्यापीठाने दखल घेतली आहे. सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी केलेले कार्य व महिला सक्षमीकरणासाठी उचललेली पावले, हा या पदवीचा मुख्य आधार असल्याचे विद्यापीठाने नमूद केले. या बहुमानामुळे पंकजा मुंडे यांच्यावर सर्वच स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या राजकीय प्रवासातील हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# दुग्ध व्यवसायातून विदर्भाच्या प्रगतीला नवी दिशा
# 'ॲडव्हान्टेज विदर्भ'मधील सेमिनारला मोठा प्रतिसाद




**नागपूर:** केंद्रीय मंत्री मा. ना. श्री. नितीनजी गडकरी यांच्या संकल्पनेतून आयोजित 'खासदार औद्योगिक महोत्सव-ॲडव्हान्टेज विदर्भ २०२६' अंतर्गत 'दुग्ध व्यवसायातील औद्योगिक संधी' या विषयावरील सेमिनार नागपुरात उत्साहात संपन्न झाले. आरटीएमएनयू कॅम्पस ग्राऊंडवरील हॉल सी मध्ये पार पडलेल्या या चर्चासत्रात विदर्भातील शेतकरी, दूध उत्पादक व महिला बचत गटांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

कार्यक्रमाचे मुख्य अतिथी व पशुसंवर्धन विभागाचे मा. सचिव डॉ. रामास्वामी एन. (भा. प्र. से.) यांनी दुग्ध व्यवसायातील शासकीय धोरणे व भविष्यातील संधींवर प्रकाश टाकला. पराग मिल्क फूड्सचे अध्यक्ष श्री. देवेंद्र शाह व नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाचे डॉ. मीनेश शाह यांनी या व्यवसायातील जागतिक दर्जाची मानके व औद्योगिक विस्ताराची गरज प्रतिपादन केली.

यावेळी विविध मान्यवर वक्त्यांनी उपस्थित जनसमुदायाला मार्गदर्शन केले. यामध्ये आमदार सत्यजीत तांबे यांनी दुग्ध व्यवसायात तरुणांच्या सहभागावर भर दिला. श्री. चेतन अरुण नरके (गोकुळ दूध संघ) यांनी सहकारी दूध संकलनातील यशोगाथा मांडली. डॉ. जे. बी. प्रजापती आणि डॉ. शिरीष मिराशी यांनी तांत्रिक व पशुखाद्य नियोजनाबाबत मार्गदर्शन केले. श्री. प्रवीण भंडारी व श्री. सिकंदर मुलाणी यांनी ग्रामीण स्तरावर दूध उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून होणाऱ्या आर्थिक बदलांची माहिती दिली.

विदर्भातील महिला बचत गटांना या व्यवसायातून मोठी आर्थिक उभारी मिळू शकते, हा या सेमिनारचा मुख्य सूर होता. ६ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन ए.आय.डी. (AID) व डॉ. मोहन श्रीगिरीवार यांनी केले होते. या सेमिनारमुळे विदर्भातील दुग्ध व्यवसायाला नवीन तांत्रिक जोड व औद्योगिक स्वरूप प्राप्त होईल, असा विश्वास यावेळी उपस्थित दुग्धव्यवसाय विकास क्षेत्रातील विविध मान्यवरांनी व्यक्त केला.

# जपानमधील सागा प्रांताचे गव्हर्नर यामागुची योशिनोरी यांनी घेतली मा. मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांची भेट



जपानमधील सागा प्रांताचे गव्हर्नर यामागुची योशिनोरी व त्यांच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाने राज्याच्या पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरण बदल मा. मंत्री श्रीमती पंकजा गोपीनाथ मुंडे यांची रामटेक निवासस्थानी भेट घेतली. या भेटीत पर्यावरण, प्लास्टिक मुक्ती, शिक्षण आदींसह विविध विषयांवर चर्चा केली. नदी पुनरुज्जीवन व प्लास्टिकमुक्त जलस्रोत हा राज्याचा प्राधान्यक्रम असून, यासाठी जपानचे सहकार्य मोलाचे ठरेल, असा विश्वास त्यांच्याशी बोलताना व्यक्त केला.

समुद्रातील व नदीतील प्रदूषण रोखणे, प्लास्टिक कचऱ्याविरुद्ध संयुक्त प्रयत्न करणे तसेच शिक्षण, पशुसंवर्धन व सौंदर्यप्रसाधन उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र व जपानचे परस्पर सहकार्य वाढविण्याबाबतही सकारात्मक चर्चा झाली.

महाराष्ट्राला विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला आहे. मात्र, समुद्रातून वाहून येणाऱ्या प्लास्टिक कचऱ्याचा प्रश्न गंभीर आहे. त्याचबरोबर नद्यांमधील प्रदूषण हीदेखील चिंतेची बाब असून, भारतीय संस्कृतीत नद्यांचे पवित्र स्थान लक्षात घेता त्यांच्या स्वच्छतेसाठी राज्य शासन विशेष कार्यक्रम हाती घेणार आहे, असे मंत्री श्रीमती पंकजा गोपीनाथ मुंडे स्पष्ट केले.



गव्हर्नर यामागुची यांनी जपानकडील तांत्रिक ज्ञान, व्यवस्थापन अनुभव व संशोधन क्षमता महाराष्ट्रासोबत सामायिक करण्याची तयारी यावेळी दर्शवली. जपानच्या शिष्टमंडळात प्रादेशिक देवाणघेवाण विभागाचे उपमहासंचालक मसाहिरो ओनो, आंतरराष्ट्रीय धोरण गटाचे उपसंचालक कोजी योशिताके, प्रकल्प प्रमुख कोकी कनामारू व जेट्रो सागाचे मुख्य संचालक हिरोशी योनेयामा तसेच मा. सचिव (पर्यावरण) जयश्री भोज, मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन., प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव देवेंद्र सिंह आदी उपस्थित होते. पर्यावरण संरक्षण, शिक्षण व उद्योग क्षेत्रात भारत-जपान सहकार्याला ही बैठक नवे परिमाण देणारी ठरेल.

# पशुसंवर्धन आयुक्तालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**पुणे:** भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा वर्धापन दिन पुणे येथील पशुसंवर्धन आयुक्तालयात अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी पशुसंवर्धन आयुक्त मा. प्रवीणकुमार देवरे यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण समारंभ पार पडला. राष्ट्रध्वजाला मानवंदना दिल्यानंतर त्यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

उपस्थित अधिकारी व कर्मचारी वर्गाला संबोधित करताना आयुक्त प्रवीणकुमार देवरे यांनी पशुसंवर्धन विभागाच्या भविष्यातील वाटचालीवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, "भारत हा कृषिप्रधान देश असून, पशुसंवर्धन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. प्रजासत्ताक दिनी आपण केवळ उत्सव साजरा न करता संविधानाने दिलेल्या कर्तव्यांची जाणीव ठेवून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजना पोहोचवण्याची शपथ घेतली पाहिजे." त्यांनी पुढे नमूद केले की, "राज्यातील पशुधनाचे आरोग्य सुधारणे, दुग्धोत्पादन वाढवणे व साथरोगांवर नियंत्रण मिळवण्यासाठी विभागातील प्रत्येक अधिकाऱ्याने यापुढील काळातही आपले समर्पण कायम ठेवले पाहिजे."

या सोहळ्याला सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) डॉ. शैलेश केंडे, सहआयुक्त पशुसंवर्धन (पशुधन व नियोजन) डॉ. देवेंद्र जाधव, सहआयुक्त पशुसंवर्धन (रोग अन्वेषण विभाग) डॉ. अंकुश परिहार, प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन (पुणे विभाग) डॉ. समीर बोरकर, सहआयुक्त पशुसंवर्धन (पशुआहार) डॉ. सुनील पसरटे, सहआयुक्त पशुसंवर्धन तथा सदस्य सचिव, गोसेवा आयोग डॉ. शामकांत पाटील, डॉ. याहयाखान पठाण (आयव्हीबीपी) सहसंचालक (सांख्यिकी) श्रीमती सुषमा जाधव, उपआयुक्त पशुसंवर्धन (महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ) डॉ. शिवाजीराव पवार, उपआयुक्त पशुसंवर्धन तथा सदस्य सचिव महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण डॉ. प्रशांत भड, उपसंचालक (सांख्यिकी) श्रीमती स्मिता आंबरे, उपआयुक्त पशुसंवर्धन (आयव्हीबीपी) डॉ. अनिल देशपांडे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (नियोजन) डॉ. राजू कोलते, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (रोगनियंत्रण) डॉ. भगतसिंग कदम, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (पशुधन) डॉ. गंगाधर काळे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (पशुधन व नियोजन) डॉ. शशिकांत सांभारे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (प्रशिक्षण) डॉ. सुनील गिरमे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (जिपसचि) डॉ. बाळासाहेब गायकवाड आदींसह अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यातील सर्वोत्कृष्ट गोशाळांना 'शुद्ध देशी गोवंश सन्मान पुरस्कार' प्रदान



**पुणे:** महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभाग व महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने यंदाचा प्रजासत्ताक दिन एका आगळ्यावेगळ्या उपक्रमाने साजरा झाला. राज्यातील देशी गोवंशाचे जतन व संवर्धन करणाऱ्या गोशांळांचा गौरव करण्यासाठी प्रथमच प्रत्येक जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट गोशाळा संचालकांना 'महाराष्ट्र शासनाचा शुद्ध देशी गोवंश सन्मान पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

दि. २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून, प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाच्या स्थापनेनंतर देशी गोवंशाच्या रक्षणासाठी घेण्यात आलेला हा एक महत्त्वाचा निर्णय मानला जात आहे. आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा व सहआयुक्त पशुसंवर्धन तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र गोसेवा आयोग डॉ. शामकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या पुरस्कारांची निवड प्रक्रिया राबवण्यात आली होती.

"राज्यातील देशी गोवंशाचे संवर्धन केवळ धार्मिक नव्हे, तर आर्थिक व पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही महत्त्वाचे आहे. गोशाळा चालकांच्या कष्टाचे चीज व्हावे व इतरांनाही प्रेरणा मिळावी, या हेतूने हा राज्यस्तरीय सन्मान सुरू करण्यात आला आहे," असे मत डॉ. पाटील यांनी व्यक्त केले.

राज्यस्तरावर अशा प्रकारचा पुरस्कार देण्याची ही पहिलीच वेळ आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमधून प्रत्येकी एका सर्वोत्कृष्ट गोशाळेची निवड करण्यात आली. या पुरस्कारामुळे सेंद्रिय शेती व देशी दुग्धव्यवसायाला चालना मिळण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र गोसेवा आयोग व पशुसंवर्धन विभागाने संयुक्तपणे या उपक्रमाद्वारे पशुपालकांमध्ये एक नवा उत्साह निर्माण केला असून, भविष्यात शुद्ध देशी गोवंशाच्या संख्येत वाढ होण्यासाठी हा उपक्रम पथदर्शी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.





**जिल्हास्तरीय शुद्ध देशी गोवंश सन्मान पुरस्कारार्थी गोशाळा:** गोकुळधाम गोसेवा प्रतिष्ठान, नाशिक, वैदिक गोशाळा, जळगाव, श्रीकृष्ण गोशाळा, धुळे, श्री सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्ट अहिल्यानगर, मानस रुरल डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट, ठाणे, जगदंब बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित कै. नयना तांबे गोशाळा, बीड, श्री गोरक्षण पांजरपोळ, जालना, रुख्मीनीमाता गोरक्षण संस्था वाशिम, गोपाल कृष्ण गोरक्षण संस्था बुलढाणा, आदर्श गोसेवा एवं अनुसंधान प्रकल्प अकोला, कपिला गोरक्षण संस्था यवतमाळ, गोकुलम गोरक्षण संस्था अमरावती, पीपल फॉर एनिमल वर्धा, गोविज्ञान अनुसंधान केंद्र नागपूर, वीणाताई बडगे गोरक्षण सेवा संस्था, भंडारा, कल्याणी (पंचमुखी) गोशाळा गोंदिया.

# केंद्रिय पशुसंवर्धन आयुक्तपदी प्रसिद्ध शास्त्रज्ञ मा. डॉ. बी. महेश्वरप्पा नवीना यांची नियुक्ती



**नवी दिल्ली:** भारतीय पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय क्षेत्रात नवी विज्ञाननिष्ठ धोरणे व नाविन्यपूर्ण बदलांना गती देण्यासाठी केंद्र सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. प्रसिद्ध आयसीएआर (ICAR) शास्त्रज्ञ मा. डॉ. बी. महेश्वरप्पा नवीना यांची केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय मंत्रालयाच्या (MoFAHD) पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागात (DAHD) 'पशुसंवर्धन आयुक्त' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

मा. डॉ. नवीना हे एक प्रतिष्ठित ICAR शास्त्रज्ञ असून, त्यांनी 'ICAR-राष्ट्रीय मांस संशोधन केंद्र' येथे प्रधान शास्त्रज्ञ म्हणून काम केले आहे. त्यांच्याकडे पशुधन उत्पादन तंत्रज्ञान, अन्न सुरक्षा व संशोधन-आधारित नवकल्पना या क्षेत्रातील २० वर्षांहून अधिक काळाचा दांडगा अनुभव आहे. 'आयव्हीआरआय' (IVRI) मधील त्यांचा शैक्षणिक पाया व अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय संशोधनाचा अनुभव, यामुळे विज्ञान, धोरण आणि त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी यांचा समन्वय साधण्याची एक अद्वितीय क्षमता त्यांच्याकडे आहे.

त्यांची ही नियुक्ती अशा महत्त्वाच्या काळात झाली आहे जेव्हा भारतीय दुग्धव्यवसाय क्षेत्र शाश्वत दुग्धशेती, मूल्यवर्धित दुग्धजन्य पदार्थ आणि गुणवत्ता खात्री या गोष्टींना प्राधान्य देत आहे. त्यांचे नेतृत्व दुग्ध सहकारी संस्था, धोरणनिर्मिती संस्था व संपूर्ण दुग्धव्यवसाय परिसंस्थेमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी दिशादर्शक ठरेल, अशी अपेक्षा आहे.

मा. डॉ. नवीना नियुक्तीमुळे देशातील पशुसंवर्धन क्षेत्राला संशोधनावर आधारित नवी दिशा मिळणार आहे. डॉ. नवीना यांच्याकडे असलेल्या तांत्रिक अनुभवाचा उपयोग देशी पशुधनाची अनुवंशिकता सुधारून दूध व मांस उत्पादनात वाढ करणे, अन्न सुरक्षा मानकांनुसार पशुजन्य उत्पादनांचा दर्जा सुधारणे, पशुपालकांसाठी नवनवीन तंत्रज्ञान विकसित करून उत्पन्नात भर घालणे यासारख्या क्षेत्रांत मोलाचा ठरणार आहे.

## पुरस्कार व सन्मान

- **२००७:** DST-BOYSCAST फेलोशिप.
- **२०१० पासून:** 'इंटरनॅशनल कॉंग्रेस ऑफ मीट सायन्स अँड टेक्नॉलॉजी' (ICoMST) चे राष्ट्रीय संपर्क व्यक्ती.
- **२०१३:** आयसीएआर-लाल बहादूर शास्त्री उत्कृष्ट युवा शास्त्रज्ञ पुरस्कार.
- **२०१५ पासून:** भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण (FSSAI) चे वैज्ञानिक समिती सदस्य.
- **२०१५ पासून:** 'कोडेक्स इंडिया' (CODEX India) च्या इलेक्ट्रॉनिक वर्किंग ग्रुपचे सदस्य.
- **२०१४- १७:** सचिव, इंडियन मीट सायन्स असोसिएशन (IMSA).
- **२०२३ पासून:** 'जर्नल ऑफ मीट सायन्स'चे मुख्य संपादक.
- **२०१७ पासून:** नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्सेस इंडिया (NASI) चे सदस्य.
- **२०१९:** कर्नाटक पशुवैद्यकीय असोसिएशन (KVA) तर्फे पशुवैद्यकीय विज्ञानातील योगदानाबद्दल 'नकुल पुरस्कार'.
- **२०२० पासून:** 'करंट प्रोटीओमिक्स'चे विभाग संपादक.
- **२०२०:** नॅशनल स्टीयरिंग कमिटी (FoSTaC, FSSAI) चे सदस्य.
- **इतर:** विज्ञान व तंत्रज्ञान विभाग (DST) व सेंटर फॉर इंटरनॅशनल को-ऑपरेशन इन सायन्स (CICS) कडून ट्रॅव्हल ग्रँट पुरस्कार.



# पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्थेच्या बळकटीकरणासाठी मा. आयुक्त पशुसंवर्धन यांचेकडून प्रकल्पाचा आढावा



**पुणे:** पशुवैद्यकीय लसनिर्मिती व चाचणी प्रक्रियेमध्ये जागतिक दर्जाची आदर्श मानांकन पद्धती cGMP प्रक्रिया राबवण्यासाठी, पुणे येथील पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्थेतील (IVBP) 'लघुप्राणी विभागाच्या बळकटीकरणाचा' प्रकल्प आता अंतिम टप्प्यात आला आहे. दि. १५ जानेवारी २०२६ रोजी पशुसंवर्धन आयुक्त मा. डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.) यांनी औंध, पुणे येथील या प्रकल्पाला भेट देऊन प्रगतीचा सखोल आढावा घेतला.

मा. आयुक्तांनी प्रकल्पाच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले असून, उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या प्रकल्पासाठी वर्ग करण्यात आलेल्या १० कोटी रुपयांच्या निधीचा पूर्णतः वापर झाल्याची खात्री मा. आयुक्तांनी केली. उर्वरित १.०४ कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यापूर्वी कामाच्या गुणवत्तेचा आढावा घेण्यात आला.

आयुक्तांनी संस्थेतील ससे, गिनीपिग व मूषक (Mice) यांच्या शेडना भेट देऊन तेथील व्यवस्थापनाबाबत महत्त्वपूर्ण तांत्रिक मार्गदर्शन केले. याप्रसंगी संस्थेचे सहआयुक्त डॉ. याह्याखान पठाण यांनी चालू प्रकल्पासह भविष्यात प्रस्तावित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती मा. आयुक्तांना दिली.

या भेटीदरम्यान उपायुक्त डॉ. अनिल देशपांडे, सहाय्यक आयुक्त डॉ. माधव सादगिरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता श्री. गुरुसिद्ध नाईक, कंत्राटदार श्री. अजय पटणी आणि संस्थेतील इतर अधिकारी उपस्थित होते.

लघुप्राणी विभागाच्या आधुनिकीकरणामुळे पशुवैद्यकीय लस निर्मिती व त्यांच्या चाचणी प्रक्रियेत लक्षणीय सुधारणा होणार असून, पशुधनाला अधिक सुरक्षित व गुणवत्तापूर्ण लसींचा पुरवठा करणे शक्य होईल, असा विश्वास डॉ. देवरे यांनी व्यक्त केला.







# पशुसंवर्धन आयुक्तांकडून मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र, खडकीची पाहणी



**पुणे**: पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त मा. डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.) यांनी खडकी येथील मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्राला भेट देऊन कामकाजाची सविस्तर पाहणी केली. या भेटीदरम्यान त्यांनी केंद्रातील विविध विभागांची पाहणी करून उपस्थित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना व मार्गदर्शन केले.

आयुक्तांनी केंद्रातील परिसराची स्वच्छता व उपलब्ध सोयी-सुविधांचा आढावा घेतला. यामध्ये प्रामुख्याने ब्रूडिंग हाऊस, ग्रोविंग आणि लेइंग हाऊस, शीतगृह, सेटर रूम, हॅचर रूम आणि लसीकरण कक्ष यांचा समावेश होता.

या केंद्राची कार्यक्षमता समाधानकारक असून, सध्या येथे दरमहा सरासरी २२,००० अंडी उत्पादित केली जात आहेत. त्यातून सुमारे १७,००० एक दिवसीय पिल्लांची निर्मिती होऊन त्यांची विक्री थेट शेतकरी व पशुपालकांना केली जाते. यामुळे ग्रामीण भागातील कुक्कुटपालन व्यवसायाला मोठी चालना मिळत असल्याचे निरीक्षण आयुक्तांनी नोंदवले.

केंद्रात सुरू असलेल्या कुक्कुटपालन प्रशिक्षणाबाबत आयुक्तांनी विशेष रस दाखवला. त्यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थींशी संवाद साधला. प्रशिक्षणार्थींना खाद्य व्यवस्थापन, लसीकरण व औषधोपचार यांसारखी दैनंदिन कामे स्वतः हाताने करण्याची संधी दिली जाते. या प्रात्यक्षिक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन ते भविष्यातील उद्योजकतेसाठी तयार होत आहेत. सध्या प्रत्येक तुकडीत ६० ते ७० विद्यार्थी प्रशिक्षण घेत असून, पुढील बॅचसाठी तब्बल ३०० पेक्षा जास्त विद्यार्थी प्रतीक्षा यादीवर आहेत.






# पशुसंवर्धन विभागात 'मोबाईल डायग्नोस्टीक लॅबोरेटरी व्हॅन' दाखल

**पुणे:** महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाला 'राष्ट्रीय कृषी विकास योजने' अंतर्गत अत्याधुनिक मोबाईल डायग्नोस्टीक लॅबोरेटरी व्हॅन प्राप्त झाली आहे. या सुविधेमुळे आता क्षेत्रीय स्तरावर पशुधनाचे रोगनिदान करण्यासाठी नमुने संकलन करणे व त्यांची तात्काळ तपासणी करणे शक्य होणार आहे. मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.) यांनी नुकतीच विभागीय रोग अन्वेषण विभाग, पुणे येथे भेट देऊन या अत्याधुनिक मोबाईल डायग्नोस्टीक लॅबोरेटरी व्हॅनची सविस्तर पाहणी केली. या सुविधेमुळे पशुधनावर येणाऱ्या संकटांचे वेळेत निवारण करण्यास मोठी मदत होणार असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

अत्याधुनिक मोबाईल डायग्नोस्टीक लॅबोरेटरी व्हॅनमध्ये नमुने संकलन व प्राथमिक चाचण्यांसाठी आवश्यक असलेली यंत्रणा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सहआयुक्त पशुसंवर्धन (रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे) डॉ. अंकुश परिहार यांनी आयुक्त महोदयांना या व्हॅनच्या तांत्रिक कार्यक्षमतेबद्दल सविस्तर माहिती दिली. या फिरत्या अत्याधुनिक मोबाईल डायग्नोस्टीक लॅबोरेटरीमुळे दुर्गम भागातील पशुपालकांच्या पशुधनाचे रोगनिदान करुन आवश्यक पशुवैद्यकीय तपासणीची सुविधा अधिक गतिमान होणार आहे.

पाहणी दरम्यान डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "पशुसंवर्धन विभागामध्ये रोग अन्वेषणाचे कार्य अत्यंत महत्त्वाचे असून, या नवीन सुविधेमुळे हे काम आगामी काळात अधिक प्रभावीपणे व वेगाने होईल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच विभागाच्या या नवीन उपक्रमाला त्यांनी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी पशुसंवर्धन विभागातील सहआयुक्त पशुसंवर्धन, डॉ. याहयाखान पठाण (आयव्हीबीपी), उपआयुक्त पशुसंवर्धन (रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे) डॉ. नयना देशपांडे, उपआयुक्त पशुसंवर्धन (रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे) डॉ. सुनील लहाने तसेच विभागातील इतर अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सुविधेमुळे राज्यातील पशुधनाच्या आरोग्याचे रक्षण करण्यास व पशुपालकांचे आर्थिक नुकसान टाळण्यास मोलाची मदत होणार आहे.

# दुधनी येथील सिद्धरामेश्वर महायात्रेत जातिवंत खिल्लार जनावरांचे प्रदर्शन









**अक्कलकोट (सोलापूर):** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अक्कलकोट तालुक्यातील **दुधनी** येथे सिद्धरामेश्वर महायात्रेनिमित्त खिल्लार जनावरांचा भव्य बाजार भरला होता. सोलापूर जिल्ह्यासह कर्नाटक राज्यातून मोठ्या प्रमाणात पशुपालक आपले जातिवंत खिल्लार पशुधन घेऊन या यात्रेत सहभागी झाले होते.

यात्रा कमिटीतर्फे जातिवंत जनावरांना प्रोत्साहन देण्यासाठी पशुप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. पशुसंवर्धन विभागामार्फत या प्रदर्शनातील सर्वोत्कृष्ट व शुद्ध खिल्लार जातीच्या जनावरांची शास्त्रोक्त पद्धतीने निवड करण्यात आली. या बाजारात महाराष्ट्रासह शेजारील कर्नाटक राज्यातील पशुपालकांचीही मोठी गर्दी दिसून आली. या उपक्रमामुळे खिल्लार जातीच्या संवर्धनाला चालना मिळत असून, उत्कृष्ट जनावरांच्या पैदाशीसाठी पशुपालकांना प्रोत्साहन मिळाले आहे.

दरम्यान, श्री सिद्धरामेश्वर यात्रा हा एक अत्यंत पवित्र व महत्त्वाचा धार्मिक उत्सव आहे, जो प्रत्येक वर्षी दुधणी, तालुका अक्कलकोट येथे साजरा केला जातो. श्री सिद्धरामेश्वर हे अक्कलकोट येथील प्रमुख दैवत असून, त्यांचे येथील स्थान दक्षिण महाराष्ट्रातील भक्तांसाठी अत्यंत पवित्र मानले जाते. श्री सिद्धरामेश्वर हे भगवान शिवाचे स्वरूप मानले जातात व त्यांच्या वास्तव्य स्थानाचे महत्त्व भक्तांसाठी अपार आहे.

# जळगाव जिल्हा प्रशासनद्वारा आयोजित खान्देश कृषी संस्कृती व पशु प्रदर्शनी महोत्सवाला शेतकरी-पशुपालकांचा प्रतिसाद

**जळगाव:** जिल्हा प्रशासन जळगावकडून आयोजित खान्देश कृषी संस्कृती व पशु प्रदर्शनी महोत्सवाला रविवार (दि.०१) पासून सुरुवात झाली. या महोत्सवात विविध जातीचे बैल, दुभत्या गायी, म्हैशी यासह शेळ्या, मेंढ्या, कोंबड्यादेखील प्रदर्शनात सहभागी झाल्या होत्या. पशु प्रदर्शनात लातुरच्या लालकंधारी गायीने प्रथम क्रमांक मिळवला.

पशु प्रदर्शनात विविध जातींचे धष्टपुष्ट बैल, दुभत्या गाई, म्हशी, पारडे-वासरे, शेळ्या-मेंढ्या, पक्षी यांचे प्रदर्शनात पशुपालकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. विविध जातींच्या पशुपक्ष्यांची जिल्ह्याबाहेरील तज्ज्ञ समितीकडून परीक्षण करुन निवड करण्यात आली. बक्षीसप्राप्त पशुपालकांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देवून गौरविण्यात आले.

कृषी प्रदर्शनात आधुनिक शेती अवजारे, ठिबक सिंचन प्रणाली आणि सेंद्रिय शेतीचे विविध स्टॉल्स लावण्यात आले आहेत. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत महिला बचत गटांनी तयार केलेल्या स्थानिक उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात आली. महोत्सवाच्या तीन दिवसांत तज्ज्ञ डॉक्टरांकडून पशुसंवर्धन आणि कृषी शास्त्रज्ञांकडून पीक नियोजनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.





# जळगाव जिल्हा प्रशासनद्वारा आयोजित खान्देश कृषी संस्कृती व पशु प्रदर्शनी
















# कोडोलीच्या सुपुत्राचा राष्ट्रीय स्तरावर गौरव

## उस्मानाबादी शेळी संवर्धनासाठी 'NBAGR' कडून विशेष सन्मान

**सातारा:** जिल्ह्यातील कोडोली गावचे प्रगतशील शेतकरी व पशुपालक श्री. रामचंद्र केशव जाधव यांनी उस्मानाबादी शेळी संवर्धन व पैदास क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आहे.

राष्ट्रीय पशु अनुवंशिक संसाधन ब्युरो (ICAR-NBAGR) यांच्या वतीने नवी दिल्ली येथे मा. केंद्रीय कृषी मंत्री श्री. शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते त्यांना नुकतेच सन्मानित करण्यात आले. श्री. जाधव यांनी गेल्या अनेक वर्षांपासून उस्मानाबादी या देशी शेळीच्या जातीचे शुद्ध स्वरूप टिकवण्यासाठी आणि तिची उत्पादकता वाढवण्यासाठी विशेष परिश्रम घेतले आहेत. केवळ व्यावसायिक दृष्टिकोन न ठेवता, शास्त्रीय पद्धतीने संगोपन आणि अनुवंशिक गुणधर्म जतन करण्यावर त्यांनी भर दिला. त्यांच्या याच योगदानामुळे त्यांना हा मानाचा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे.

**महाराष्ट्र पशुवैभवासाठी नवी दिशा:** उस्मानाबादी शेळी ही महाराष्ट्राची शान मानली जाते. दुष्काळी भागातही तग धरण्याची क्षमता व उत्तम रोगप्रतिकारशक्ती यामुळे ही जात पशुपालकांमध्ये लोकप्रिय आहे. श्री. जाधव यांना मिळालेला हा पुरस्कार राज्यातील इतर उस्मानाबादी शेळीपालकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

या गौरवामुळे देशी पशुधनाच्या संवर्धनाला मोठी चालना मिळेल, असा विश्वास पशुवैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे.

सदर पुरस्कार मिळण्याच्या त्यांच्या मोलाच्या कामगिरीमध्ये त्यांना महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर याचे कुलगुरू मा. डॉ. नितीन पाटील, माजी विस्तार संचालक डॉ. अनिल भिकाने, तसेच संचालक विस्तार डॉ. सचिन बोंडे, संचालक (संशोधन) डॉ. नितीन कुरकुरे, संचालक शिक्षण व अधिष्ठाता डॉ. उपाध्ये तसेच क्रांतीसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय शिरवळ येथील सहयोगी अधिष्ठाता डॉ. विकास वासकर तसेच डॉ. गोकुळ सोनवणे, डॉ. शेंडे, डॉ. शेलार यांचे व जाधव यांचे आई-वडील, दोन्ही भावांचे संपूर्ण कुटुंब तसेच मा. ऋषी कुमार फुले सर यांचेही फार मोलाचे योगदान लाभले

# राज्यात १३ फेब्रुवारीपासून 'लाळ खुरकत' लसीकरण मोहिमेची आठवी फेरी; पशुसंवर्धन आयुक्तांचे काटेकोर नियोजनाचे आदेश




**पुणे:** पशुधनाला लाळ खुरकत (एफएमडी) या रोगापासून संरक्षित करण्यासाठी राज्यात १३ फेब्रुवारी २०२६ ते २९ मार्च २०२६ या कालावधीत लसीकरणाची आठवी फेरी राबवण्यात येणार आहे. मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.) यांनी या मोहिमेच्या पार्श्वभूमीवर मार्गदर्शक सूचना जारी केल्या असून, मोहिमेत पारदर्शकता व वेग राखण्याचे निर्देश दिले आहेत.

मोहिमेचे नियोजन करताना आयुक्तांनी स्पष्ट केले की, मुख्य लसीकरण कार्यक्रम पहिल्या ३० दिवसांत प्राधान्याने पूर्ण करायचा आहे. त्यानंतर उर्वरित १५ दिवसांमध्ये 'मॉप अप' फेरी राबवून, सुटलेल्या पशुधनाचे लसीकरण पूर्ण केले जाईल. ही संपूर्ण प्रक्रिया केंद्र शासनाच्या मानक कार्यप्रणालीनुसार पार पाडली जाणार आहे.

यावेळच्या मोहिमेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे लसीकरण केल्यावर त्याच ठिकाणी एनडीएलएम अप (NDLM) वर फोटो अपलोड करणे अनिवार्य करण्यात आले आहे. दररोज ५० लसीकरणांमागे एक लसीकरणकर्ता, डोंगराळ भागात दररोज ३० लसीकरणांमागे एक लसीकरणकर्ता याप्रमाणे खाजगी लसीकरणकर्त्यांची नेमणूक प्राधान्याने करण्याचे निर्देश मा. आयुक्त पशुसंवर्धन यांनी दिले आहेत.

लसीकरणासोबतच पशुधनाच्या आरोग्याकडे विशेष लक्ष दिले जाणार आहे. नुकताच पुरवठा झालेल्या 'अल्बेंड्याझोल' औषधाद्वारे एक वर्षाखालील वासरांचे जंत निर्मूलन प्राधान्याने करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, ठराविक गावांमधून 'रक्तजल' (Serum) नमुने संकलित करून ते रोग अन्वेषण विभागाकडे तात्काळ सादर करावे लागणार आहेत.

मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दैनंदिन अहवाल सकाळी ११ वाजेपर्यंत ईमेलद्वारे सादर करणे बंधनकारक आहे. या मोहिमेची माहिती प्रत्येक पशुपालकापर्यंत पोहोचवण्यासाठी वर्तमानपत्रे, रेडिओ व टीव्ही यांसारख्या माध्यमांतून व्यापक स्तरावर जनजागृती करण्यात येणार आहे. आपल्या पशुधनाचे लसीकरण करून घेऊन या राष्ट्रीय मोहिमेत सहकार्य करावे, जेणेकरून संभाव्य आर्थिक नुकसान टाळता येईल, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे.

# पशुपालन क्षेत्रासाठी मोठी घोषणा:

# पशुवैद्यकीय पायाभूत सुविधांच्या विकासाला सरकारचे प्राधान्य



केंद्रीय अर्थसंकल्प २०२५-२६ मध्ये केंद्र सरकारने ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या पशुपालन आणि दुग्धव्यवसाय क्षेत्रासाठी मोठी तरतूद केली आहे. पशुवैद्यकीय पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण, रोग नियंत्रण व संशोधनासाठी निधीत भरघोस वाढ करण्यात आली असून, या क्षेत्रासाठी एकूण ४,८४०.४० कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे.

**पायाभूत सुविधा व रोग नियंत्रणावर भर:** पशुधनातील 'लाळ्या खुरकुत' व 'ब्रुसेलोसिस' सारख्या गंभीर आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी 'पशुधन आरोग्य व रोग नियंत्रण कार्यक्रमा'ला (LHDCP) ३,८८० कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे लसीकरण मोहिमेला गती मिळणार असून, पशुधनाची हानी टाळण्यास मदत होईल. तसेच, शेतकऱ्यांच्या दारात उपचार पोहोचवण्यासाठी 'मोबाईल व्हेटर्नरी युनिट्स' अधिक सक्षम करण्यात येणार आहेत.

दुग्धव्यवसाय व मांस प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी 'पशुपालन पायाभूत सुविधा विकास निधी' (AHIDF) आता ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढवण्यात आला आहे. या २९,६१० कोटी रुपयांच्या निधीमुळे पशुखाद्य संयंत्रे व प्रक्रिया उद्योगात खाजगी गुंतवणुकीला मोठ्या प्रमाणात वाव मिळणार आहे.

देशातील पशुवैद्यकीय डॉक्टरांची कमतरता दूर करण्यासाठी नवीन महाविद्यालये व प्रयोगशाळा स्थापन करण्याचा प्रस्ताव या अर्थसंकल्पात आहे. विशेषतः प्राणी आरोग्य संस्था (१०० कोटी) व प्रजाती सुधारणा संस्था (५० कोटी) यांसारख्या संस्थांच्या माध्यमातून पशुधनाची गुणवत्ता सुधारण्यावर भर दिला जाणार आहे.

| घटक | वाटप (कोटी रुपयांत) |
|---|---|
| प्राणी आरोग्य संस्था | ₹१०० कोटी |
| लहान पशुधन संस्था | ₹५० कोटी |
| प्रजाती सुधारणा संस्था (Breed Improvement) | ₹५० कोटी |
| पायाभूत सुविधा विकास निधी | ₹४६० कोटी |
| भारतीय पशुवैद्यकीय परिषद (VCI) | ₹१० कोटी |

केवळ आजारांवर उपचार करण्यापेक्षा, प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देण्याला प्राधान्य देण्यात येत असून, ही गुंतवणूक भारताला ५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरेल. यामुळे पशुपालकांचे उत्पन्न वाढण्यास व पशुवैद्यकीय सेवांचे जाळे अधिक विस्तारण्यास मदत होणार आहे.




श्री क्षेत्र बहिरम जि. अमरावती येथे पशुप्रदर्शनी व शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यामध्ये निवड झालेल्या पशुपालकांना लोकप्रतिनिधींच्या हस्ते बक्षीस वितरण करून गौरविण्यात आले.

# पिंपळगाव बराभाती येथे पशुवैद्यकीय आरोग्य शिबिर संपन्न





**अर्जुनी मोरगाव (गोंदिया):** पशुसंवर्धन विभागाच्या वतीने अर्जुनी मोरगाव तालुक्यातील पिंपळगाव बराभाती येथे विशेष कार्यमोहीम शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये परिसरातील पशुधनाची आरोग्य तपासणी करून विविध उपचार करण्यात आले. प्रामुख्याने पशुपालकांसमोर मोठी समस्या असलेल्या वंध्यत्व निर्मूलनावर विशेष भर देण्यात आला, तसेच आजारी जनावरांवर मोफत औषधोपचार करण्यात आले.

जनावरांच्या सुदृढ आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या जंत निर्मूलन मोहिमेअंतर्गत पशुधनाला औषध पाजण्यात आले. या उपक्रमामुळे पशुपालकांमध्ये जनजागृती निर्माण झाली असून, गावात राबवण्यात आलेल्या या आरोग्य मोहिमेचे शेतकऱ्यांनी स्वागत केले आहे. पशुधनाची उत्पादकता वाढवण्यासाठी अशा शिबिरांचा मोठा फायदा होत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# पडेगाव येथे तीन दिवसीय शेळीपालन प्रशिक्षण संपन्न

## १२० लाभार्थ्यांनी गिरवले आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे

**छत्रपती संभाजीनगर:** राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागांतर्गत असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, पडेगाव येथे आयोजित करण्यात आलेले तीन दिवसीय निवासी शेळीपालन प्रशिक्षण नुकतेच यशस्वीरित्या संपन्न झाले. या प्रशिक्षण शिबिरात जिल्ह्यातील व विभागातील सुमारे १२० लाभार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून शेळीपालनातील आधुनिक व्यवसायाचे तंत्र आत्मसात केले.

या तीन दिवसांच्या कालावधीत तज्ज्ञ प्रशिक्षकांनी शेळीपालन व्यवसायाला आधुनिक जोड कशी द्यावी, यावर सखोल मार्गदर्शन केले. यामध्ये प्रामुख्याने उस्मानाबादी, संगमनेरी आणि इतर सुधारित जातींच्या शेळ्यांची निवड व वैशिष्ट्ये, शेळ्यांसाठी पौष्टिक चारा, मुरघास निर्मिती आणि अझोला उत्पादनाचे महत्त्व, शेळ्यांना होणारे विविध आजार, त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय व वेळेवर लसीकरणाचे वेळापत्रक. बंदिस्त व अर्ध-बंदिस्त शेळीपालनासाठी गोठ्याची शास्त्रीय रचना, शेळीपालनासाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय अनुदानित योजना व कर्ज प्रक्रियेची माहिती देण्यात आली.

केवळ वर्गातील व्याख्याने न देता, पडेगाव प्रक्षेत्रावर प्रत्यक्ष भेट देऊन लाभार्थ्यांना शेळ्यांचे निरीक्षण, वजन करणे, औषधोपचार व वैरण कापणी यांबाबत प्रात्यक्षिक ज्ञान देण्यात आले. यामुळे नवीन व्यवसाय सुरू करणाऱ्या तरुणांमध्ये व शेतकऱ्यांमध्ये मोठा आत्मविश्वास निर्माण झाला आहे. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या १२० लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.








# रांजणी प्रक्षेत्रातून १७.७० मेट्रिक टन मुरघासाची विक्री

**रांजणी (सांगली):** पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या रांजणी (ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली) येथील प्रक्षेत्रावरून सुमारे १७.७० मेट्रिक टन मुरघासाची विक्री करण्यात आली आहे. या विक्रीतून महामंडळाला १ लाख १५ हजार ५० रुपये इतका महसूल प्राप्त झाला असल्याची माहिती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. शितलकुमार मुकणे यांनी दिली.

### पशुपालकांसाठी हक्काचा चारा

दुभत्या जनावरांसाठी तसेच मेंढ्या व शेळ्यांसाठी 'मुरघास' हा एक अत्यंत पौष्टिक आणि खात्रीशीर चारा मानला जातो. विशेषतः उन्हाळ्यात किंवा चारा टंचाईच्या काळात पशुपालकांना सकस चारा उपलब्ध करून देण्यासाठी महामंडळाच्या वतीने प्रक्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर मुरघासाची निर्मिती केली जाते.

### गुणवत्ता आणि रास्त दर

रांजणी प्रक्षेत्रावर तयार करण्यात आलेला हा मुरघास उच्च दर्जाचा असून, तो पशुपालकांना रास्त दरात उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामुळे सांगली व परिसरातील पशुपालकांना आपल्या जनावरांच्या खाद्याचा प्रश्न सोडवण्यास मोठी मदत झाली आहे.

### मुरघासाचे फायदे:

- **दुग्धोत्पादनात वाढ:** हिरव्या चाऱ्याची पौष्टिकता टिकून राहिल्याने जनावरांच्या दूध उत्पादनात वाढ होते.
- **साठवणूक सुलभ:** कमी जागेत जास्त चारा वर्षभर साठवून ठेवता येतो.
- **पचण्यास सोपा:** मुरघासामध्ये आंबवण प्रक्रियेमुळे पशुधनाला तो पचण्यास हलका असतो.

### व्यवस्थापनाचा पुढाकार

डॉ. शितलकुमार मुकणे यांच्या मार्गदर्शनाखाली महामंडळाच्या विविध प्रक्षेत्रांवर चारा उत्पादनाचे नवनवीन उपक्रम राबवले जात आहेत. "शेतकऱ्यांनी व पशुपालकांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून स्वतःच्या शेतातही मुरघास तयार करावा, जेणेकरून चारा टंचाईवर मात करता येईल," असे आवाहनही यावेळी डॉ. मुकणे यांनी केले. या उपक्रमामुळे महामंडळाच्या महसुलात भर पडण्यासोबतच स्थानिक पशुपालकांना गुणवत्तापूर्ण चारा वेळेवर उपलब्ध झाला आहे.



# गाढवांसाठी लसीकरण, जंतनिर्मूलन व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन






धर्मा डंकी सँक्चुअरी, सावरगाव (ता. बिलोली, जि. नांदेड) व तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, पूर्णा (जि. परभणी) यांच्या संयुक्त विद्यमाने गाढवांसाठी लसीकरण, जंतनिर्मूलन व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण २३५ गाढवांची तपासणी व उपचार करण्यात आले. तसेच, 'ग्लँडर्स' रोगाच्या निदानासाठी रक्ताचे नमुनेही गोळा करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे संचालक श्री. महाजन यांच्यासह पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# जरोडा तांडा येथे पशुपालनविषयक जनजागृती अभियान संपन्न





**किनवट (नांदेड):** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत मौजे जरोडा तांडा येथे आदिवासी पशुपालकांसाठी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

भारतीय कृषी अनुसंधान परिषद (ICAR), पशुवैद्यकीय महाविद्यालय (उदगीर) व पशुसंवर्धन विभाग (जि. प. नांदेड) यांच्या वतीने हा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी आमदार भीमराव केराम यांची प्रमुख उपस्थिती होती.

गाई-म्हशींच्या पोटात अखाद्य वस्तू गेल्यामुळे होणाऱ्या विकृतींना प्रतिबंध करणे, हा या उपक्रमाच्या आयोजनाचा प्रमुख उद्देश होता. यावेळी पशुंना अखाद्य वस्तूंपासून वाचवण्यासाठी मिश्रण व चुंबक गोळी (Magnet Bolus) खाऊ घालण्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात येऊन मिश्रण व गोळीचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे दुर्गम भागातील पशुपालकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली आहे.

# माध्यमांनी घेतलेली दखल

**लोकमत**

## शब्दांशिवाय संवाद आणि अटींशिवाय प्रेम...



"खरे प्रेम आणि मैत्री समजून घेण्यासाठी भाषेची गरज नसते, फक्त दोन निरागस मनांची भेट पुरेशी असते. एका बाजूला निरागस बालपण आणि दुसऱ्या बाजूला मुक्या प्राण्याची माया. हे दृश्य पाहून जाणीव होते की, निसर्गाच्या सानिध्यात मिळणारा आनंद कोणत्याही महागड्या खेळण्यापेक्षा कितीतरी पटीने मोठा आहे. शहरातील शिवतीर्थ मैदानावर आयोजीत खान्देश कृषी संस्कृती व पशुप्रदर्शना दरम्यान एका निरागस चिमुकल्याची वासरासोबतची ही निरागस मैत्री दिसून आली. (छाया : अजय पाटील)

**पुण्य नगरी**

## लातुरच्या लाल कंधारी गायीचा खान्देश कृषी, पशु प्रदर्शनात प्रथम क्रमांक

**जळगाव** : जिल्हा प्रशासन जळगाव कडून आयोजित खान्देश कृषी संस्कृती व पशु प्रदर्शनी महोत्सवाला रविवार पासून सुरुवात झाली. या महोत्सवात विविध जातीचे बैल, दुभत्या गायी, म्हैशी यासह शेळ्या, मेंढ्या, कोंबड्यादेखील प्रदर्शनात आल्या आहे. पशु प्रदर्शनात लातुरच्या लाल कंधारी गायीने प्रथम क्रमांक मिळवला आहे.



पशु प्रदर्शनात विविध जातींचे धष्टपुष्ट बैल, दुभत्या गाई, म्हशी, पारडे-वासरे, शेळ्या-मेंढ्या, पक्षी यांचे प्रदर्शनात पशुपालकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. विविध जातींच्या पशूपक्षींची जिल्ह्याबाहेरील तज्ज्ञ समितीकडून परीक्षण करुन निवड करण्यात आली. बक्षीसप्राप्त पशुपालकांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देवून गौरविण्यात आले. कृषी प्रदर्शनात आधुनिक शेती अवजारे, ठिबक सिंचन प्रणाली आणि सेंद्रिय शेतीचे विविध स्टॉल्स लावण्यात आले आहेत. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत महिला बचत गटांनी तयार केले… उत्पादनांना हक्का… उपलब्ध करून दे… आहे.महोत्सवाच्या ती… तज्ज्ञ डॉक्टरांकडून पशु… आणि कृषी शास्त्रज्ञांकडून प… नियोजनाबाबत मार्गदर्शन केले जात आहे.

**पुण्य नगरी**

## खान्देश कृषी संस्कृती पशू प्रदर्शनीचे रविवारी उद्घाटन

जळगाव: जिल्हा प्रशासन, जळगाव यांच्या वतीने 'खान्देश कृषी संस्कृती व पशुप्रदर्शन २०२६'या भव्य प्रदर्शनाचे आयोजन दि. ०१ ते ०५ फेब्रुवारी दरम्यान शिवतीर्थ मैदान, कोर्ट चौक, जळगाव येथे करण्यात आले आहे. दररोज सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत हे प्रदर्शन नागरिकांसाठी खुले राहणार आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमास विविध मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

खान्देशातील कृषी परंपरा, लोकसंस्कृती, पशुधन आणि ग्रामीण जीवनशैलीचे दर्शन घडविणे हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश आहे. प्रदर्शनात कृषी व पशुप्रदर्शन, महिला बचत गट उत्पादनांचे विक्री-व-दर्शन, सांस्कृतिक कार्यक्रम, तसेच खान्देशी खाद्य महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. प्रदर्शनात कृषी निविष्ठा, अवजारे, तंत्रज्ञान, शासकीय योजनांची माहिती, हस्तकला व गृहउद्योग उत्पादनांचे आकर्षक दालन, शेतकरी मार्गदर्शन सत्र, उद्योजकता विकास व महिला सक्षमीकरणाशी संबंधित उपक्रम राबविण्यात येणार आहेत. तसेच पारंपरिक लोककला, लोकनृत्य, लोकसंगीत आणि अस्सल महाराष्ट्रीयन खाद्यपदार्थांची मेजवानी नागरिकांना अनुभवता येणार आहे.

प्रदर्शनाच्या कालावधीत दररोज सायंकाळी सांस्कृतिक मेजवानी आयोजित करण्यात आली असून, नामवंत गायक, अभिनेते, नृत्यकलाकार, लोककलावंत यांचे कार्यक्रम सादर होणार आहेत. यामध्ये पोवाडा, लावणी, कविसंमेलन, लोकनाट्य, शाहिरी कार्यक्रम व विविध सांस्कृतिक सादरीकरणांचा समावेश आहे. खान्देशाची समृद्ध कृषी परंपरा, संस्कृती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण परिचय करून देणारे हे प्रदर्शन नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासन, जळगाव यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## जि. प. अमरावती व पं. स. चांदुर बाजार यांचे संयुक्त विद्यमाने भव्य पशुप्रदर्शनी व शेतकरी मेळाव्याचे आयोजन

विदर्भ प्रकाश प्रतिनिधी/

दि. 16 जाने रोजी पशुसंवर्धन विभाग जि.प. अमरावती व प. स. चांदुर … संयुक्त विद्यमाने श्रीक्षेत्र … पशुप्रदर्शनी व … आयोजन … नीला खुप … ति गाई, … रेडे, … ब्या … ा व … मार्फत … जनेचा … दर्शनीचे … ण तायडे, … चांदूर बाजार … अध्यक्ष स्थान डॉ. … कापटे जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय जि. अमरावती यांनी भूषविले. अशा





प्रकारच्या भव्य कार्यक्रमाचे आयोजन पशुपालकांमध्ये पशु संगोपनाला प्रोत्साहन देतात व पशुपालन हा शेतीला अत्यंत चांगला जोड व्यवसाय आहे असे आमदार महोदयांनी आपल्या भाषणात सांगितले पशुप्रदर्शनीला यशस्वी करण्याकरिता पशुसंवर्धन विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी डॉ. पुरुषोत्तम सोळंके, स.आ.प.स अमरावती डॉ. पूनम नागापुरे सआपस अचलपूर, डॉ प्रतिक बोडखे सआपस चांदूरबाजार, विजय देशमुख सआपस चांदुर रेल्वे, डॉ. सुधीर चौधरी वरुड , डॉ.निलेश मानखडे गट विकास अधिकारी चांदूरबाजार, डॉ मिलींद राऊत , व डॉ.आनंद बोरकर यांचा समावेश होता पशुप्रदर्शनीमध्ये विजेत्या पशुपालकांना ट्रॉफी प्रमाणपत्र व बक्षीसांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले प्रथम पारितोषिक सर्वोत्कृष्ट दुधाळ गाय हे पशुपालक श्री विजय रमेशराव कुरवाडे रा.खबित ता. आष्टी यांनी पटकावले त्यांना रुपये दहा हजार एवढे बक्षिसांची रक्कम देण्यात आली पंचक्रोशीत पशुपालकांना प्रोत्साहन देण्यासाठी व उच्च प्रतीचे पशु चे संगोपन करण्यासाठी पशुसंवर्धन विभाग दरवर्षी अशा प्रकारच्या भव्य पशुप्रदर्शनीचे व शेतकरी मेळाव्याचे आयोजन करत असतात

२०२६ MY अहिल्यानगर www.pudhari.com pudhari/news 020/67639900 पुढारी

# मूरघास निर्मितीतून मिळतोय संसाराला आधार!

## ग्रामीण तरुणांना नवा रोजगाराचा मार्ग; जनावरांना पोषक तर शेतकऱ्यांना परवडणार

**शशिकांत पवार**



नगर तालुका : नगर तालुक्यातील बहुतांशी नागरिकांची उपजीविका शेतीवर अवलंबून आहे. शेती व त्याला जोड व्यवसाय म्हणून दूध उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. निसर्गाच्या लहरीपणाचा नेहमीच शेतीच्या उत्पन्नावर परिणाम होतो. परंतु दुग्ध व्यवसायामुळे अनेक शेतकऱ्यांच्या संसाराचा गाडा कसाबसा हाकलला जात आहे. दुग्ध व्यवसायासाठी आवश्यक असणारा चारा म्हणून मुरघासनिर्मिती गेल्या

> गेल्या आठ वर्षांपासून आम्ही दहा जणांचा गट करून मुरघासनिर्मिती क्षेत्रात उतरलो आहोत. त्यामधून कुट्टी मशीन, ट्रॅक्टर व इतर स्वतःचे साहित्य खरेदी केले आहे. अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, बीड, वैजापूर, गंगापूर, आष्टी अशा जवळपास संपूर्ण महाराष्ट्रभर मुरघासनिर्मिती करून देण्यासाठी आम्ही शेतकऱ्यांच्या बांधावर जात असतो. त्यातून आम्हालाही रोजगार उपलब्ध होत असून, शेतकऱ्यांचाही फायदा होत आहे.
> - सागर गाडेकर, मजूर, गोमाळवाडी, ता. नेवासा

> मुरघासात प्रथिने ऊर्जा व खनिजे चांगल्या प्रमाणात असल्याने उच्च पोषण मूल्य जनावरांसाठी उपयुक्त असतात. उन्हाळ्यातही हिरव्या चाऱ्याचा पर्याय मिळतो. तरुणांना रोजगार यावरोबर पशुपालक व जनावरांसाठी मुरघास उपयुक्त ठरत असतो.
> - डॉ. अनिल कराळे, तालुका पशुधन विकास अधिकारी

> साधारणपणे रसाळ हिरव्या व जास्त साखर असलेल्या चाऱ्याच्या पिकापासून मुरघास तयार केला जातो. एकाच पिकापेक्षा मिश्र पीक मुरघास जास्त चांगला ठरतो. दुधाळ अवस्थेत पिकाची कापणी केल्यास मुरघासाची गुणवत्ता उत्तम राहते. मुरघासामुळे दुधाच्या उत्पादनात वाढ होते. त्यामुळे पशुपालकांसाठीही मुरघास फायदेशीर ठरत आहे.
> - शरद तोडमल, पशुपालक, शेतकरी

काही तरुण हे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन रोजंदारीने मुरघासनिर्मिती करून देत असतात. यामध्ये मोठ्या प्रमाणात तरुणांच्या हाताला रोजगार उपलब्ध झाला आहे.

मुरघास निर्मितीच्या प्रक्रियेमुळे तरुणांना रोजगार उपलब्ध झाला, तसेच चारा कापण्यासाठी ... वाहतुकीसाठी ... प्लॅस्टिक बॅग ... यांनाही काम मिळू लागले आहे. त्यामुळे मुरघासनिर्मिती हा उपक्रम ग्रामीण रोजगारनिर्मितीची साखळी निर्माण करणारा ठरत आहे.

मुरघासाचा उपयोग जनावरांबरोबर शेतकऱ्यांसाठीही फायदेशीर ठरत असल्याने मुरघास निर्मितीकडे शेतकरी ही मोठ्या ... ळल्याचे चित्र तालुक्यात ... ळते.

**माध्यमांनी घेतलेली दखल**

**पुण्य नगरी**

# माथेरानमध्ये अश्वांच्या आरोग्याबाबत विशेष दक्षता

**। पशुसंवर्धन विभागाचा पुढाकार । ग्लॅण्डर, सरा यासारख्या भयंकर रोगांची तपासणी । रक्तचाचणी, एक्स-रे**



**। माथेरान :** माथेरानचा पोशिंदा अशी ज्याची ओळख आहे त्या अश्वांच्या आरोग्याकडे पशुसंवर्धन विभागाचे विशेष लक्ष असून प्रवासी वाहन घोड्याचे आरोग्य सुदृढ राहावे, या हेतूने पशुसंवर्धन विभाग रायगड, पशु शल्यचिकित्सा शास्त्र व क्ष-किरण विभाग, मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ तसेच माथेरान अश्वपाल संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, १५ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता अश्व आरोग्य व शस्त्रक्रिया

तसेच घोड्यांची नसबंदी देखील करण्यात आली.

माथेरान पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी १ येथील आवारात हे शिबीर आयोजित करण्यात आले. जिल्हा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग रायगड येथील उपायुक्त

निवृत्त अधिष्ठाता व ... संचालक डॉ. एल. बी. ... रत्नागिरी जिल्हा पशुसंवर्धन ... डॉ. दत्ता झंझाड, सहायक ... पशुसंवर्धन विभागाचे डॉ. ... गुंजाटे, सहायक प्राध्याप... राजेश रोही, सहयोगी प्रा...

काही सदस्यांनी सांगितले की, प्रवासी घोडा आवरता यावा, यासाठी घोड्यांची नसबंदी करणे महत्त्वाचे असते. यामुळे घोड्याचे आरोग्य देखील सुधारते व आयुष्य देखील वाढते. एकूण १५ घोड्यांची

**देशोन्नती**

# आदर्श गोसेवा प्रकल्पाला शासनाचा 'शुद्ध देशी गोवंश सन्मान' पुरस्कार



**आदर्श गोसेवा केंद्रात १ हजार ४०३ गोवंश!**

आदर्श गोसेवा केंद्राचे म्हैसपूर, आलेगाव आणि सावरगाव येथे गोरक्षण व संवर्धन केंद्र असून यात १ हजार ४०३ गोवंश उपलब्ध असून गोसंवर्धनसाठी अनेक रचनात्मक व सेवाभावी उपक्रम आदर्श गोसेवा केंद्र सातत्याने आयोजित करून गोहत्या बंदीसाठी समाजात जनजागरण करीत आहे. संस्थेच्या या सेवाभावी उपक्रमाची दखल घेत शासनाने जिल्हास्तरीय पुरस्कार प्रदान करून गोसंवर्धनचा सन्मान केला आहे.

**अकोला :** गोरक्षण व गोसंवर्धन सेवा कार्यात पश्चिम विदर्भात लौकिकप्राप्त स्थानिक आदर्श गोसेवा व अनुसंधान प्रकल्प संस्थेस राज्य शासनाचा, गोसेवा आयोग पुरस्कृत मानाचा 'शुद्ध देशी गोवंश सन्मान' पुरस्कार प्राप्त झाला आहे. जिल्ह्यात अनेक वर्षांपासून गोरक्षण व संवर्धन सेवेत सक्रिय असणाऱ्या या सेवाभावी संस्थेच्या सेवा कार्यामुळे हा मानाचा पुरस्कार मिळाला. स्थानिक शास्त्री स्टेडियमवर प्रजासत्ताक सोहळ्यात पालकमंत्री ॲड आकाश फुंडकर यांच्या हस्ते व आ. वसंत खंडेलवाल, जिल्हाधिकारी वर्षा मीना, जि. प. सीईओ अनिता मेश्राम, पोलीस अधीक्षक अर्पित चांडक, मनपा आयुक्त सुनील लहाने, पशुसंवर्धनच्या जिल्हा उपायुक्त डॉ. नीता गोडबोले आदींच्या उपस्थितीत आदर्श प्रकल्पाचे सचिव प्रा विवेक बिडवई यांचा सदर पुरस्कारासह गोवंश सेवा क्षेत्रातील 'श्रेष्ठ राजदूत' प्रमाणपत्र प्रदान करून सन्मान करण्यात आला. या सोहळ्याला आदर्श गोसेवा व अनुसंधान केंद्राचे प्रा. लक्ष्मीनारायण शर्मा, रवी चांडक, दीपक खंडेलवाल, सुरेश खंडेलवाल, राजेश खंडेलवाल, रमाकांत घोगरे यांच्यासह पशुसंवर्धन विभागाचे सहा आयुक्त डॉ. नरेंद्र अरबट, डॉ. साधना घुगे, डॉ गजानन गवई, डॉ राठोड, विस्तार अधिकारी डॉ स्नेहल पाटील, पशुधन विकास अधिकारी डॉ जयंती आगाशे प्रामुख्याने उपस्थित होते.

Akola Edition
Jan 31, 2026 Page No. 2
Powered by: erelego.com

**सकाळ**

फेब्रुवारी २०२६ SakalNews

# गोठ्यात आता कालवडीच

## दूधउत्पादकांसाठी खुशखबर; सिमेनसाठी डीपीसीतून एक कोटी

**सकाळ वृत्तसेवा**

**अहिल्यानगर, ता. ३ :** दूधउत्पादक शेतकऱ्यांच्या गोठ्यातील गायी-म्हशींच्या गोठ्यात आता केवळ कालवडीच जन्म घेणार आहेत. गेल्या दोन महिन्यांपासून कृत्रिम रेतनासाठी वीर्य मात्रा (सिमेन डोस) उपलब्ध करून दिले आहेत. यासाठी जिल्हा नियोजनमधून तब्बल एक कोटी रुपयांचा निधी दिला होता. त्यातून हा प्रयोग राबविला जात आहे.

**सकाळ ★ EXCLUSIVE ★**

राज्यात सर्वाधिक दूधउत्पादनाचा जिल्हा म्हणून अहिल्यानगरची ओळख आहे. या नव्या तंत्रज्ञानामुळे दूधउत्पादक शेतकऱ्यांना मोठा लाभ होणार आहे. सध्या जिल्ह्यात १७ हजार ३११ सिमेन डोस उपलब्ध आहेत. मागणी वाढल्यानंतर आणखी डोस तालुकास्तरावर देण्याचे पशुसंवर्धन विभागाचे नियोजन आहे, अशी माहिती उपायुक्त डॉ. उमेश पाटील यांनी दिली.

सेक्स सॉर्टेड सीमेनमुळे गाईच्या ... ठरत आहे. ... ९० ते ९५ टक्के

कालवडी जन्मण्याची शक्यता असते. दुग्धव्यवसायासाठी कालवड महत्त्वाची असल्याने हे तंत्रज्ञान पशुपालकांसाठी उपयुक्त आहे.

दूधउत्पादक संकरित गोऱ्हा शेती कामासाठी वापरत नाहीत. त्यामुळे तो कत्तलखान्यात जातो. त्यातच गोवंश हत्याबंदी असल्याने त्यांच्या संगोपनाचा मुद्दा ऐरणीवर येतो. काही ठिकाणी या वासरांच्या कत्तलीस परवानगी मिळावी, यासाठी शेतकऱ्यांनी आंदोलनेही केली. नर वासरांमुळे संगोपनाचा खर्च वाढतो. तो भार कमी करण्यासाठी आणि उत्पादनक्षम जनावरांची संख्या वाढवण्यासाठी सेक्स सॉर्टेड सीमेन उपयोगी ठरत आहे.

पशुधनाची विदेशी रक्त टक्केवारी सुधारण्यास मदत होत आहे. पशुपालकांचा खर्च कमी होऊन दूध उत्पादन व उत्पन्नात वाढ होते. नव्या तंत्रज्ञानाचा जास्तीत शेतकऱ्यांना लाभ व्हावा, यासाठी जिल्हा नियोजन समितीतून (सन २०२५-२६) तब्बल एक कोटीचा निधी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकाराातून मिळाला.

**फायदा काय? › दुग्धव्यवसायाला तंत्रज्ञानाची जोड › कालवडी वाढल्याने दूध उत्पादनात वाढ**

> गीर गायी, मुऱ्हा व एचएफ १०० या प्रजातीतील जनावरांसाठी सेक्स सॉर्टेड सिमेन जिल्हा कृत्रिम रेतन केंद्रात उपलब्ध आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पशुपालकांनी नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क करावा.
> -डॉ. अरुण हरिश्चंद्रे, सहायक आयुक्त, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र

> जिल्ह्यातील दुग्धव्यवसाय अधिक फायदेशीर व्हावा, यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत सेक्स सॉर्टेड सिमेन या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. याचा पशुपालकांनी लाभ घ्यावा.
> - डॉ. उमेश पाटील, जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय.



महापशुधन वार्ता

# माध्यमांनी घेतलेली दखल

झुंजार नेता
Fri 06-02-2026
Page No. 6

## शेतकरी व पशुपालकांना केंद्रबिंदू ठेवून प्रदर्शनाची तयारी करा : पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे

### परळीतील महापशुधन एक्स्पोच्या तयारीचा आढावा







लोकाशा
06FEB2026

## मुख्यमंत्री फडणवीस १५ फेब्रुवारीला परळीत

ना. पंकजाताईंच्या नेतृत्वात १३ ते १५ फेब्रुवारीला होणार महापशुधन एक्स्पो प्रदर्शन

ताई बीडसह राज्यातील शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीर उभ्या



लोकप्रश्न
06FEB2026

## परळीत होणार महापशुधन एक्सपो

### मंत्री पंकजा मुंडेंनी घेतला आढावा,तयारी करण्याच्या सूचना

परळी । वार्ताहर

राज्यातील शेतकरी व पशुपालकांना केंद्रबिंदू ठेवून बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे १३ ते १५ फेब्रुवारी या कालावधीत 'महापशुधन एक्स्पो' हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. त्या दृष्टिने प्रदर्शनाच्या आयोजनाची तयारी करावी, असे निर्देश पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले.



... १३ ते १५ फेब्रुवारी या कालावधीत 'महापशुधन एक्स्पो' प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाच्या तयारीचा पशुसंवर्धन मंत्री श्रीमती मुंडे यांनी आढावा घेतला. यावेळी पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रविणकुमार देवरे, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह राज्यातील पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, सशक्त पशुधन हा उद्देश ठेवून या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात यावे. राज्यातील शेतकरी व पान २ वर ⏭

## लाळ-खुरकत निर्मूलनासाठी लसीकरण करा

### पशुसंवर्धनचे सचिव डॉ. रामास्वामी एन., आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे यांचे आवाहन

पुणे : पुढारी वृत्तसेवा

## ...वंदना व अमित नाफडे यांना दिल्ली येथे प्रजासत्ताकदिन सोहळ्याचे आमंत्रण

...ाळा : दरवर्षीप्रमाणे ...ाही राजधानी दिल्ली येथे भारत सरकारच्या वतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी २०२६ रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यावर्षी बुलढाणा जिल्ह्यातून मलकापूर येथील वंदना अमित नाफडे व अमित दिलीप नाफडे यांना या सोहळ्याचे मानाचे आमंत्रण प्राप्त झाले आहे.



मोताळा तालुक्यातील तळणी येथील उभय दांपत्य ह. मु. मलकापूर येथील रहिवासी असून कृषी विकास परिवाराच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, कृषी व ग्रामीण विकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहेत. कृषी विकास परिवाराचे अध्यक्ष दिलीप नाफडे यांच्या नेतृत्वाखाली हा परिवार संपूर्ण महाराष्ट्रात सामाजिक कार्यासाठी परिचित आहे. नॅशनल लाईव्हस्टॉक मिशन अंतर्गत मुरघास (सिलेज) निर्मिती कार्यक्रम प्रभावीपणे पुढे नेण्याचा संकल्प नाफडे दांपत्याने केला असून, त्यासाठी ॲनिमल हसबंड्री इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट स्कीमच्या माध्यमातून बुलढाणा जिल्ह्यात एक नवीन व अत्यंत आवश्यक उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील पशुपालक शेतकऱ्यांना मोठा लाभ होणार आहे. दरम्यन, २५ जानेवारी रोजी दुपारी भारत सरकारचे मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंह यांच्यासोबत नाफडे दांपत्याची भेट व चर्चा होणार आहे. तसेच २६ जानेवारी २०२६ रोजी दिल्ली येथील कर्तव्य पथ येथे आयोजित मुख्य कार्यक्रमात सहभागी होऊन प्रजासत्ताक दिन परेडचे साक्षीदार होण्याची संधी त्यांना मिळणार आहे. तर २७ जानेवारी रोजी दिल्लीतील विविध वरिष्ठ अधिकाऱ्यांशी भेटीगाठी होणार आहेत.

प्रभात

## कोडोलीच्या सुपुत्राचा राष्ट्रीय स्तरावर गौरव

सातारा, दि. २५ (प्रतिनिधी) - कोडोली, ता. सातारा येथील शेतकरी व पशुपालक रामचंद्र केशव जाधव यांनी उस्मानाबादी शेळी संवर्धन आणि पैदास क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आहे. ब्रीड कन्झर्व्हेशनसाठी राष्ट्रीय पशू आनुवंशिक संसाधन ब्युरो (आयसीएआर-एनबीएजीआर) यांच्यावतीने दिल्या जाणाऱ्या पुरस्काराने जाधव यांना नवी दिल्लीत केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



दिल्ली : केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना रामचंद्र जाधव, समवेत मान्यवर.

उस्मानाबादी शेळीच्या जातीचे शुद्ध स्वरूप टिकवून, उत्पादकता वाढवण्यासाठी जाधव यांनी अनेक वर्षे परिश्रम घेतले आहेत. केवळ व्यावसायिक दृष्टिकोन न ठेवता, शास्त्रीय पद्धतीने संगोपन आणि आनुवंशिक गुणधर्म जतन करण्यावर त्यांनी भर दिला. या योगदानामुळे त्यांना या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले.

यासाठी जाधव यांना नागपूर येथील महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू नितीन पाटील, म... डॉ. अनि... संचालक ड... संचालक ... शिक्षण ... उपाध्ये, ...

महारा... उस्मा... भागातही ... ही जात ... पुरस्कार ... या गौरव... विश्वास ...

Satara Edition
Jan 26, 2026 Page No. 9
Powered by: erelego.com


लालकंधारी



# पशुधनाच्या आरोग्याची अग्रदूत

## पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था (IVBP), औंध, पुणे




**डॉ. याहयाखान पठाण**
सहआयुक्त पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, औंध, पुणे
संपर्क क्र. ९४२३३२४६०९

**डॉ. सुनिता चौगुले**
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, प.जै.प.नि.सं., पुणे

**डॉ. ऋषिकेश काळे**
पशुधन विकास अधिकारी, प.जै.प.नि.सं., पुणे


सन १९४७ मध्ये *Serum & Vaccine Institute* म्हणून मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, मुंबई येथे स्थापन झालेली आहे. तथापि, सन १९५९ साली संस्थेचे पुणे येथे स्थलांतर होऊन पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्था, औंध, पुणे (IVBP) असे नामकरण करण्यात आले. महाराष्ट्रांमध्ये पशुसंवर्धन विभागाअंतर्गत पाळीव प्राणी व पक्षी यांच्यासाठी रोग प्रतिबंधात्मक लसमात्रा व रोग निदानाकरीता आवश्यक जैव पदार्थांचे उत्पादन करणारी पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, औंध, पुणे-७ ही एकमेव राज्यस्तरीय संस्था आहे.

**संस्थेची प्रमुख उद्दिष्टे:**

- महाराष्ट्रास पशुधनातील लस उत्पादनामध्ये स्वयंपूर्ण करणे.
- राज्यातील पशुपालकांना दर्जेदार पशुवैद्यकीय जैविक उत्पादने उपलब्ध करून देणे.
- राज्यातील पशुधन रोग मुक्त ठेवुन पशुधन व कुक्कुट यापासून दुग्ध, मांस व अंडी यांच्या उत्पादनात वृद्धी करणे व याद्वारे पशुपालकांच्या उत्पन्नात वाढ करणे.

संस्थेंतर्गत पाळीव पशुधन व कुक्कुट पक्षी यांना लागणाऱ्या सर्व जिवाणू व विषाणू लसमात्रा, अभिकारके-द्रावणे राज्यभरातील सर्व राज्यस्तरीय आणि जिल्हा परिषद पशुवैद्यकीय संस्थाना विनामूल्य पुरविल्या जातात. सर्व लसमात्रांचे उत्पादन औषधी व प्रसाधने कायदा-१९४५ च्या शेड्यूल-एम मध्ये विहित केलेल्या शर्तीस अधीन राहून करण्यात येत असून लस उत्पादन झाल्यानंतर त्या वितरण करण्यापूर्वी चाचणी व गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळेत त्यांच्या सर्व प्रकारच्या आधुनिक व काटेकोर पद्धतीने चाचण्या करून सुरक्षिततेच्या अत्युच्च मानकांची खात्री केल्यानंतरच पशुपालकांना विश्वासार्ह व परिणामकारक लसमात्रा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या शास्त्रशुद्ध आणि सुसूत्रताबद्ध कार्यपद्धतीमुळे या संस्थेची देशातील नामवंत लस निर्मिती संस्थामध्ये गणना केली जाते.

**संस्थेचे मुख्य विभाग:**

**१. जिवाणू लस उत्पादन विभाग:** संस्थेच्या जिवाणू लस उत्पादन विभागामार्फत पशुधनातील आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या घटसर्प, फऱ्या व आंत्रविषार या आजारांवरील लसमात्रांचे उत्पादन करण्यात येते.

गायी-म्हशीमधील मोठ्या प्रमाणात आढळणाऱ्या स्तनदाह (Mastitis) या रोगाच्या प्राथमिक व क्षेत्रीय स्तरावरील तात्काळ निदानाकारीता अत्यंत उपयुक्त “CMT Reagent” तसेच, कोंबड्यांतील साल्मोनेल्ला रोगाच्या निदानासाठी वापरले जाणारे “Salmonella Coloured Antigen” यांचेही या विभागांतर्गत उत्पादन केले जाते. सध्या संस्थेत जिवाणू लस उत्पादनासाठी आधुनिक फरमेंटर तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात येत असून आदर्श उत्पादन पद्धतींच्या (cGMP) मानांकनानुसार लस उत्पादनाची प्रक्रिया अविरतपणे सुरू आहे.

**२. कुक्कुट व विषाणू लस उत्पादन विभाग:** राष्ट्रीय कृषी विकास (RKVY) योजनेअंतर्गत कुक्कुट व विषाणू लस उत्पादन विभागात अत्याधुनिक प्रकल्प कार्यरत असून या प्रकल्पामार्फत पशुधन व कुक्कुट यांच्यासाठी पीपीआर (PPR), मेंढ्यांची देवी (Sheep Pox), लम्पी चर्मरोग (Lumpy Skin Disease), शेळ्यांची देवी (Goat Pox), कोंबड्यांची देवी (Fowl Pox), मरेक्स रोग (Marek॰s Disease), मानमोडी (RD/Lasota) या विषाणूजन्य लसमात्रांचे तंत्रशुद्ध पद्धतीने उत्पादन केले जाते.

**३. चाचणी आणि गुणवत्ता नियंत्रण विभाग:**
संस्थेंतर्गत लसमात्रा उत्पादनासाठी खरेदी करण्यात आलेल्या मिडिया, रसायने व इतर साहित्यांची तसेच लस उत्पादन झाल्यानंतर वितरण पूर्व लसमात्रांची व अभिकारके यांची सुरक्षितता, प्रभाविकता आणि दर्जा सुनिश्चित करण्याचे महत्वाचे काम या विभागांतर्गत प्रयोगशाळेमध्ये आधुनिक व काटेकोर पद्धतीने चाचणी करून सिद्ध करण्यात येते.

**४. लघुप्राणी विभाग:**
लस उत्पादन, चाचणी तसेच गुणनियंत्रण प्रक्रियेसाठी आवश्यक लहान प्रयोगशालेय प्राणी (पांढरे उंदीर, ससे व गिनी पिग) तसेच मोठे प्रयोगशालेय प्राणी (शेळ्या, मेंढ्या इ.), कुक्कुट पक्षी व एस.पी.एफ. अंडी यांचे उत्पादन व संगोपन केले जाते. याशिवाय, विभागाकडे सीपीसीएसईए (CCSEA) अंतर्गत लहान प्रयोगशालेय प्राण्यांच्या विक्रीचा वैध परवाना उपलब्ध असून, त्यानुसार अतिरिक्त प्रयोगशालेय प्राणी सीपीसीएसईए नोंदणीकृत संस्थांना विक्री करण्यात येतात.



लसीकरण हा खरे तर खर्च नसून शेतकऱ्यांसाठी फायदेशीर गुंतवणूक आहे. जनावरे दगावल्यास शेतकऱ्याला मोठा आर्थिक फटका बसतो परंतु वेळेवर लस दिल्यास हा धोका टाळता येतो. सामूहिक लसीकरण मोहिमांमुळे संपूर्ण गावातील पशुधन सुरक्षित राहते आणि रोगांचा प्रसार थांबतो. संसर्गजन्य आजारांचा प्रसार थांबवण्यासाठी केवळ वैयक्तिक उपचार पुरेसे नसून समाजस्तरावर संरक्षण निर्माण होणे अत्यंत आवश्यक असते. या सामूहिक संरक्षणालाच "हर्ड इम्युनिटी किंवा कळप प्रतिकारशक्ती" असे म्हणतात. जेव्हा एखाद्या समुदायातील मोठ्या प्रमाणात लोक किंवा जनावरे एखाद्या रोगाविरुद्ध लसीकरणामुळे किंवा नैसर्गिक प्रतिकारशक्तीमुळे सुरक्षित होतात तेव्हा त्या रोगाचा प्रसार आपोआप कमी होतो. पशुवैद्यकीय क्षेत्रात हर्ड इम्युनिटीला विशेष महत्त्व आहे. जनावरांचे नियमित व वेळेवर लसीकरण केल्यास कळपात रोगाचा प्रसार रोखता येतो पशुधनाचे आरोग्य सुधारते, उत्पादनक्षमता वाढते आणि शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळता येते. तसेच काही प्राणिजन्य रोग (Zoonotic diseases) मानवांपर्यंत पसरण्याचा धोका कमी होतो. पशुपालकांनी लसीकरणाच्या तारखा लक्षात ठेवून पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित लसीकरण करून घ्यावे. निरोगी जनावरे म्हणजे समृद्ध शेतकरी, आणि समृद्ध शेतकरी म्हणजे सक्षम ग्रामीण भारत. त्यामुळे जनावरांतील लसीकरणाला प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे.

# संस्थेंतर्गत उत्पादित लसमात्रा व वापरण्याची पद्धती

| लस | लस मात्रा | लस देण्याचे वय | टोचण्याची पद्धती | रोग प्रतिकार क्षमता | साठवणूक पद्धती |
|---|---|---|---|---|---|
| घटसर्प | गाय/म्हैस वर्ग: २ मिलि.<br>शेळी/मेंढी वर्ग: १ मिलि. | ६ महिने आणि पुढे | त्वचेखाली | ५ व्या दिवसापासून तयार होते. ५ महिने टिकून राहते. | २-८ अंश सेल्सिअस (६ महिने) |
| फऱ्या | गाय/म्हैस वर्ग: २ मिलि.<br>शेळी/मेंढी वर्ग: १ मिलि. | ६ महिने आणि पुढे | त्वचेखाली | ५ व्या दिवसापासून तयार होते. १ वर्ष टिकून राहते. | २-८ अंश सेल्सिअस (१ वर्ष) |
| आंत्रविषार | शेळी/मेंढी वर्ग: १ मिलि.<br>गाय/म्हैस वर्ग: २ मिलि. | ६ महिने आणि पुढे | त्वचेखाली (लसीचा बुस्टर: १५ दिवसांनी देणे) | प्राथमिक/ बुस्टर लसीकरणानंतर १ वर्ष टिकून राहते. | २-८ अंश सेल्सिअस (१ वर्ष) |
| पीपीआर | शेळी/मेंढी वर्ग: १ मिलि. | ३ महिने आणि पुढे | त्वचेखाली | प्राथमिक लसीकरणानंतर २१ व्या दिवशी निर्मिती पूर्ण होते व ३ वर्षे टिकून राहते. | २-८ अंश सेल्सिअस (१ वर्ष) |
| मेंढ्यांची देवी | मेंढी वर्ग: ०.५ मिलि. | ३ महिने आणि पुढे | कानाच्या मागे त्वचेखाली | प्राथमिक लसीकरणानंतर २१ व्या दिवशी निर्मिती पूर्ण होते व १ वर्ष टिकून राहते. | २-८ अंश सेल्सिअस (१ वर्ष) |
| मॅरेक्स रोग | एक दिवसीय पिल्ले: ०.२ मिलि. | १ ला दिवस | मांडीच्या स्नायूमध्ये | रोग प्रादुर्भाव न होण्याच्या स्थितीत आयुष्यभर टिकून राहते. | २-८ अंश सेल्सिअस (१ वर्ष) |
| मानमोडी (लासोटा) | कुक्कुट वर्ग | १ ला आणि ५ वा आठवडा | दोन्ही नाकपुडीत १-१ थेंब | प्राथमिक लसीकरणानंतर २१ व्या दिवशी निर्मिती पूर्ण होते व ८ आठवडे टिकते. | २-८ अंश सेल्सिअस (१ वर्ष) |
| मानमोडी (मुक्तेश्वर) | कुक्कुट वर्ग: ०.५ मिलि. | ८ वा आणि १८ वा आठवडा | पंखाच्या आतील बाजूस त्वचेखाली | प्राथमिक लसीकरणानंतर २१ व्या दिवशी निर्मिती पूर्ण होते व आयुष्यभर टिकते. | २-८ अंश सेल्सिअस (१ वर्ष) |
| कोंबड्यांची देवी | कुक्कुट वर्ग | ८ वा आठवडा | पंखाच्या आतील बाजूस लॅन्सेट द्वारे दोन ठिकाणी देणे | प्राथमिक लसीकरणानंतर २१ व्या दिवशी निर्मिती पूर्ण होते व आयुष्यभर टिकते. | २-८ अंश सेल्सिअस (१ वर्ष) |
| लम्पी त्वचा रोग | गाय वर्ग: १ मिलि. | ४ महिने व पुढे | त्वचेखाली | प्राथमिक लसीकरणानंतर २१ व्या दिवशी निर्मिती पूर्ण होते व १ वर्ष टिकून राहते. | २-८ अंश सेल्सिअस (१ वर्ष) |
| शेळ्यांची देवी | शेळी वर्ग: १ मिलि. | ३ महिने व पुढे | त्वचेखाली | प्राथमिक लसीकरणानंतर २१ व्या दिवशी निर्मिती पूर्ण होते व १ वर्ष टिकून राहते. | २-८ अंश सेल्सिअस (१ वर्ष) |
| साल्मोनेल्ला रंगीत प्रीजन | -- | -- | -- | जलद अग्ग्लुटीनेशन चाचणीद्वारे साल्मोनेल्ला संसर्गाचे निदान करण्यासाठी | २-८ अंश सेल्सिअस (१ वर्ष) |
| सी. एम. टी अभिकारक | -- | -- | -- | सब-क्लिनिकल कासदाह निदान करण्यासाठी | २-८ अंश सेल्सिअस (१ वर्ष) |




## लसीकरण करताना घ्यावयाची काळजी

- फक्त निरोगी पशुधनास लसीकरण करावे. आजारी पशुधनास लसीकरण करू नये.
- आजारी पशुधनास उपचार करून निरोगी झाल्यावरच लसीकरण करावे.
- लसीच्या अधिकतम परिणामकारकतेकरीता लसीकरण करण्यापूर्वी पशुधनास जंत निर्मूलनाची औषधे द्यावीत.
- लसीकरण करण्यापूर्वी पशुधन ताण विरहित असावे. खूप लांबचा प्रवास किंवा अधिक काम यामुळेही ताण येऊ शकतो.
- लसीकरण दिवसातील थंड वेळी म्हणजेच सकाळी लवकर किंवा संध्याकाळी करावे. भर दुपारी खूप उन्हात लसीकरण करणे टाळावे.
- विषाणूजन्य लस तयार करताना वापरावयाच्या लस द्रावणाची २० ते ४० से. तापमानात साठवणूक करावी.
- लसीकरणापूर्वी लसीची बाटली व्यवस्थित हलवून घ्यावी.
- विषाणूजन्य लस एकदा पुनर्रचित (Reconstitute) केल्यानंतर पुढील २ ते ४ तासांमध्ये वापरण्यात यावी.
- लसीकरणाच्या वेळा व वेळापत्रक काटेकोरपणे पाळावे.
- लसीकरणाची राष्ट्रीय डिजिटल पशुधन अभियान (NDLM) अंतर्गत नोंद ठेवावी.
- पशुधनातील लसीकरणाचे महत्व याबाबत पशुपालकांमध्ये जागरूकता निर्माण करावी.
- पशुधनातील विविध लसीकरणाचे सुयोग्य नियोजन करून एका गावात एकाच वेळी अधिकाधिक लसीकरण पूर्ण करणे गरजेचे आहे.
- लसीकरण करण्यासाठी पशुवैद्यक अथवा पशुवैद्यकीय क्षेत्रातील जाणकाराची मदत घ्यावी.
- लसउत्पादकाच्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करावे.
- काही वेळा पशुधनास लसीची प्रतिकूल प्रतिक्रिया येऊ शकते त्यामुळे लसीकरणावेळी आपत्कालीन औषधे जवळ ठेवावीत.

**आदर्श पद्धतींच्या(cGMP) मानांकनानुसार आधुनिक फरमेंटर तंत्रज्ञानावर आधारीत जिवाणू लस उत्पादनाची प्रक्रिया**







# राष्ट्रीय पशुधन प्रणाली (राष्ट्रीय डिजिटल पशुधन अभियान)



**डॉ.राजु मुकूंदराव कोलते,**
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन,
(नियोजन व अंदाज) पसं-६, पशुसंवर्धन आयुक्तालय,
औंध, पुणे-६७

राष्ट्रीय पशुधन प्रणाली राज्यात माहे ऑक्टोबर २०२३ पासून कार्यान्वित आहे. सदर प्रणालीअंतर्गत प्रत्येक पशुधनाची, जसे की गाय / म्हैस तसेच शेळ्या मेंढ्यांची नोंदणी करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर सर्व पशुपालकांनी आपल्याकडील पशुधनाची नोंदणी गरजेचे आहे. या प्रणालीद्वारे पशुपालकाकडे असलेल्या पशुधनास बारा अंकी बिल्ला कानामध्ये लावून त्या पशुधनाची नोंदणी भारत पशुधन प्रणालीमध्ये करण्यात येते. तथापि बऱ्याच पशु पालकांचे मोबाईल नंबर योग्य पद्धतीने नोंदविले गेलेले नसल्यामुळे त्यांच्या नावावर आपली जनावरे आहेत किंवा इतरांची जनावरे नोंदणी केलेली आहेत याबाबतची स्पष्टता येत नाही. त्याकरिता केंद्र शासनाने यामध्ये पुढाकार घेऊन पशुपालकांचे मोबाईल नंबर अपडेट करण्याबाबत आव्हान केलेले आहे.

पुर्वीच्या काळामध्ये शेतकरी / पशुपालक यांच्याकडे असलेल्या पशुधनावर त्यांची पत किंवा त्याच्याकडील वैभव समजले जात होते. म्हणजेच पूर्वी बँकेत किती पैसा आहे त्यापेक्षा त्या मालकाच्या घरी किंवा गोठ्यामध्ये / दाव्यावरती किती पशुधन संख्या आहे, यावरून त्याची श्रीमंती ओळखल्या जायची. ज्याप्रमाणे प्रत्येक पशुपालकासाठी आपले बँक खाते महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे भारत पशुधन प्रणालीवरील नोंदी या सुरक्षित तसेच योग्य पद्धतीने होण्याकरिता पशुपालकांनी आपला मोबाईल नंबर अपडेट करणे आवश्यक आहे. त्याकरीता केंद्र शासनाने ओटीपीद्वारे लसीकरण करण्याची सुविधा सर्व पशुपालकांसाठी उपलब्ध करून दिलेली आहे.

भारत पशुधन प्रणाली अंतर्गत ओटीपी द्वारे कृत्रिम रेतन करण्याची सुविधा सर्व पशुपालकांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यासाठी सर्व पशुपालकांना आव्हान करण्यात येते की, आपला मोबाईन क्रमांक अद्यावत करुन त्यावर येणारा ओटीपी हा जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात जाऊन पशुसंवर्धन विभागाच्या क्षेत्रीय कर्मचाऱ्याकडेच शेअर करावा. इतर कुणालाही शेअर करू नये. तसेच दूरध्वनीवरून मोबाईल नंबरवरील ओटीपी मागितल्यास तो देखील शेअर करू नये, अशा सक्त सूचना आहेत. सदर मोबाईल नंबर अपडेट केल्यामुळे पशुधनाची नोंदणी करताना आपल्याकडे असलेल्या पशुधनाचीच नोंद भारत पशुधन प्रणालीवर होते, याची खात्री होणार आहे. तसेच प्रत्येक पशुधनावर करण्यात येणारे लसीकरण, कृत्रिम रेतन व उपचार इत्यादी बाबींच्या नोंदी ह्या ओटीपी द्वारे पूर्ण केल्या जाणार आहेत. त्याकरिता आपण त्यावेळेस पशुसंवर्धन विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना आपल्या मोबाईल नंबरवरील ओटीपी शेअर करावा, असे आव्हान करण्यात येत आहे.









### यामुळे काय होईल?

आपल्या नावावर असलेल्या पशुधनास करण्यात येणारे लसीकरण, कृत्रिम व उपचार या बाबीच्या नोंदी या परस्पर कुणालाही करणे शक्य होणार नाही. तसेच आपल्या जनावरावर प्रत्यक्ष लसीकरण न करताही त्याच्या नोंदी आतापर्यंत शक्य होत होत्या, ह्या गोष्टी टाळण्याच्या दृष्टिकोनातून आपणास या पद्धतीने आवाहन करण्यात येत आहे. या प्रक्रियेमधून एवढेच अधोरेखित करायचे आहे की, आपल्या पशुधनावर योग्य वेळी लसीकरण आणि कृत्रिम रेतन याची सेवा देण्यात येऊन त्याची नोंद भारत पशुधन प्रणालीमध्ये करण्यात येत आहे. आपले पशुधन त्या रोगापासून प्रतिबंधात्मक उपचार प्राप्त होऊन पुढे उद्भवणाऱ्या साथ रोगापासून सुरक्षित होईल, याची आपणास खात्री होणार आहे. जसे की यापूर्वी सन २०२२- २३ मध्ये लंम्पी रोगप्रादुर्भावामुळे फार मोठ्या प्रमाणात जनावरे मृत्युमुखी पडले. अशा प्रकारच्या घटना भविष्यामध्ये घडू नये, हीच बाब यामधून अधोरेखित करणे गरजेचे आहे.




आपल्या पशुधनात करण्यात आलेल्या कृत्रिम रेतनापासून पैदास होणाऱ्या नवीन पिढीची नोंद ही भारत पशुधन प्रणालीवर झाल्यामुळे जन्मलेल्या वासरांचे / पारड्यांची अनुवंशिकता सिध्द होणार आहे. त्यामुळे त्याची दूध उत्पादन क्षमता माहित होणार असल्यामुळे जन्मलेल्या वासरास / कालवडीस / पारड्यांना बाजारपेठेमध्ये चांगला भाव मिळण्याची खात्री होणार आहे. त्याकरिता सर्व पशुपालक बांधवांना विनंती आहे की, कृत्रिम रेतन केल्यानंतर तसेच लसीकरण केल्यानंतर आपल्या मोबाईल नंबरवर प्राप्त होणारा ओटीपी हा वेळीच पशुवैद्यकांबासोबत किंवा पशुसंवर्धन विभागाच्या कर्मचाऱ्यांसोबत शेअर करणे आवश्यक आहे. यामुळे चुकीच्या तसेच बनावट नोंदींना आळा बसण्यासाठी फार मोठे मदत होणार आहे.

# "प्राण्यांमधील संसर्गजन्य आणि सांसर्गिक रोगांचे प्रतिबंध आणि नियंत्रण अधिनियम, २००९"

पशुसंवर्धन विभागाच्या कामकाजाची व्याप्ती ही केवळ पशुआरोग्यापुरती मर्यादित नाही. "पशु" या शब्दाच्या अर्थातच त्याचा विस्तार दडलेला आहे. यामध्ये पाळीव, दुधाळ व शेतीउपयोगी प्राण्यांसोबत वन्य प्राणी व पक्षी तर आहेतच पण त्यापलीकडे सामुहिक स्वास्थ्य ह्या संकल्पनेत मानवी आरोग्याच्या तसेच पर्यावरणाच्या स्वास्थ्याचीही जबाबदारी आहे. उदारणार्थ रेबीज हा आजार मुख्यत्वे बाधित श्वानांपासून मानवास होणारा आजार आहे, तसेच काही वन्य प्राण्यांपासून सुद्धा ह्याचा प्रसार होतो जसे की, कोल्हा, रानकुत्री, मुंगुस इ. तेव्हा अशा आजारांचा प्रसार व पर्यायाने निर्मुलन हे ह्या संबंधित सर्व यंत्रणेतील सामुहीक प्रयत्नातूनच सध्या होवू शकते. अशावेळी एखाद्या आजाराचे विशेषत: झूनोटीक आजाराचा (प्राण्यांपासून मानवास होणारे किंवा मानवापासून प्राण्यांना होणारे आजार) प्रसार प्रतिबंधित करण्यासाठी एका विशिष्ट नियमांची आवश्यकता असते.



**डॉ. शुभा देशमुख**
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन
(पशुआरोग्य व रोगनियंत्रण कक्ष)
पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७

"संवर्धन" ह्या शब्दाचा अर्थ जरी सूचक असला तरी, संपूर्ण प्रक्रियेची व्याप्ती व जबाबदारी ही फार मोठी आहे. कुठल्याही बाबीच्या संवर्धनासाठी एखादी स्वतंत्र यंत्रणा भलेही कार्यान्वित केल्या गेली असली तरी, संवर्धन ह्या प्रक्रियेचे साध्य आणि फलनिष्पत्ती हे मानवी क्षमतेत पूर्णत: नाही. जगभरात नद्यांचे, वनांचे, मृदेचे असे अनेक प्रकारच्या आपल्या परिसंस्थेचा भाग असलेल्या घटकांचे संवर्धन हे वर्षानुवर्षे सुरूच आहे. तथापि, मानवी जीवनशैलीतील बदल, बदलेलेले ऋतुचक्र व प्रत्येक क्षेत्रातील मानवाची अमर्यादित भूक ह्या आणि इतरही काही घटक हे एकंदरीत संवर्धन प्रक्रियेतील १०० टक्के साध्य होण्यास बाधा येते. अशावेळी देशातील जवळपास ५०-६०% टक्के लोकांच्या (प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे ) अर्थाजनाचा स्त्रोत असणारा कृषी व्यवसाय व त्यास पूरक असलेला पशुपालन व्यवसाय तसेच याअंतर्गत अंतर्भूत घटक लक्षात घेता, पशुसंवर्धन विभागाच्या कार्यकक्षेत येणाऱ्या कामाचा आवाका हा फार व्यापक आहे, याची प्रचिती येते. कृषी विभाग, आरोग्य विभाग, ग्रामविकास विभाग, परिवहन विभाग, वन विभाग अशा अनेक विभागासोबत सुसूत्रता ठेवून एका विशिष्ठ नियमावली अंतर्गत प्रभावीपणे कामकाज करण्याकरिता पर्यायाने कायद्याची गरज भासते.

जनावरांचे आरोग्य व त्यांचे संवर्धन ह्याशिवाय इतर बाबी जसे की, प्राण्यांची होणारी वाहतूक, विक्री, प्रजनन, अधिकृत कत्तल, गोवंश संवर्धन, रोगांचा प्रसार इत्यादी प्रक्रियेमध्ये धोरणात्मक कामकाज करण्याकरिता आवश्यक विशिष्ट कार्यप्रणालीची आवश्यकता लक्षात घेता, विविध कायद्यांची अंबलबजावणी करण्यात येते. ह्यामध्ये मुख्यत्वे प्राणी छळ प्रतिबंधक कायदा-१९६०, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम-२०२३, महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) कायदा-२०१५, प्राण्यांमधील संसर्गजन्य व सांसर्गिक रोगांचे प्रतिबंध आणि नियंत्रण अधिनियम-२००९ इत्यादी कायद्यांचा समावेश आहे.

पशुसंवर्धन विभागाच्या कार्यप्रणालीचा एकंदरीत विचार करता, ह्या विभागातील अनेक कायद्यांपैकी महत्वाचा कायदा म्हणजे प्राण्यांमधील संसर्गजन्य आणि सांसर्गिक रोगांचे प्रतिबंध आणि नियंत्रण अधिनियम-२००९. सोप्या भाषेत सांगायचे तर, आज महाराष्ट्रातील एका छोट्या गावातील पशुवैद्यकीय चिकीत्सालयापासून ते प्राण्यांच्या आरोग्यासाठी जागतिक स्तरावर कामकाज करणाऱ्या संघटनेमध्ये कामकाजाची सुसूत्रता येण्यासाठी निश्चित केलेली कायदेशीर नियमावालींची रचना म्हणजे हा कायदा होय!





थोडक्यात सांगायचे तर एखादा कुत्रा अधिसूचित आजाराने ग्रस्त असेल, आणि त्याचा इतर प्राण्यांना तसेच मानवी आरोग्यास धोका असेल अशावेळी त्या प्राण्याला दयामरण द्यावे हे जरी तांत्रिकदृष्ट्या अभिप्रेत असले तरी, जोपर्यंत ह्यासाठी कायदा अस्तित्वात नसेल तोपर्यंत क्षेत्रीयस्तरावर पशुवैद्यकाला अशा भूमिका घेणे शक्य होत नाही. तेव्हा ह्या कायद्यातील कलम क्रमांक २५ अन्वये पशुवैद्यकाला अशा भूमिका घेण्याचे अधिकार प्रदान करतो. त्याचप्रमाणे कुक्कुट पक्षांमधील बर्ड फ्लू ह्या रोगाची साथ येते, तेव्हा ह्याच कायद्याचा आधार घेवून प्रभावित क्षेत्र, नियंत्रित क्षेत्र अशाप्रकारचे विभाजन करून केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे प्रभावित क्षेत्रातील पक्षांची कलिंग प्रक्रिया करण्यात येते. त्याचप्रमाणे प्राण्यांमधील संसर्गजन्य व सांसर्गिक रोगांचे प्रतिबंध आणि नियंत्रण करण्यासाठी प्रभावी माध्यम म्हणजे लसीकरण होय. तर ज्याप्रमाणे लसीकरण करणे ही पशुवैद्यकाची जबाबदारी आहे, त्याचप्रमाणे लसीकरण करून घेणे ही पशुपालाकाचीसुद्धा तेवढीच जबाबदारी आहे, ही गोष्ट हा कायदा सांगतो.

एखाद्या पशुपालकाकडे बैलाला आजाराचा संसर्ग झाला असेल तर त्याबद्दल महिती देण्याची व त्याचे विलीगीकरण करण्याची जबाबदारी कुणाची तर पशुपालाकाची आणि जर बैल भटका असेल, म्हणजे त्याला कुणी मालक नसेल तर ही जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्यसंस्थेची, ही बाब हा कायदा सांगतो. या व अशा प्रकारच्या बऱ्याच बाबींच्या कार्यप्रणालीची स्पष्टता ह्या कायद्यात केलेली आहे. तसेच प्राण्यांना होणाऱ्या संसर्गजन्य आणि सांसर्गिक रोगांचे प्रतिबंध, नियंत्रण आणि निर्मूलन करण्यासाठी, अशा रोगांचा प्रादुर्भाव किंवा प्रसार एका राज्यातून दुसऱ्या राज्यात होण्यापासून रोखण्यासाठी व प्राणी आणि प्राणीजन्य उत्पादनांच्या आयात-निर्यातीसाठी भारताच्या आंतरराष्ट्रीय जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी आणि त्याशी संबंधित बाबींसाठी हा कायदा आहे.

सदर कायद्यात ७ प्रकरणे असून, एकूण ४५ कलमे आहेत. तसेच ह्या अन्वये १४३ प्रकारचे आजार "अधिसूचित आजार" म्हणून घोषित करण्यात आले आहे. ह्या कायद्याची कलमनिहाय सर्वसाधारण व्याप्ती खालीलप्रमाणे आहे,

**कायद्यातील कलमांची मांडणी**

ज्याअर्थी, देशात प्राण्यांच्या संसर्गजन्य आणि सांसर्गिक रोगांमुळे होणारे आर्थिक नुकसान प्रचंड आहे आणि यातील काही रोग लोकांसाठी गंभीर धोका निर्माण करतात; आणि ज्याअर्थी प्राण्यांचे असे अनेक रोग लसीकरण कार्यक्रमांच्या योग्य अंमलबजावणीद्वारे किंवा वैज्ञानिक धर्तीवर इतर योग्य आणि वेळेवर उपाययोजना करून मोठ्या प्रमाणावर रोखले जाऊ शकतात; आणि ज्याअर्थी प्राणी आणि प्राणीजन्य उत्पादनांची आयात-निर्यात सुलभ करण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय पद्धतींशी सुसंगत राहण्यासाठी अशा उपाययोजना आवश्यक आहेत; आणि ज्याअर्थी हे लक्षात आले आहे की, भारतातील प्राण्यांच्या संसर्गजन्य आणि सांसर्गिक रोगांचे प्रतिबंध, नियंत्रण आणि निर्मूलन राष्ट्रीय स्तरावर हाताळले जाणे आवश्यक आहे; जेणेकरून अशा रोगांचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होऊ नये आणि या उद्देशासाठी नियंत्रण कार्यपद्धतीमध्ये सुसूत्रता आणणे आणि रोगांचे आंतर-राज्य संक्रमण रोखणे आवश्यक आहे; आणि ज्याअर्थी राष्ट्रीय स्तरावरील हाताळणी राज्य सरकारांच्या सक्रिय सहभागाने करणे आवश्यक आहे, विशेषतः त्यांच्या कार्यक्षेत्रात काही संसर्गजन्य आणि सांसर्गिक रोगांच्या संदर्भात घ्यावयाची खबरदारी आणि योग्य उपाययोजना करून त्यांच्या संबंधित क्षेत्राबाहेरील प्राण्यांच्या हालचालींचे नियमन करण्याच्या संदर्भात; आणि ज्याअर्थी भारत 'ऑफिस इंटरनॅशनल डेस एपिझुटीज' (Office International Des Epizooties), पॅरिसचा सदस्य देश आहे आणि या संस्थेच्या सामान्य जबाबदाऱ्या, निर्णय आणि शिफारसींची अंमलबजावणी करणे आणि संस्थेने ठरवून दिलेल्या आंतरराष्ट्रीय प्राणी आरोग्य संहितेचे पालन करणे आवश्यक आहे; भारतीय प्रजासत्ताकाच्या साठाव्या वर्षी संसदेद्वारे खालीलप्रमाणे अधिनियमित केले जात आहे: –

## प्रकरण १: प्राथमिक

**१. संक्षिप्त नाव, विस्तार आणि प्रारंभ. (१)** या अधिनियमाला 'प्राण्यांमधील संसर्गजन्य आणि सांसर्गिक रोगांचे प्रतिबंध आणि नियंत्रण अधिनियम, २००९' असे म्हटले जाऊ शकते. **(२)** केंद्र सरकार अधिसूचनेद्वारे नियुक्त करेल अशा तारखेला हा लागू होईल; आणि वेगवेगळ्या राज्यांसाठी किंवा त्यातील वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी तसेच या अधिनियमाच्या वेगवेगळ्या तरतुदींसाठी वेगवेगळ्या तारखा नियुक्त केल्या जाऊ शकतात.

**२. व्याख्या.** या अधिनियमात, जोपर्यंत संदर्भात अन्यथा आवश्यक नसेल तोपर्यंत, **"प्राणी"** म्हणजे, गाय-बैल, म्हैस, मेंढी, शेळी, याक, मिथून; कुत्रा, मांजर, डुक्कर, घोडा, उंट, गाढव, खेचर, कुक्कुटपालन, मधमाश्या; आणि केंद्र सरकार अधिसूचनेद्वारे निर्दिष्ट करेल असा इतर कोणताही प्राणी किंवा पक्षी;

**"तपासणी नाका"** (Check Post) म्हणजे या अधिनियमाच्या उद्देशासाठी प्राण्यांची तपासणी करण्यासाठी संचालकाने स्थापन केलेले कोणतेही ठिकाण; अधिसूचना क्रमांक S.O. ९९५ (E), दिनांक १ एप्रिल २०१४ नुसार 'मासे, मृदुकाय प्राणी (Mollusc), कवचधारी प्राणी (Crustacean) आणि उभयचर' हे 'प्राणी' या व्याख्येत समाविष्ट असतील.

**"सक्षम अधिकारी"** म्हणजे कलम १७ अंतर्गत सक्षम अधिकारी म्हणून अधिसूचित केलेली कोणतीही व्यक्ती किंवा सरकारी अधिकारी;

**"सक्तीचे लसीकरण"** म्हणजे कोणत्याही अनुसूचित रोगाविरुद्ध कोणत्याही प्राण्याचे लसीकरण जे या अधिनियमाच्या तरतुदींनुसार अनिवार्य केले आहे;

**"नियंत्रित क्षेत्र"** म्हणजे कलम ६ च्या उप-कलम (१) अंतर्गत राज्य सरकारने घोषित केलेले कोणतेही स्थानिक क्षेत्र;

**"दोषपूर्ण लस"** म्हणजे अशी कोणतीही लस जिची मुदत संपली आहे, सील तुटलेले आहे, दूषित आहे, अयोग्यरित्या साठवली गेली आहे, विना-लेबल आहे किंवा ज्याचे लेबल खराब झाले आहे;

**"संचालक"**, राज्याच्या संदर्भात, म्हणजे पशुसंवर्धन किंवा पशुवैद्यकीय सेवा विभागाचा कोणताही प्रभारी अधिकारी, ज्याला राज्य सरकारने या अधिनियमाच्या उद्देशासाठी अधिसूचित केले आहे;

**"मुक्त क्षेत्र"** म्हणजे कलम ६ च्या उप-कलम (५) अंतर्गत घोषित केलेले कोणतेही नियंत्रित क्षेत्र;

**"बाधित प्राणी"** म्हणजे असा प्राणी जो कोणत्याही अनुसूचित रोगाने संक्रमित झाला आहे;

**"बाधित क्षेत्र"** म्हणजे कलम २० अंतर्गत घोषित केलेले क्षेत्र;

**"अधिसूचना"** म्हणजे अधिकृत राजपत्रात (Official Gazette) प्रसिद्ध झालेली अधिसूचना;

**"विहित"** म्हणजे या अधिनियमांतर्गत बनवलेल्या नियमांनुसार विहित केलेले;

**"प्रसिद्धी"** मध्ये मीडिया किंवा वृत्तपत्र किंवा इतर कोणत्याही जनसंवादाच्या माध्यमातून माहितीचा प्रसार करणे आणि स्थानिक संवादाची साधने जसे की जोरात ओरडून सांगणे आणि परिसरात ढोल वाजवून घोषणा करणे समाविष्ट आहे;

**"अलगीकरण शिबिर"** (Quarantine Camp) म्हणजे या अधिनियमाच्या उद्देशासाठी प्राणी आणि पक्ष्यांचे क्वारंटाईन करण्यासाठी घोषित केलेले कोणतेही ठिकाण;

**"अनुसूचित रोग"** म्हणजे अनुसूचीमध्ये समाविष्ट असलेला कोणताही रोग;

**"पशुवैद्य"** (Veterinarian) म्हणजे मान्यताप्राप्त पशुवैद्यकीय पात्रता असलेली व्यक्ती, जिला तात्काळ लागू असलेल्या कायद्यानुसार प्राण्यांच्या रोगांवर उपचार करण्याची परवानगी आहे;

**"पशुवैद्यकीय अधिकारी"** म्हणजे कलम ३ च्या खंड (ब) अंतर्गत राज्य सरकारने नियुक्त केलेला कोणताही अधिकारी;

**"ग्राम अधिकारी"**, गावाच्या संदर्भात, म्हणजे राज्य सरकारने विहित केलेल्या पात्रतेनुसार अधिकृत किंवा नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती.









**प्रकरण २: अनुसूचित रोगांचे नियंत्रण**

**३. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती.** राज्य सरकार अधिसूचनेद्वारे नियुक्त करू शकते त्यांना योग्य वाटेल तितक्या व्यक्तींना तपासणी करण्यासाठी पशुवैद्य म्हणून आणि त्यांच्या संबंधित अधिकारक्षेत्राच्या स्थानिक मर्यादा निर्दिष्ट करणे; आणि त्यांना योग्य वाटेल तितक्या पशुवैद्यांना पशुवैद्यकीय अधिकारी म्हणून, जे त्यांच्या अधिकारक्षेत्राच्या स्थानिक मर्यादांमध्ये त्यांचे अधिकार बजावतील आणि कर्तव्ये पार पाडतील.

**४. अनुसूचित रोगांची तक्रार करणे बंधनकारक.** (१) प्रत्येक मालक, किंवा इतर कोणतीही व्यक्ती, बिगर सरकारी संस्था, सार्वजनिक संस्था किंवा ग्रामपंचायत, ज्यांच्या ताब्यात कोणताही प्राणी आहे आणि त्यांना असा विश्वास वाटण्याचे कारण आहे की तो प्राणी अनुसूचित रोगाने बाधित आहे, त्यांनी ही बाब ग्राम अधिकारी किंवा प्रभारी ग्रामपंचायतीला कळवावी, जे ही बाब जवळच्या उपलब्ध पशुवैद्याला लेखी स्वरूपात कळवू शकतात. (२) रोगाच्या कोणत्याही प्रादुर्भावाची तक्रार करण्यासाठी ग्राम अधिकारी त्याच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या भागाला भेट देईल. (३) उप-कलम (१) अंतर्गत अहवाल प्राप्त झाल्यावर किंवा अन्यथा, जर पशुवैद्याला कोणताही प्राणी अनुसूचित रोगाने संक्रमित असल्याचा विश्वास वाटण्याचे कारण असेल, तर तो पशुवैद्यकीय अधिकाऱ्याला ही बाब कळवेल. (४) राज्यामध्ये कोणत्याही प्राण्याशी संबंधित अनुसूचित रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास, संचालक अशा ठिकाणाच्या जवळच्या शेजारी असलेल्या राज्यांच्या संचालकांना रोगाचा प्रसार रोखण्यासाठी योग्य प्रतिबंधात्मक उपाय करण्यासाठी कळवेल.

**५. बाधित प्राण्यांना वेगळे ठेवण्याचे कर्तव्य.** (१) प्राण्याचा प्रत्येक मालक किंवा प्रभारी व्यक्ती, ज्याला असा विश्वास वाटण्याचे कारण आहे की तो प्राणी अनुसूचित रोगाने संक्रमित आहे, तो अशा प्राण्याला वेगळे करेल आणि त्याला इतर सर्व निरोगी प्राण्यांपासून दूर ठिकाणी ठेवेल आणि बाधित प्राणी इतर कोणत्याही प्राण्याच्या संपर्कात येऊ नये म्हणून सर्व शक्य पावले उचलेल. (२) उप-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या प्राण्याचा मालक किंवा प्रभारी व्यक्ती त्या प्राण्याला बंदिस्त ठेवेल आणि त्याला सार्वजनिक ठिकाणी चरण्यापासून किंवा कोणत्याही सामायिक स्रोताकडून (जसे की भांडे, तलाव, सरोवर किंवा नदी) पाणी पिण्यापासून रोखेल. (३) इतर सर्व बाधित प्राण्यांना नगरपालिका, पंचायत किंवा इतर स्थानिक प्रशासनाद्वारे वेगळे केले जाईल.

**६. नियंत्रित क्षेत्रे आणि मुक्त क्षेत्रांची अधिसूचना.**

(१) राज्य सरकार कोणत्याही अनुसूचित रोगाचा प्रतिबंध, नियंत्रण किंवा निर्मूलन करण्याच्या उद्देशाने, अधिसूचनेद्वारे, कोणत्याही क्षेत्राला त्या विशिष्ट प्राण्यांच्या प्रजातीसाठी 'नियंत्रित क्षेत्र' म्हणून घोषित करू शकते. (२) राज्य सरकार उप-कलम (१) अंतर्गत जारी केलेल्या अधिसूचनेचा सारांश स्थानिक भाषेतील स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करेल आणि परिसरात जोरात ओरडून आणि ढोल वाजवून जाहीर करेल. (३) जेथे उप-कलम (१) अंतर्गत अधिसूचना जारी केली गेली आहे, तेथे नियंत्रित क्षेत्रातील त्या प्रजातीच्या सर्व प्राण्यांना त्या रोगाविरुद्ध सक्तीने लसीकरण केले जाईल. (४) राज्य सरकार आवश्यक लस उपलब्ध करून देईल आणि ज्या प्राण्याचे लसीकरण करणे आवश्यक आहे अशा प्रत्येक मालकावर किंवा प्रभारी व्यक्तीवर प्राण्याला सक्तीने लसीकरण करणे बंधनकारक असेल. (५) जिथे राज्य सरकारचे समाधान झाले असेल की एखाद्या नियंत्रित क्षेत्रात कोणताही अनुसूचित रोग आता अस्तित्वात नाही, तेव्हा ते अधिसूचनेद्वारे त्या क्षेत्राला 'मुक्त क्षेत्र' म्हणून घोषित करू शकते. (६) जिथे उप-कलम (५) अंतर्गत अधिसूचना जारी केली गेली आहे, तेथे जोपर्यंत प्राण्याचे योग्य लसीकरण केलेले नाही, तोपर्यंत त्याला मुक्त क्षेत्रात प्रवेश दिला जाणार नाही.

**७. नियंत्रित क्षेत्रातून प्राण्यांच्या हालचालीवर बंदी.** (१) जेथे एखाद्या क्षेत्राला नियंत्रित क्षेत्र घोषित केले आहे, तेथून त्या प्रजातीच्या कोणत्याही प्राण्याला तो ठेवलेल्या ठिकाणाहून हलवले जाणार नाही. (२) संचालक कोणत्याही अनुसूचित रोगाच्या नियंत्रणासाठी किंवा निर्मूलनासाठी, कोणत्याही क्षेत्रात, निर्दिष्ट केलेल्या प्रजातींच्या सर्व प्राण्यांच्या हालचालीवर बंदी घालू शकतात. (३) उप-कलम (१) आणि (२) मधील कोणतीही गोष्ट खालील बाबतीत अडथळा आणणार नाही. प्राण्याला लसीकरण करण्यासाठी जवळच्या ठिकाणी नेणे; किंवा जर प्राण्यासोबत वैध लसीकरण प्रमाणपत्र असेल आणि त्याच्यावर लसीकरणाचे योग्य चिन्ह असेल.

**८. लसीकरण, चिन्हांकन आणि लसीकरण प्रमाणपत्र देणे.** (१) प्राण्याला लस कोणत्याही सक्षम व्यक्तीद्वारे दिली जाऊ शकते आणि ती व्यक्ती लसीकरण प्रमाणपत्र जारी करेल. (२) ज्या प्राण्याला लसीकरण केले आहे, त्या प्राण्याला ब्रँडिंग, टॅटू किंवा इअर टॅगिंग (कानावर बिल्ला लावणे) करून चिन्हांकित केले जाईल. (३) लसीकरण प्रमाणपत्र जारी करणारे प्राधिकरण लसीकरणाची तारीख, लस उत्पादनाची आणि समाप्तीची (expiry) तारीख आणि लसीची वैधता कधीपर्यंत आहे हे निर्दिष्ट करेल.

**९. लसीकरण प्रमाणपत्राचा तपशील.** या अधिनियमांतर्गत जारी केलेले प्रत्येक लसीकरण प्रमाणपत्र केंद्र सरकारने विहित केलेल्या स्वरूपात असेल.

**१०. नियंत्रित क्षेत्र आणि मुक्त क्षेत्रामध्ये प्राण्यांचा प्रवेश आणि बाहेर जाणे.** (१) जेथे एखादे क्षेत्र नियंत्रित क्षेत्र घोषित केले आहे, तेथे कोणत्याही प्राण्याला त्या क्षेत्राबाहेर नेले जाणार नाही किंवा आत आणले जाणार नाही, कलम १६ मधील तरतुदींशिवाय. (२) संचालक अधिकृत राजपत्र आणि स्थानिक वृत्तपत्रात नोटीस प्रसिद्ध करून ही बंदी इतर प्रजातींच्या प्राण्यांसाठीही वाढवू शकतात, जर त्यांना संसर्ग होण्याचा धोका असेल. (३) माल किंवा प्राण्यांची वाहतूक करणारा कोणताही वाहक (carrier) जोपर्यंत कलम १६ चे पालन करत नाही, तोपर्यंत कोणत्याही प्राण्याला नियंत्रित, मुक्त किंवा बाधित क्षेत्रातून नेणार नाही. (४) उप-कलम (१) ते (३) मधील काहीही रेल्वेद्वारे होणाऱ्या वाहतुकीला लागू होणार नाही, जोपर्यंत प्राण्याला त्या बाधित क्षेत्रात उतरवले जात नाही.

**११. नियंत्रित क्षेत्रांच्या संदर्भात प्रतिबंधात्मक उपाय.** कोणतीही व्यक्ती नियंत्रित क्षेत्राबाहेर खालील गोष्टी नेणार नाही. कोणताही प्राणी, जिवंत किंवा मृत, जो अनुसूचित रोगाने संक्रमित आहे किंवा संक्रमित असल्याचा संशय आहे; कोणत्याही प्रकारचे चारा, अंथरुण किंवा इतर साहित्य जे संक्रमित प्राण्याच्या संपर्कात आले आहे; किंवा अशा प्राण्याचे मृतदेह, कातडे किंवा इतर कोणताही भाग किंवा उत्पादन.

**१२. नियंत्रित क्षेत्रांमध्ये बाजार, जत्रा, प्रदर्शने इत्यादींवर बंदी.** नियंत्रित क्षेत्रामध्ये प्राण्यांचा बाजार, जत्रा किंवा प्रदर्शने भरवण्यास मनाई आहे. परंतु सक्षम अधिकारी विशिष्ट परिस्थितीत यातून सूट देऊ शकतात.

**१३. बाजार आणि इतर ठिकाणी बाधित प्राणी आणण्यास मनाई.** कोणतीही व्यक्ती अनुसूचित रोगाने संक्रमित असल्याचे माहित असलेला कोणताही प्राणी बाजार, जत्रा किंवा सार्वजनिक ठिकाणी आणणार नाही किंवा तसा प्रयत्न करणार नाही.

**१४. तपासणी नाके आणि अलगीकरण शिबिरे.** संचालक राज्यात आवश्यकतेनुसार अलगीकरण शिबिरे आणि तपासणी नाके स्थापन करू शकतात. अनुसूचित रोगाने ग्रस्त प्राण्यांच्या किंवा त्यांच्या संपर्कात आलेल्या प्राण्यांच्या स्थानबद्धतेसाठी; नियंत्रित, बाधित किंवा मुक्त क्षेत्रात प्राण्यांचा प्रवेश किंवा बाहेर जाणे रोखण्यासाठी. कोणत्याही प्राण्याला सक्षम अधिकाऱ्याच्या सूचनेनुसार अलगीकरण शिबिरात ठेवता येईल. शिबिरात असलेल्या प्रत्येक प्राण्याचे लसीकरण आणि चिन्हांकन केले जाईल.

**१५. तपासणी नाके आणि अलगीकरण शिबिरांमध्ये प्राण्यांची तपासणी आणि स्थानबद्धता.** तपासणी नाका किंवा अलगीकरण शिबिराचा प्रभारी प्रत्येक व्यक्ती तेथे थांबवलेल्या किंवा ठेवलेल्या कोणत्याही प्राण्याची तपासणी करेल.

**१६. लसीकरण केलेल्या प्राण्यांचा नियंत्रित आणि मुक्त क्षेत्रांत प्रवेश आणि बाहेर जाणे.** कलम १० मध्ये काहीही असले तरी, ज्या प्राण्याचे योग्य लसीकरण झाले आहे आणि लसीकरणानंतर किमान २१ दिवस उलटले आहेत, अशा प्राण्याला प्रमाणपत्राच्या आधारे नियंत्रित किंवा मुक्त क्षेत्रात प्रवेश किंवा बाहेर जाण्याची परवानगी दिली जाईल.

**१७. सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती.** राज्य सरकार या अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी अधिसूचनेद्वारे कोणत्याही व्यक्तीला 'सक्षम अधिकारी' म्हणून नियुक्त करू शकते.

**१८. वाहनांची स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण.** प्राण्यांच्या वाहतुकीपूर्वी आणि नंतर प्रत्येक वाहन किंवा जहाज स्वच्छ आणि निर्जंतुकीकरण केले जाईल.

**१९. प्रवेश आणि तपासणीचे अधिकार.** कोणताही पशुवैद्यकीय अधिकारी किंवा सक्षम अधिकारी या अधिनियमाच्या पालनाची खात्री करण्यासाठी कोणत्याही जमिनीवर, इमारतीत, जहाजात किंवा वाहनात प्रवेश आणि तपासणी करू शकतो.





**प्रकरण ३: बाधित क्षेत्रे**

**२०. बाधित क्षेत्रांची घोषणा.** जर पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे समाधान झाले की त्याच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही ठिकाणी प्राणी अनुसूचित रोगाने संक्रमित झाला आहे, तर तो त्या भागाला 'बाधित क्षेत्र' घोषित करू शकतो.

**२१. बाधित क्षेत्रांच्या घोषणेचा परिणाम.** बाधित क्षेत्राला नियंत्रित क्षेत्राचे सर्व नियम लागू होतील.

**२२. बाधित क्षेत्राची अधिसूचना रद्द करणे.** जर पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे समाधान झाले की आता संसर्गाचा धोका नाही, तर तो अधिसूचना काढून ते क्षेत्र बाधित नसल्याचे घोषित करू शकतो.

**प्रकरण ४: बाधित प्राणी**

**२३. बाधित प्राण्यांचे अलगीकरण, तपासणी आणि उपचार.** जर पशुवैद्याला एखादा प्राणी संक्रमित असल्याचा संशय असेल, तर तो लेखी स्वरूपात मालकाला प्राण्याला वेगळे ठेवण्याचे किंवा उपचार करण्याचे आदेश देऊ शकतो.

**२३. प्राण्यांकडून नमुने घेणे.** रोग निश्चित करण्यासाठी किंवा लस प्रभावी आहे की नाही हे तपासण्यासाठी पशुवैद्यकीय अधिकारी प्राण्यांकडून आवश्यक नमुने घेऊ शकतात.

**२५. बाधित प्राण्यांसाठी दयामरण (Euthanasia).** जर पशुवैद्यकीय अधिकाऱ्याला वाटले की रोगाचा प्रसार रोखण्यासाठी किंवा सार्वजनिक आरोग्याच्या रक्षणासाठी प्राण्याला दयामरण देणे आवश्यक आहे, तर तो तसा लेखी आदेश देऊ शकतो.

**२६. मृतदेहाची विल्हेवाट लावणे.** ज्या प्राण्याचा मृत्यू संसर्गजन्य रोगामुळे झाला आहे, त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट विहित पद्धतीने करणे बंधनकारक आहे.

**२७. शवविच्छेदन तपासणी.** मृत्यूचे कारण शोधण्यासाठी पशुवैद्यकीय अधिकारी शवविच्छेदन करू शकतात.

**२८. काही प्राण्यांची जप्ती आणि त्यांना हटवणे.** जर मालक नसलेला एखादा बाधित प्राणी आढळला, तर सक्षम अधिकारी त्याला जप्त करून वेगळ्या ठिकाणी हलवू शकतात.

**प्रकरण ५: अंमलबजावणी आणि दंड**

**२९. आदेशांची अंमलबजावणी आणि खर्चाची वसुली.** आदेशांचे पालन न केल्यास, प्रशासन स्वतः ती पावले उचलेल आणि त्याचा खर्च संबंधित मालक किंवा नगरपालिकेकडून वसूल केला जाईल.

**३०. ग्राम अधिकारी इत्यादींनी मदत करणे.** सर्व स्थानिक आणि सरकारी अधिकाऱ्यांनी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना माहिती देणे आणि कामात मदत करणे बंधनकारक आहे.

**३१. लसीकरण प्रमाणपत्राबद्दल दंड.** अधिकाराशिवाय प्रमाणपत्र देणे किंवा दोषपूर्ण लस टोचणे या गुन्ह्यासाठी ५,००० ते १०,००० रुपयांपर्यंत दंड आणि कारावासाची तरतूद आहे.

**३२. दंड.** अधिनियमाचे उल्लंघन करणाऱ्यास १,००० ते २,००० रुपयांपर्यंत दंड किंवा कारावास होऊ शकतो.

**३३. बाधित प्राणी किंवा मृतदेह पाण्यात टाकल्याबद्दल दंड.** संक्रमित प्राण्याचा मृतदेह नदी किंवा इतर जलस्रोतात टाकल्यास २,००० ते ५,००० रुपयांपर्यंत दंड किंवा ३ महिन्यांपर्यंत कारावास होऊ शकतो.

**३४. कंपन्यांद्वारे केलेले गुन्हे.** जर कंपनीने गुन्हा केला असेल, तर कंपनी आणि जबाबदार अधिकारी दोघांनाही दोषी मानले जाईल.

**प्रकरण ६: कारक जीवाणूंवर प्रतिबंधात्मक उपाय**

**३५. कारक जीवाणूंचा प्रसार रोखणे.** लस बनवणाऱ्या प्रयोगशाळांनी हे सुनिश्चित करणे आवश्यक आहे की रोगाचे जीवाणू बाहेर पसरणार नाहीत. नियम न पाळल्यास २०,००० रुपयांपर्यंत दंड किंवा ६ महिन्यांपर्यंत कारावास होऊ शकतो.

**प्रकरण ७: संकीर्ण**

३६. **अधिकार प्रदान करण्याची शक्ती (Power to delegate):** राज्य सरकार अधिसूचनेद्वारे, कलम ४२ च्या पोट-कलम (२) अंतर्गत नियम बनवण्याचे अधिकार वगळता, या अधिनियमाद्वारे प्रदान केलेले सर्व किंवा कोणतेही अधिकार आपल्या अधीनस्थ कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा प्राधिकरणाला सोपवू शकते.

३७. **अधिकारी आणि प्राधिकरणांनी सरकारी नियंत्रणाखाली कार्य करणे:** या अधिनियमांतर्गत सर्व अधिकारी आणि प्राधिकरणांनी त्यांच्या अधिकारांचा वापर आणि कर्तव्यांचे पालन केंद्र सरकार किंवा राज्य सरकारने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार करावे.

३८. **अनुसूची दुरुस्त करण्याचा अधिकार:** केंद्र सरकार अधिसूचनेद्वारे अनुसूचीमध्ये कोणत्याही प्राण्यांच्या रोगाचा समावेश करू शकते किंवा तो वगळू शकते. अशा प्रत्येक अधिसूचनेची प्रत संसदेच्या दोन्ही सभागृहा समोर मांडली जाणे आवश्यक आहे.

३९. **निर्देश जारी करण्याचा अधिकार:** प्राण्यांच्या कोणत्याही संसर्गजन्य रोगाचे प्रतिबंध, नियंत्रण आणि निर्मूलनासाठी केंद्र सरकार राज्य सरकारला किंवा इतर प्राधिकरणांना वेळोवेळी निर्देश देऊ शकते, ज्यात सांख्यिकी आणि लसीकरणाच्या माहितीचा समावेश असेल. अशा निर्देशांचे पालन करणे अनिवार्य असेल.

४०. **विशिष्ट व्यक्तींना लोकसेवक मानले जाणे:** या अधिनियमांतर्गत कार्य करणारे प्रत्येक सक्षम अधिकारी, संचालक आणि पशुवैद्यकीय अधिकारी हे 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) च्या कलम २१ च्या अर्थानुसार 'लोकसेवक' मानले जातील.

४१. **अडचणी दूर करण्याचा अधिकार:** या अधिनियमाच्या अंमलबजावणीत कोणतीही अडचण आल्यास, केंद्र सरकार राजपत्रात आदेश प्रसिद्ध करून ती अडचण दूर करण्यासाठी आवश्यक तरतुदी करू शकते. मात्र, असा कोणताही आदेश अधिनियम लागू झाल्यापासून दोन वर्षांनंतर काढता येणार नाही.

४२. **नियम बनवण्याचा केंद्र सरकारचा अधिकार:** केंद्र सरकार या अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी नियम बनवू शकते, ज्यात प्रामुख्याने लसीकरण प्रमाणपत्राचा नमुना (कलम ९), मृत शरीराची विल्हेवाट लावण्याची पद्धत (कलम २६) आणि शवविच्छेदन तपासणीच्या पद्धतीचा (कलम २७) समावेश असेल.

४३. **नियम बनवण्याचा राज्य सरकारचा अधिकार:** राज्य सरकार केंद्र सरकारच्या पूर्वपरवानगीने या अधिनियमाच्या उद्देशापूर्तीसाठी नियम बनवू शकते , ज्यात अलग ठेवण्याच्या शिबिराचा (Quarantine Camp) परवाना, तपासणी नाक्यावरील अटकाव आणि प्राण्यांचे चिन्हांकन यासारख्या बाबींचा समावेश असेल.

४४. **नियम मांडणे:** केंद्र सरकारने बनवलेले नियम संसदेच्या दोन्ही सभागृहासमोर ३० दिवसांच्या कालावधीसाठी मांडले जातील. तसेच राज्य सरकारने बनवलेले नियम राज्य विधीमंडळासमोर मांडले जातील.

४५. **रद्द करणे आणि व्यावृत्ती (Repeal and Savings):** हा अधिनियम लागू झाल्यावर 'द ग्लँडर्स अँड फार्सि ॲक्ट, १८९९' आणि 'द ड्युरीन ॲक्ट, १९१०' रद्द होतील.

तर, एकंदरीत हा कायदा आणि कायद्यातील एकूण ४५ कलमे पशुवैद्यकीय क्षेत्राशी निगडित क्षेत्रीय स्तरावरील कामकाज तसेच प्राण्यांना होणाऱ्या संसर्गजन्य आणि सांसर्गिक रोगांचे प्रतिबंध, नियंत्रण आणि निर्मूलन करण्यासाठी तसेच अशा रोगांचा प्रादुर्भाव किंवा प्रसार एका राज्यातून दुसऱ्या राज्यात होण्यापासून रोखण्यासाठी आणि प्राणी आणि प्राणीजन्य उत्पादनांच्या आयात-निर्यातीसाठी भारताच्या आंतरराष्ट्रीय जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी संपूर्ण देशांतर्गत **एकीकृत दृष्टीकोनातून** (Unified approach) कामकाज करण्याकरिता सर्वार्थाने अधिकार प्रदान करतो.






# पशुधनसंपन्न महाराष्ट्र





**डॉ. प्रवीण बनकर**
सहयोगी प्राध्यापक, पशुआनुवंशिकी व पैदासशास्त्र विभाग
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला

पशुपालन क्षेत्र मानवाच्या नागरीकरणाच्या इतिहासाइतकेच प्राचीन असून, कृषि संस्कृतीचे अविभाज्य अंग आहे. म्हणूनच केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरात विविध भागात स्थानिक पशुसंपदा लोकजीवनाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक अशा विविध पातळ्यांवर आपले अस्तित्व राखून असल्याचे दिसते. नुकतेच महाराष्ट्रातील मेळघाट या वन्य व पहाडी भागातील "मेळघाटी" म्हशीला स्वतंत्र जात म्हणून राजमान्यता मिळाली आहे. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाने यापुर्वी महाराष्ट्रातील बेरारी शेळी, पुर्णाथडी म्हैस आणि करकंबी वराह यांची स्वतंत्र पशुधन जात म्हणुन नोंद केलेली आहे.

भारतीय कृषि अनुसंधान परिषद (ICAR) अंतर्गत कर्नाल (हरयाणा) येथील राष्ट्रीय पशु आनुवंशिकी संसाधन ब्यूरो (NBAGR) ही शिखर संस्था पशुधनाच्या विविधतेचा शास्त्रशुद्ध अभ्यास करते. देशी पशुधनाच्या वैविध्यतेचा मागोवा घेतल्यास भारतात सद्यस्थितीत **२४२** पशुधन जातींची रीतसर नोंदीकरण झालेले आहे. पशुधनाच्या वर्गवारीनुसार गायींच्या ५५, म्हशी-२२, शेळ्या-४३, मेंढया-४६, घोडे-८, गाढव-४, उंट-९, वराह (डुक्कर)-१५, श्वान (कुत्रा) - ५, याक -२, कोंबड्या - २१, बदक - ९ व गीज-२, मिथुन-१ इत्यादी वैशिष्ट्यपूर्ण प्रजाती नोंदीकृत आहेत.

याव्यतिरिक्त नियोजनबद्ध संकरातून ३ गोवंश (करन फ्रिस, करन स्विस आणि वृन्दावनी) आणि १ मेंढी (अविशान) अशा ४ जाती विकसित करण्यात आलेल्या आहेत. अशा पशुधनाच्या उगमस्थान, पैदासक्षेत्र, ऐतिहासिक संदर्भ, पशुगणना, बाह्यगुण, उत्पादन व प्रजनन गुणधर्म, उपयोगिता, जनुकीय विविधता, पारंपरिक पशुपालक समुदाय इत्यादी बाबींचा सविस्तर अभ्यास झालेला असून, त्यांना **वर्णीत** (Descript/ Recognized) म्हणून ओळखले जाते. वर्णीत पशुधन हे त्या-त्या भागाची भौगोलिक, सामाजिक व सांस्कृतिक अस्मिता असून, पशुपालकाला सामाजिक दर्जा प्रदान करणारे तसेच बाजारपेठेत वाढीव किंमत मिळवून देणारे ठरते. याद्दष्टीने, एखाद्या विशिष्ट भूभागातील किंवा प्रदेशातील देशी पशुधन शास्त्रीयरित्या नोंदणी करणे गरजेचे ठरते.

दूध, अंडी, मांस, लोकर, शेणखत अशी उत्पादने देशी पशुधनापासून मिळतात तर वाहतूक, ओझेकाम अशा शेतीपूरक कामांसाठी पशुधनाचा महत्वाचा उपयोग होतो. ग्रामीण आणि दुर्गम भागात शेतीसंबंधी पूरक कामे करण्यासाठी आजच्या यांत्रिक युगात देखील बैल, रेडे, गाढव, खेचर अशा पशुधनाची "अश्वशक्ती" महत्वाची भूमिका बजावते. पशुपालन हा आता शेतीपूरक जोडधंदा राहिला नसून, स्वतंत्र व्यवसायाचे रूप धारण करत असल्याने युवकांमध्ये, महिलांमध्ये स्वयंरोजगाराची हुकमी पर्याय म्हणून ग्रामीण व शहरी तरुणाईला खुणावत आहे.

व्यावसायिक पातळीवर उद्योजकता जोपासण्यासाठी पशुपालन शास्त्रोक्त पद्धतीने करणे गरजेचे असते. त्यासाठी आपल्या पशुधनाची बाह्यरुप, उत्पादन, प्रजनन गुणधर्म यांची तपशीलवार माहिती पशुपालकांना आणि अभ्यासकांना उत्तम पशूंच्या निवडीसाठी, व्यवसायासाठी आणि संवर्धनासाठी आवश्यक असते.

महाराष्ट्रात देखील गाई (देवणी, लाल कंधारी, डांगी, गवळावू, खिल्लार, कोंकण कपिला, कठाणी); म्हशी (नागपुरी, पंढरपूरी, मराठवाडी, पूर्णाथडी, मेळघाटी); शेळ्या (उस्मानाबादी, संगमनेरी, बेरारी आणि कोंकण कन्याळ); मेंढया (दख्खनी); घोडा (भीमथडी), वराह (करकंबी) अशी संपन्न पशुधन विविधता आढळते. खिल्लार गोवंशाच्या आटपाडी, म्हसवड, नकली, कोसा, पंढरपूरी, ब्राह्मणी, डफळया, हरण्या, धनगरी अशा विविध उपजाती आढळतात तर डांगी गोवंशाच्या पारा, बहाळा, लाल, मानेरी / काळा मोगरा आदीउपजाती आढळतात.

नागपुरी म्हशीच्या गौळणी, एलिचपुरी, शाही, चांदा अशा उपजाती विदर्भात आहेत. म्हणजे जनुकीय विविधतेच्या दृष्टिकोनातूनही अभिमान बाळगता यावा, अशा उत्तम प्रकारचे पशुधन राज्यात आढळते. मात्र, गुणवान पशुधनाची पुरेशी ओळख नसल्यास त्यांची उपयोगिता खालावते, पैदासक्षम संख्या रोडावते आणि अस्तित्वाच्या वाटेवर संकटग्रस्त होते. म्हणून देशी पशुधनाचे संवर्धन ही आगामी काळातील महत्वाची बाब ठरते. चराई क्षेत्रात झालेली घट, पैदाशीबाबतचे अज्ञान, यांत्रिकीकरणाने घटलेली उपयुक्तता, पारंपरिक पशुपालक घटकाबाबत धोरणशून्यता अशा अनेक कारणाने बहुमोल देशी पशुधनसंपदेचा ऱ्हास पावत आहे. गेल्या काही दशकात देशी पशुधनाची जनुकीय जैविक विविधता लोप होत आहे.

भारताच्या अनेक भागात सद्यस्थितीत असे देशी पशुधन शेतकरी व भटक्या पशुपालक समाजाकडे नांदते आहे की, ज्यांचा शास्त्रोक्त अभ्यास किंवा नोंदणी झालेली नाही. आपण अशा देशी पशुधनाला सर्रास "गावठी किंवा गावराण" म्हणून संबोधतो. देशी पशुधनात आपल्या स्थानिक हवामानात अनुकुलरित्या जुळवून घेण्याची विलक्षण शक्ती निसर्गाने प्रदान केलेली असून, सकस दुध देण्याची क्षमता तसेच निकृष्ट दर्जाचा चारा पचविण्याची क्षमता, काही रोगाविरुद्ध प्रतिकारक्षमता यांसारखे गुणधर्म आढळतात. मात्र, अशा गावठी पशुधनाच्या अंगभूत उपयुक्त गुणधर्मांचा पुरेसा अभ्यास न झाल्याने त्यांच्या वाट्याला उपयोगीतेची उपेक्षा येते.

गावठी पशुधनाला बाजारपेठेत फारशी किंमत लाभत नाही. याशिवाय, सांख्यिकीदृष्ट्या एखाद्या भागातील देशी पशुधनाचे योगदान आणि वैविध्यतेचे मूल्यमापन होत नाही. पशुधन आनुवंशिक सुधारणा कार्यक्रमात पैदासप्रणाली यशस्वीपणे राबविण्यास अडचणी येतात. म्हणून, अशा अवर्णीत (Non-Descript/ Unrecognized) पशुधनाची शास्त्रीयरित्या नोंदणी करण्यासाठी केंद्र शासनाने ICAR-NBAGR या संस्थेमार्फत राज्यातील कृषी व पशुवैद्यकीय विद्यापीठांच्या सहकार्यातून "शून्य अवर्णीत देशी पशुधन प्रकल्प" हाती घेतला आहे. ऐतिहासिक दस्तावेज व पशुपालकांशी संवाद साधून विविध भागातील अवर्णीत पशुधनाच्या अभ्यासासाठी दमदार पावले उचलली जात आहेत.





शेतकरी आणि पशुपालकांत सुपरिचित असलेल्या विविध नामवंत व राजाश्रय लाभलेल्या पशुधन जातींची नोंद, या संस्थेने ठोस ऐतिहासिक पुरावे, इतरांपासून भिन्नता दर्शविणारे त्यांचे लक्षणीय रंगरूप आणि गुणधर्म, प्रादेशिक अनुकूलता आणि पारंपरिक पशुपालक समूह अशा अनेक दृष्टीकोनातून केलेली आहे. मात्र, लोकाश्रय लाभलेल्या आणि नोंदीकृत पशुधन जातींच्या तुलनेत गावठी किंवा देशी म्हणून दुर्लक्षित राहिलेल्या अनेक पशुधन प्रजाती अस्तित्वात असल्याची बाब वैज्ञानिकांच्या लक्षात आल्याने अशा पशुधनाचे ऐतिहासिक संदर्भ आणि प्रत्यक्षात असलेले विपुल पशुधन या दोहोंच्या आधारावर अवर्णीत पशुधनाचा शास्त्रीय पद्धतीने मागोवा घेण्याचे प्रयत्न केंद्र शासनाच्या वतीने सुरू झाले आहेत.

केवळ अवर्णीत (नॉन डिस्क्रिप्ट) म्हणून दुर्लक्षित राहिलेल्या देशी पशुधन आणि त्यांची उपयुक्तता यांचा शोध घेण्याचे प्रयत्न केंद्र शासनाच्या "मिशन झिरो नॉन डिस्क्रिप्ट" म्हणजे शून्य अवर्णीत पशुधन अभियानांतर्गत सुरू आहेत. स्थानिक नोंदीकृत पशुधनाच्या जातींव्यतिरिक्त मोठ्या संख्येने उपलब्ध व दुर्लक्षित असलेले देशी पशुधन समूह शास्त्रोक्त पातळीवर अभ्यासून त्यांना नोंदीकृत / वर्णीत पशुधनाच्या कक्षेत सामावून घेण्यासाठी केंद्रीय संशोधन संस्था, कृषि व पशुवैद्यकीय विद्यापीठे, पशुसंवर्धन विभाग व बिगरशासकीय संस्था आदींनी पुढाकार घेतला आहे. महाराष्ट्रातील अवर्णीत पशुधनाचा ऐतिहासिक संदर्भ व प्रत्यक्ष केलेले सर्व्हेक्षण या माध्यमातून मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे. विविध राष्ट्रिय प्रकल्पांतर्गत विद्यापिठाने स्थानिक खामगाव, उमरडा, मेळघाटी इ. गोवंश, गवळाउ म्हैस, उदगिरी शेळी, कैकाडी व गोदाथडी गाढव, जानवळ पश्मी व कारवान कुत्रे अशा देशी अवर्णित पशुधनाच्या अधिकृत नोंदीसाठी प्रस्ताव सादर केलेले असुन, वऱ्हाडी आणि मथुरा लभाण या गोवंशावर शास्त्रोक्त अभ्यास सुरु आहे.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या वतीने अशा अवर्णीत पशुधन संपदेचे शास्त्रीय नोंदीकरण करीत स्थानिक पशुपालकांची अस्मिता जपण्याचे प्रयत्न सुरू आहेत. जातिवंत पशुधनाच्या संगोपनास चालना देण्यासाठी पशुपालकांच्या पुढाकारातून ब्रीड सोसायटी स्थापन करण्यासाठी तांत्रिक मार्गदर्शन विद्यापीठ करीत आहे. पुस्तके, घडीपत्रिका, व्याख्याने, प्रशिक्षणे, पशुप्रदर्शने अशा विविध माध्यमातुन महाराष्ट्रातील संपन्न पशुधनाची शास्त्रोक्त माहिती पशुसंवर्धन विभागातील अधिकारी व कर्मचारी, संशोधक, पशुपालक, शेतकरी, व्यावसायिक आणि नागरिकाना दिली जात आहे.

आपल्या दर्जेदार शिक्षण, गुणवत्तापूर्ण संशोधन आणि लोकाभिमुख विस्तार कार्य या त्रिवेणी विचारधारेतून आणि स्थानिक पातळीवर संबंधित पशुपालक, पशुसंवर्धन विभाग, बिगर शासकीय संस्था, पशुप्रेमी यांच्या एकत्रित समन्वयातून देशी पशुधनाच्या संवर्धनासाठी माफसु विद्यापीठ पुढाकार घेत आहे. आपले देशी पशुधन हा आपला नैसर्गिक जैविक वारसा आहे म्हणून आगामी काळातील अज्ञात आव्हाने लक्षात घेता, उपलब्ध पशुधनाचे जनुकीय विविधता संरक्षित करण्यासाठी संशोधन संस्था, पशुधन अभ्यासक, पशूप्रेमींनी व पशुपालकांनी पुढे सरसारवणे गरजेचे आहे.

# मराठवाडी म्हैस



**उगमस्थान व पैदासक्षेत्र:**

स्थानिक पातळीवर दुधनाथडी म्हणून परिचित असलेली मराठवाडी एक महत्वाची म्हशीची जात आहे. लातूर, नांदेड, बीड, जालना व परभणी या जिल्हयांमध्ये या जातीच्या म्हशी मुख्यत्वे आढळतात. दुधासाठी तसेच वाहतुकीच्या उद्देशाने मराठवाडी म्हशींचे पालन केले जाते.

**शारीरिक गुणधर्म**

**बाह्यरूप :** मराठवाडी म्हशीचा रंग सामान्यतः काळा ते गडद काळा असून, क्वचित कपाळ व पायावर पांढऱ्या खुणा आढळून येतात. मराठवाडी म्हशी लहान ते मध्यम बांधाच्या असतात. कपाळ मध्यम रुंद, लांब मान, डोळे थोडेसे लालसर असतात. मध्यम लांबीचे गुडघ्याच्या खालपर्यंत लोंबणारे शेपूट (सरासरी ६५ सेंमी) असते, तर पायाची खुरे काळया रंगाची व एकमेकास बिलगलेली असतात. मराठवाडी म्हशीचा शेपटीचा गोंडा हा पांढरा असतो.

**डोके, शिंगे व कान:** शिंगाची लांबी मध्यम (सरासरी ४३ सेंमी) असते आणि मानेस समांतर असते, शिंगे खांद्यापर्यंत पोहोचतात, परंतु खांद्याच्या पलीकडे जाणारी नसतात. लगतच्या पंढरपुरी जातीच्या म्हशीपेक्षा मराठवाडी म्हशींचे वेगळे वैशिष्ट्य म्हणजे शिंगांची लांबी. मराठवाडी म्हशीचे शिंगे फक्त खांद्यापर्यंत पोहचतात, पंढरपुरी जातीच्या म्हशीत शिंगे लांबलचक असून, कधीकधी शिंगे कटिबंधाच्या हाडापर्यंतदेखील पोहोचू शकतात. कान मध्यम लांबीचे सरासरी झुकलेले असतात.

**कासः** कासेची बांधणी घट्ट व मध्यम आकाराची दिसून येते तर सड गोलाकार व लांबट आकाराची आढळतात.



## शारीरिक वजन व मोजमापे

| अ.क्र. | लिंग | नर | मादी |
|---|---|---|---|
| १ | जन्मत: वजन (कि.ग्रॅ.) | २४.५ | २३.७ |
| २ | प्रौढ वजन (कि.ग्रॅ.) | ४१७ | ३४७ |
| ३ | छातीचा घेर (सेंमी) | १८२ | १८७ |
| ४ | शारीरिक उंची (सेंमी) | १३३ | १२४ |
| ५ | शारीरिक लांबी (सेंमी) | १४९ | १२९ |

### उत्पादन गुणधर्म

मराठवाडी म्हैस अतिशय काटक असून, फक्त चाऱ्यावरच ३ ते ५ लिटर दूध उत्पादन देण्याची क्षमता या म्हशीत आहे.

| दूध उत्पादन गुणधर्म | सरासरी |
|---|---|
| प्रतीदिन दूध उत्पादन | ३.५२ कि. ग्रॅ. |
| एका वेतातील दूध उत्पादन | १११८ कि. ग्रॅ. |
| दूध उत्पादनाचा काळ | ३१८ कि. ग्रॅ. |
| भाकडकाळ | १८४ कि. ग्रॅ. |
| दुधातील स्निग्धांशाचे प्रमाण | ६.२५ % |

### मराठवाडी म्हशीचे प्रजनन गुणधर्म

| प्रजनन गुणधर्म | सरासरी |
|---|---|
| प्रथम माजावर येण्याचे वय | ४१ महिने |
| प्रथम गर्भधारणेचे वय | |
| प्रथम विण्याचे वय | |
| दोन वेतातील अंतर | |
| व्यायल्यानंतर पुन्हा गाभण राहण्याचा काळ | |
| गाभण काळ | |
| ऋतुचक्राचा कालावधी | |







### उपयुक्तता

मराठवाडी म्हशींची पैदास मुख्यत: दुधासाठी केली जाते. मराठवाड्यातील प्रतिकूल परिस्थितीत जुळवून घेण्याची क्षमता असल्याने, उत्तम दुधाचे उत्पादन देणारी म्हणून मराठवाडी म्हशीला मराठवाडयाचे 'काळं सोनं' म्हटले जाते.

# पोल्ट्री फार्म्ससाठी जैवसुरक्षा उपाययोजना



कुक्कुटपालन व्यवसायात रोगाचा प्रसार रोखणे व पक्ष्यांमधील तणाव कमी करणे या उपायांवर सर्वसमावेशक प्रक्षेत्राची जैवसुरक्षा अवलंबून आहे. यात वैचारिक (संकल्पनात्मक), स्ट्रक्चरल (संरचनात्मक), ऑपरेशनल (कामकाज / कार्यपध्दती), व व्यवस्थापन या प्रमुख घटकांचा समावेश होतो.

**संकल्पनात्मक जैवसुरक्षा:** वेगळ्या ठिकाणांची निवड करणे, इतर पोल्ट्रीपासून अंतर राखणे यांचा समावेश होतो. ब्रीडर फार्म्स साइट्स आणि ग्रो-आउट सुविधांपासून वेगळे करणे स्वतंत्र शेड असणे, अशा बाबींचा या घटकात समावेश असतो.

**स्ट्रक्चरल जैवसुरक्षा:** सावधगिरीमध्ये अनधिकृत प्रवेश रोखण्यासाठी कुंपण घालणे, नियमित पाण्याचे स्रोत चाचणी, योग्य वाहन स्वच्छता क्षेत्रे, फीड स्टोरेज, सर्व-हवामानात टिकतील असे रस्ते आणि मृत पक्ष्यांची विल्हेवाट. विभक्त स्टोरेजसह वन्यजीव-प्रतिबंधक गृहनिर्माण, सोबत वनस्पतिविरहित परिमिती, उंदीर आणि वन्यजीवांच्या घुसखोरीचा धोका कमी करणे इत्यादी बाबींचा समावेश होतो.

**ऑपरेशनल जैवसुरक्षा:** स्पष्ट प्रक्रिया, निर्जंतुकीकरण, अभ्यागत प्रवेश नियंत्रण, कामगार स्वच्छता, अभ्यागत नोंदी, कीटक नियंत्रण, रोग निदान आणि लसीकरण वेळापत्रक पाळणे, लहान प्रमाणात अंडी उत्पादनासाठी सर्व-इन-ऑल-आउट प्रणाली इत्यादी प्रकारच्या कार्यपध्दतींचा अवलंबकरणे अपेक्षित असते.

**व्यवस्थापन जैवसुरक्षा:** वयावर आधारित पक्षी वेगळे करणे, कचरा व्यवस्थापन, दर्जेदार पिल्ले योग्य स्रोताकडून खरेदी करणे, संतुलित पोषण सुनिश्चित करणे, पाण्याची पुरेशी गुणवत्ता, योग्य मृत पक्षी आणि खत विल्हेवाट इत्यादी बाबींचा समावेश असतो.

### लहान कुक्कुट प्रक्षेत्रावर करावयाचे जैवसुरक्षा उपायः

- **परिमिती सुरक्षित कराः** प्रक्षेत्रावरील प्रवेश प्रतिबंधित करण्यासाठी कुंपण वापरा आणि प्रवेशद्वारावर "प्रतिबंधित" चिन्हे पोस्ट करावे.
- **प्रक्षेत्र प्रवेश नियंत्रणः** केवळ आवश्यक कर्मचारी आणि अधिकृत अभ्यागतांना फार्ममध्ये प्रवेश करण्याची परवानगी द्या आणि कोण येते आणि जाते, याची नोंद ठेवा.
- **स्वच्छता आणि निर्जंतुकीकरणः** उपकरणे, वाहने आणि जमिनीसह प्रक्षेत्र नियमितपणे स्वच्छ आणि निर्जंतुक करा.
- **पोशाख आणि पादत्राणे:** कर्मचारी आणि अभ्यागतांसाठी प्रक्षेत्रावर वावरण्यासाठी प्रक्षेत्रावरील स्वच्छ निर्जंतुक कपडे आणि पादत्राणे प्रदान करावेत. पक्षीघरात प्रवेश करण्यापूर्वी पोशाख व पादत्राणे बदलल्याची खात्री करावी.
- **हात धुवा आणि कपडे बदलाः** प्रक्षेत्रात जाण्यापूर्वी व नंतर, कर्मचाऱ्यांनी हात धुवावेत व स्वच्छ पोशाख वापरावा.
- **पक्ष्यांचे पिण्याचे पाणी व्यवस्थापित कराः** बॅक्टेरिया, खनिजे आणि रोगजनकांसाठी पाण्याच्या गुणवत्तेची चाचणी घ्या व ते पक्ष्यांसाठी सुरक्षित आहे याची खात्री करा.
- **पक्ष्यांचे खाद्य :** खाद्य साठवण किमान जमिनीच्या वर एक फूट उंच ओटा किंवा टेबल यावर साठवावे. खाद्य हाताळताना कोरडे भांडे वापरावे. ओलावा असल्यास खाद्याचा दर्जा बिघडण्याची शक्यता असते. खाद्याची साठवण ज्या भागात करावयाची आहे, त्या भागात दमटपणा असू नये.



**मृत पक्ष्यांची विल्हेवाटः** मृत पक्ष्यांना कळपातून ताबडतोब काढून टाका आणि त्यांची सुरक्षितपणे विल्हेवाट लावा.

**कीटक व उंदीर नियंत्रणः** कीटक व उंदीर नियंत्रित करण्यासाठी सापळे, आमिष व योग्य साठवण भांडी / पात्र वापरा.

**वन्य पक्ष्यांना दूर ठेवाः** जंगली पक्ष्यांना कळपाच्या संपर्कात येण्यापासून रोखण्यासाठी स्क्रीन किंवा जाळी वापरा.

**पक्ष्यांची पहाणीः** पक्ष्यांचे वर्तन जाणून घेण्यासाठी पहाणी फेरी घ्यावी, यामुळे आजारी पक्षी व आजाराची चिन्हे ओळखता येतात.

### पशुसंवर्धन विभाग, भारत सरकारकडून सन २०२१ मध्ये शासकीय / खाजगी पोल्ट्री फार्म्ससाठी जैवसुरक्षेबाबत प्राप्त मार्गदर्शक सूचनांमधील ठळक मुद्दे:

१. देशभरातील सर्व पोल्ट्री फार्मसनी पक्षाच्या आरोग्यासाठी मुलभूत स्वच्छता विषयक अटींचे पालन करणे गरजेचे आहे. यामधूनच स्वच्छ व आरोग्यदायी उत्पादने मिळू शकतात.

२. रोगप्रादुर्भाव टाळण्यासाठी सर्वव्यापी जैवसुरक्षा कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे, रोगांचे सर्वेक्षण करणे, फार्मवरील नियमीत कामाचे मुल्यमापन करणे इ. आवश्यक आहे.

३. बर्ड फ्ल्यू सारख्या रोगाची आपत्ती उद्भवणार नाही याकरिता चोख जैवसुरक्षा प्लॅनची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

४. या मार्गदर्शक सूचनांमध्ये स्वच्छता, वाहतूक, मलमूत्र व्यवस्थापन, मृत पक्ष्यांची विल्हेवाट, खाद्य सुरक्षा, उपचार, लसीकरण, योग्य रोग नमूने गोळा करणे इत्यादी विषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे.

५. क्षेत्रिय स्तरावरील अधिकाऱ्यांनी पोल्ट्री फार्मस्वर जैवसुरक्षा खात्री करण्याकरीता २०२१ चा बर्ड फल्यू ॲक्शन प्लॅन, Prevention & Control of Infectious & Biomedical Waste Rules, १९९८, Prevention & Control of Infectious & Contagious Diseases in Animals Act, २००९ या मध्ये सूचीत केल्याप्रमाणे कार्यवाही करीत असल्याची खात्री बाळगावी.

६. स्थलांतरीत पक्षी, वन्यपक्षी / कावळे इ. मध्ये मरतूक आढळल्यास फार्मवर त्यांचे शवविच्छेदन करू नये. विभागीय / राज्यस्तरीय / जिल्हास्तरीय प्रयोगशाळेस त्वरीत सूचना द्याव्यात.

७. अशा प्रयोगशाळांनी नियमाप्रमाणे निदाना करीता नमूने गोळा करुन आवश्यकतेप्रमाणे तपासणी करावी. बर्ड फ्ल्यू रोगासाठी संशयीत नमूने NIHSAD प्रयोगशाळा, भोपाळ येथे रोग अन्वेषण विभाग, पुणे यांचे मार्फत पाठवावेत. अन्य आजारांसाठी नियमाप्रमाणे रोग निदानाची कार्यवाही करावी.


८. संशयित / प्रादुर्भाव झालेल्या फार्मवरून पक्षांची वाहतूक, विक्री / खरेदी, खाद्य वाहतूक पुणे थांबवावी.

९. फार्म्सवर जैवसुरक्षेबाबत आवश्यक तेथे सूचना व चिन्हांचा प्रभावीपणे वापर करावा.

१०. प्रत्येक गावातील ग्राम पंचायतीने धुण्याचा सोडा (सोडीयम कार्बोनेट) यांचे १ लिटर पाण्यामध्ये ७ ग्रॅम याप्रमाणे द्रावण युनायटेड स्टेट डिपार्टमेंट ऑफ ॲग्रीकल्चर (युएसडीए) या आंतरराष्ट्रीय संस्थेने शिफारस केल्याप्रमाणे तयार करुन कोंबड्यांची खुराडे, गुरांचे गोठे, गावातील गटारे, नाल्या, पशुपक्ष्यांचा वावर असलेल्या भिंती व जमिनीवर तात्काळ फवारणी करावी. पुन्हा दर १५ दिवसाच्या अंतराने ३ वेळेस फवारणी करावी. यामुळे विषाणु, जिवाणु, माश्या, गोचिड, ऊवा इत्यादींचा प्रादुर्भाव रोखणे शक्य होईल.

१९. अशाप्रकारे पोल्ट्री फार्मवर जैवसुरक्षा उपाययोजना करून पक्षांना रोगांपासून व या रोगाचे मानवास होणाऱ्या संक्रमणापासून वाचवणे शक्य होईल. देशभरातील सर्व फार्मनी अशा प्रकारची कार्यवाही चोखपणे केल्यास निरोगी, सुरक्षित व निकोप कुक्कुट पालन करणे साध्य होईल.

१२. संपूर्ण मार्गदर्शक सूचनांसाठी केंद्र शासनाचे संकेतस्थळ www.dahd.nio.in अवश्य पाहावे.





# पशुआहाराची दशसुत्री



पशुआहाराचे योग्य नियोजन करणे हे केवळ जनावरांच्या आरोग्यासाठीच नव्हे, तर दुग्धव्यवसायाच्या आर्थिक फायद्यासाठीही अत्यंत महत्त्वाचे आहे. 'पशुआहाराची दशसुत्री' हे एक असे शास्त्रशुद्ध मॉडेल आहे, जे पशुधनाला संतुलित आहार मिळवून देते. यामध्ये प्रामुख्याने हिरवा चारा, सुका चारा व पशुखाद्य यांचे योग्य प्रमाण, पशुधनास लागणारी खनिजे व स्वच्छ पाण्याची उपलब्धता यावर भर दिला जातो. थोडक्यात सांगायचे तर, पशुआहाराची दशसुत्री अंगीकारणे म्हणजे आधुनिक व शाश्वत दुग्धव्यवसायाचा पाया रचणे होय.



**डॉ. भगतसिंग कदम**
सहाय्यक आयुक्त,रोगनियंत्रण, पसं-१२,
पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७

**१) वासरांचा आहार:** जन्मल्याबरोबर वासरांस मातेचे दूध, अर्थात चीक पाजणे अत्यावश्यक आहे. कारण त्यातील रोग प्रतिबंधक घटकांमुळे वासरांचे बालवयात होणाऱ्या रोगांपासून संरक्षण होते. शिवाय जन्मल्यानंतर ६ तासाचे आत हे चीक अन्न नलिकेतून शोषून घेण्याची क्षमता जास्त असते.

वासरांचे किमान १ महिन्यार्पत मातेचे दूध पाजावे. दूध पाजण्याचे प्रतीदिन प्रमाण त्याच्या वजनाच्या अंदाजे १०% एवढे असावे व ते एकाच वेळेच न देता दिवसांतून २ ते ३ वेळा विभागून पाजावे. दूध पाजण्याच्या वेळेतील अंतर सारखे ठेवावे. या काळात वासराला मातेचे दूध मिळाल्यास वाढ चांगली होते.

वयाच्या दुसऱ्या आठवड्यापासून वासराला प्रथिनयुक्त गोवत्स आहार (काफ स्टार्टर) देण्यास हळूहळू सुरुवात करावी. अशाप्रकारे चौथ्या आठवड्यापर्यंत संपूर्ण दूध बंद करुन गोवत्स आहार द्यावा. हा आहार वासरांस ६ महिनेपर्यंत देता येतो. अशाप्रकारे वासराच्या संगोपनावरील खर्च कमी करता येईल. बाजारात गोवत्स आहार काफ स्टार्टर या नावाने तयार सुध्दा मिळतो किंवा घरीच गोवत्स आहार तयार करावयाचा असल्यास, भरडलेला मका-५०%, भुईमूग, सोयाबिन किंवा तिळाची पेंड-३०%, गव्हाचा कोंडा-७%, क्षार, खनिज मिश्रण- २% व मीठ १%, असे मिश्रण तयार करुन त्यात प्रती १०० किलो खाद्यात २० ग्रॅम अ व ड जीवनसत्व असलेली पावडर मिसळावी. वासरु २ ते ३ आठवड्याचे झाल्यानंतर, त्याला कोवळे लुसलुसीत गवत देण्यास सुरुवात करावी. यामुळे रवंथ करणाऱ्या पोटाची वाढ लवकर होते.

**२) पशुसाठी चारा:** प्रत्येक जनावराची खाद्यातील शुष्क पदार्थ खाण्याची ठराविक गरज असते. साधारणपणे वजनाच्या २ ते २.५ टक्के शुष्क पदार्थ जनावराला त्याच्या आहारातून पुरविले पाहिजेत. यासाठी त्याच्या आहरात वाळलेला चारा असणे आवश्यक ठरतो. रवंथ करणाऱ्या जनावरांचे पोट मोठे असते. ते संपूर्ण भरल्यानंतर त्यास भूक मिटल्याचे समाधान मिळते.

मोठ्या जनावरांमध्ये हिरव्या चाऱ्याचा अंतर्भाव करणे फायदेशीर आहे. त्यातून जनावराला अ जीवनसत्वाचा पुरवठा होऊन त्याचे डोळे, कातडी त्वचा सतेज होते. शिवाय रोग प्रतिकारशक्ती वाढून उत्पादनाची पातळी टिकविण्यास मदत होते. हिरव्या चाऱ्यातून जनावरांस पोषकद्रव्ये अगदी ताज्या स्वरुपात मिळतात. यामुळे आरोग्य चांगले टिकून राहते.

**द्विदल व कडधान्य चाऱ्याचे मिश्रण:** चाऱ्यातून चांगल्या प्रमाणात प्रथिने व इतर पोषक द्रव्ये मिळण्यासाठी हिरवा चारा देताना, त्यात द्विदल चारा जसे, लुसर्न, बरसीम किंवा मुग, भुईमूग, उडीद यासोबत कडधान्य चारा जसे की मका, ज्वारी इत्यादीचे १:३ प्रमाणात मिश्रण करावे. केवळ द्विदल चारा पोटभर खावू घातल्यानेही अपचनाचा व पोटफुगीचा त्रास होवू शकतो. चारा कुटी करुन दिल्यास वाया जाण्याचे प्रमाण कमी होते. शिवाय अशा चाऱ्याची पाचकता जास्त असते.




**३. उत्पादक पशुचा आहार:** देशी गाईला सव्वा किलो तर संकरीत गाईला व म्हशीला दिड ते पावणे दोन किलो तयार संतुलीत पशुखाद्य केवळ शरीर पोषणासाठी लागते. या व्यतिरिक्त प्रत्येक २ ते २.१/२ लिटर दूध उत्पादनासाठी १ किलो संतुलित पशुखाद्य अतिरिक्त दिले पाहिजे. म्हणजे आपल्या दुधाळ जनावरांकडून चांगले उत्पादन मिळू शकेल. गाभण काळाच्या सातव्या महिन्यापासून शरीर पोषणा व्यतिरिक्त १ किलो पशुखाद्य अधिक द्यावे. यामुळे गर्भाची वाढ योग्यप्रकारे होते व जन्मणारे वासरुसुध्दा चांगल्या वजनाचे राहते. याशिवाय पुढील दूध उत्पादन टिकविण्यासाठी मोलाची मदत होते.

**४) पशुखाद्याचा वापर:** बाजारात विविध कंपन्याचे पशुखाद्य तयार स्वरुपात मिळते. हे खाद्य संतुलित असून, जनावराची आवश्यकता लक्षात घेवून बनविलेले असते. वासरे, भाकड जनावरे व दुधाळ जनावरे यांच्यासाठी वेगवेगळे खाद्य कंपनी बनवते. वासरांसाठी काफ रेशन, भाकड जनावरांसाठी ड्राय रेशन, दुधाळ जनावरांसाठी मिल्क रेशन तर १० लिटर पेक्षा जास्त दूध देणाऱ्या गायी म्हशीसाठी स्पेशल मिल्क रेशन बाजारात मिळते.

**५) खनिज व क्षार मिश्रणाचा वापर:** बाजारात उपलब्ध असलेल्या चांगल्या दर्जाच्या खनिज व क्षार मिश्रणात (मिनरल मिक्श्चर) जनावरांस आवश्यक असे घटक असतात. खनिज व क्षाराच्या आहारातील अभावामुळे जनावरांस बरेच आजार होवू शकतात. ज्यामुळे दूध उत्पादन कमी होते, वंधत्व येते, जनावर व्यवस्थित माजावर येत नाही. हे सर्व टाळण्यसाठी जनावरांच्या १ किलो खाद्यात अंदाजे २० ग्रॅम खनिज क्षार मिश्रण टाकणे आवश्यक आहे.

**६) घरगुती खुराक:** बाजारातून तयार पशुखाद्य विकत घेणे परवडत नसल्यास घरच्या घरीसुध्दा खुराक तयार करता येईल. यासाठी खालील प्रमाणात खाद्य मिश्रण करावे. पेंड किंवा ढेप - २५ ते ३५%, ज्वारी, बाजरी, मका-२५ ते ३५%, गहू किंवा तांदळाचा कोंडा-१० ते २५%, दाळ चुनी-५ ते २० % या मिश्रणातील घटकांचे प्रमाण जनावरांच्या आवश्यकतेनुसार व खाद्य पदार्थांच्या उपलब्धतेनुसार बदलावे. या खुरकात १ टक्का खनिज मिश्रण पावडर व १ ते २टक्के खाण्याचे मीठ मिसळावे,



घरच्या घरी खाद्य किंवा खुराक तयार करावयाचा असल्यास त्यातील खाद्य घटक चांगल्या प्रतीचे असतील, याची खात्री करुन घ्यावी. केवळ स्वस्त मिळते म्हणून, निकृष्ट दर्जाच्या खाद्य पदार्थांचा अंतर्भाव करु नये. यामुळे शरीरास आवश्यक पोषण द्रव्यांचा लाभ न होता उलट नुकसानच होईल. बुरशी चढलेले खाद्यपदार्थ खुराकात कधीही वापरु नये.

**७) खाद्यातील बदल व देण्याची वेळ:** पशुखाद्यात किंवा चाऱ्यात एकदम बदल केल्यास, जनावरे खाणार नाहीत, किंवा कमी खातील, खाल्यास अपचनाचा त्रास उद्भवू शकेल. शिवाय उत्पन्न ही घटेल, चारा किंवा पशुखाद्य देण्याची वेळ आणि त्यातील अंतर नियमित ठेवावे. चारापाणी देण्याच्या वेळेतील अनियमितपणा खाद्याच्या पाचकतेवरही परिणाम करु शकते. यामुळे अपचनाचा धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



**८) चारा प्रक्रिया व साठवण:** चारा टंचाईच्या काळात निकृष्ट चारा जनावरांना देण्याची वेळ येते असा चारा चवदार असण्याची शक्यता कमी असते. त्यासाठी चाऱ्यावर मिठाचे पाणी शिंपडल्यास चारा चवदार होईल. या शिवाय मळी उपलब्ध असल्यास त्याचाही वापर करता येईल. उसाचे पाचट, गव्हाचे अथवा तांदळाचे काड यासारखा निकृष्ट चारा / कुटार वापरतांना युरीयाचा वापर करण्यात येतो. त्यासोबत उसाची मळी किंवा काळा गुळ अशा उर्जा स्त्रोताचा पुरवठा केला पाहिजे. पशुआहारात युरीयाचा वापर करण्यापूर्वी पशुवैद्यकाचा सल्ला जरुर घ्यावा.

सर्वसाधारणपणे आपल्याकडे पावसाळ्यात व हिवाळ्यात हिरवा चारा, गवत उपलब्ध असते. त्यामुळे जनावरांचे आरोग्य चांगले राहते. मात्र, उन्हाळ्यात असा चांगला चारा उपलब्ध न झाल्यामुळे जनावरांचे आरोग्य ढासळते व उत्पादन कमी होते. हे सर्व टाळण्यासाठी चांगला चारा टिकवून ठेवणे जरुरीचे आहे. अशावेळेस ज्वारी, मका यासारखा हिरवा चारा कुटी करुन मुरघास खड्ड्यात साठवून ठेवावा. गवत असल्यास त्यातील पाण्याचा अंश कमी करुन सावलीत साठवून ठेवावे. म्हणजे चारा टंचाईच्या काळात चारा जनावरांस देवून त्यांचे आरोग्य व उत्पादन टिकवून ठेवता येईल.

**(९) जंतनाशक औषध:** विशेषतः वासरांमध्ये जंत होण्याचे प्रमाण अधिक असते. यामुळे वासरू खंगत जावून त्याची वाढ खुंटते, पोटाचे आकारमान वाढते व त्वचा खरखरीत होऊन केस गळतात. जंत झाल्यानंतर वासराचा आहार वाढलेला असतो. मात्र, त्यातून मिळणाऱ्या अन्न द्रव्याचा जास्तीत जास्त लाभ पोटातील जंत आपल्या स्वतःच्या वाढीसाठी करतात. त्यामुळे वासराच्या शरीरास त्याचा लाभा फार कमी होतो. तसेच खाद्यावरील खर्च सुध्दा वाया जातो. यासाठी वासराला ६ महिन्यापर्यंत दर महिन्याला तर मोठ्या जनावरांना वर्षातून दोन ते तीन वेळा जंताचे औषध जरुर द्यावे.

**१०) खाद्य व चाऱ्याची नोंद:** पशुपालन व्यवसायात सर्वात जास्त खर्च (सुमारे ६० ते ६५%) खाद्यावर व चाऱ्यावर होत असल्यामुळे, खाद्य व चाऱ्याच्या वापराची व संबंदित खर्चाची सखोल नोंद ठेवणे अत्यावश्यक आहे. यामुळे आपल्या व्यवसायाचा फायदा किंवा तोट्याची आपणांस वेळीच कल्पना येवू शकेल व पुढील नुकसान टळू शकेल.





# गाभण गायीचे संगोपन व वितांना घेण्याची काळजी



गाभण गायीला सहाव्या महिन्यापासून शरीरपोषणासाठी व दुधासाठी दिलेल्या खुराकाशिवाय १ किलो अधिक खुराक देणे आवश्यक आहे. गाभण गाईस खनिजद्रव्ये मिळण्यासाठी क्षारांची वीट दावणीत जवळच बांधून ठेवावीत. गाभण गाय दूध देत असल्यास ७ महिने पूर्ण झाल्यानंतर म्हणजे शेवटचे दोन महिने गाय आटवावी. गाय आटवताना कासदाह अथवा कासेचे आजार होऊ नये म्हणून सडामध्ये अँन्टीबायोटिक औषधे सोडावीत. गाभण गायीस डोंगर उतारावर नेऊ नये. गाभण गायीला कळपातून वेगळे करून शांत व हवेशीर जागेत ठेवावे. गोठ्यातील जागा निसरडी नसावी, जेणेकरून गाय पडणार नाही. शेवटच्या दोन महिन्यांत गायीला पुरेशी विश्रांती मिळेल, याची काळजी घ्यावी.

**गायीची विताना घेण्याची काळजी**

गायीच्या विण्याची वेळ जसजशी जवळ येते, तशी त्याची काळजी घेणे अत्यंत महत्वाचे आहे. गाय विण्याच्या वेळी तिला एकांत हवा असतो, म्हणून तिला कळपातून वेगळी ठेवण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. गाय विण्याची क्रिया जेव्हा सुरु होते तेव्हा जनावरांची उठ / बैस सुरु होते. जनावर बेचैन होते. त्यानंतर पानमोठ अथवा पाण्याची पिशवी योनीमार्गातून बाहेर येते व नंतर वासरु बाहेर येण्याची क्रिया सुरु होते. वासराचे प्रथम पाय दिसू लागतात. वासरु येण्यास काही मदतीची आवश्यकता भासल्यास मदत करावी. ही क्रिया सर्वसाधारणपणे १-२ तासात होणे अपेक्षित आहे. गायीची विताना काळजी घेताना वरील सर्व गोष्टी माहीती असणे आवश्यक आहे.

विण्याची क्रिया घडत असताना काही गुंतागुंत निर्माण झाल्यास त्वरीत पशुवैद्यकाशी संपर्क साधावा. गावठी भोंदू माणसांकडून हाताळणी करणे टाळावे. अन्यथा जनावरांचे कमी/जास्त होऊ शकते. गावठी भोंदू माणासांना याबाबतचे शास्त्रीय ज्ञान नसलेने त्यांच्यावर विश्वास न ठेवता नुकसान टाळावे.

**गाय विल्यानंतर घ्यावयाची काळजी**

- वासरु सुखरुप बाहेर पडल्यानंतर २१/२ इंच नाळ ठेवून निर्जंतूक ब्लेड अथवा चाकूने कापून टाकावी व त्या ठिकाणी टिंक्चर आयोडिनचा वापर करावा.
- गाय व्यायल्यानंतर १४-१८ तासात वार पडणे क्रमप्राप्त आहे. वार हाताने काढण्याची घाई करु नये. त्यामुळे गर्भाशयास इजा होण्याची जास्त शक्यता असते.
- वार पडावी म्हणून चप्पल अथवा दगड लावून बांधू नये. वार न पडल्यास पशुवैद्याचा सल्ला घ्यावा.

# गायी-म्हशींतील कासदाह





गाई-म्हशींमधील कासदाह हा एक असा रोग आहे, जो बहुतेक वेळा अधिक दूध देणाऱ्या जनावरांना भेडसावतो. या रोगामध्ये दुधाळ जनावरांचा ओवा / सड सूजतात व दूधात खराबी येते. कधी-कधी ओवा दुःखदायक होतो तसा तो गरम देखील जाणवतो.

कासदाह रोगास ग्रामीण भागात दगडी रोग असे म्हणतात. अधिकतर हा रोग विभिन्न प्रकारच्या जीवाणूद्वारा उद्भवतो, जे की जनावराच्या सडांवर जमा होतात व ओव्यास झालेल्या इजा अथवा घाव यामध्ये किंवा सडांच्या छिद्रात पोहोचतात व कासेमध्ये प्रवेश करतात.

या रोगाचे तीन प्रकार आढळतात.

- **लक्षण रहित रोग**- या रोगाचे निदान दुधाचे परीक्षण केल्यावरच होते; कारण या प्रकारच्या बाधेत स्तन सूजत नाहीत किंवा दुधात कोणतीही खराबी दिसत नाही. हा रोग जास्त नुकसानदायक असतो.
- **लक्षण सहित रोग**- या रोग बाधेत ओव्याची सूज, दूध नासणे (फाटणे) व पुष्कळदा दूध अतिशय पातळ आणि पिवळे इत्यादी लक्षणे आढळतात.
- **जुनाट रोग**- या रोगात जनावरांच्या ओव्यात रोगकारक जंतू दिर्घकाळ पर्यंत वास्तव्य करुन आपली संख्यात्मक वाढ करीत असतात. तथा दूध तयार करणाऱ्या ग्रंथींचा नाश करतात. ओवा आकाराने लहान व कडक होतो.

- **औषधोपचार** - हा रोग समजल्याबरोबर पशु चिकीत्साकाशी तात्काळ संपर्क करुन लवकर उपचार करायला हवा अन्यथा या बाधेत दूध तयार करणाऱ्या पेशीमध्ये खराबी येते आणि दूध निर्मिती थांबते.

### रोग नियंत्रण-

१) जनावरे आणि गोठे स्वच्छ ठेवा.
२) जनावरांच्या सडाला इजा होवू देऊ नका.
३) दूध काढण्यापूर्वी कास व सडांना पाण्याने धुऊन काढा.
४) दूध काढण्यापूर्वी आपले हात स्वच्छ धुवून घ्या.
५) ज्या सडातील दूध खराब आहे, त्या सडाचे दूध शेवटी काढा व ते उपयोगात आणू नका आणि वासरांनाही पाजू नका.
६) दूध काढल्यानंतर सड जिवाणूरोधक (ॲन्टीसेप्टीक) द्रावण (पोलिसान डी, सोडीयम हाईपोक्लोराईड, अथवा क्लोरहैक्सीडिनच्या (सॅव्हलॉन) ०.५% द्रावणाने दररोज धार काढल्यानंतर टीट-डिप करायला हवे.
७) दूध काढल्यावर जनावर किमान अर्धा तास उभे राहील, याची दक्षता घ्या. कासदाह या रोगावर नियंत्रण ठेवल्यास औषधोपचाराचा खर्च व आर्थिक नुकसान टाळता येते.

# अशी घ्या नवजात वासरांची काळजी



१. पहिल्या दहा दिवसात पांढरी हगवण लागते. दुधाचे प्रमाण वाढल्यामुळे असे होते. याकरिता दिवसातून ३ ते ४ वेळा विभागून पचेल, असे दूध द्यावे व ताबडतोब अशा रेडकास औषधोपचार करावा.

२. हिरव्या रंगाचे जुलाब झाल्यास वयस्कर रेडकास जंत झाले असण्याची शक्यता असते.

३. रेडकू एक महिन्याचे झाल्यावर त्याला जंतनाशक औषध द्या. दिड महिन्याच्या रेडकाला लाळखुरकत प्रतिबंधक लस टोचून घ्या. दोन ते सहा महिन्यादरम्यान घटसर्प व फऱ्या लसीकरण करा.

४. रेडके एकमेकाला चाटत असल्यास पोटात केसाचा गोळा तयार होतो. याकरिता क्षारांची वीट गव्हाणीत योग्य उंचीवर ठेवल्यास ती वीट वासरे चाटतील.

५. रेडकांच्या खाद्याच्या ठिकाणी कुत्री येऊ देऊ नका. कुत्र्याच्या विष्ठेपासून पडणाऱ्या जंतामुळे त्यांच्या मेंदूत, फुफ्फुसे, हृदय, यकृत आदिंना इजा होते.

६. अ जीवनसत्वाची रेडकांना अत्यंत गरज असते. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्याने पावडर किंवा द्रवरुपात ते द्यावे.

७. नाळेचा आजार, गुडघे- सूज किंवा फुफ्फुसाचा दाह, याव्यतिरिक्त कातडीवर बुरशीजन्य रोग होणे, तोंडावर, मानेवर गोल चट्टे पडून केस गळणे असे आजार मुख्यत्वेकरुन अस्वच्छतेमुळे होतात. यावर त्वरीत औषधोपचार करावेत.

८. दररोज ५०० ते ७०० ग्रॅम रेडकाचे वजन वाढणे गरजेचे आहे. त्याकरिता ज्या रेडीचे सहा महिन्यातच वजन जास्त असते ती रेडी लवकर वयात येते. गाभण राहते व दूधही जास्त येते.

## विविध शारिरीक अवस्थेमध्ये संतुलित खाद्य देण्याचे प्रमाण

| पशुधन | उदरनिर्वाहाकरिता | दुधउत्पादनाकरिता |
|---|---|---|
| गाई (देशी) | १ ते १.५ कि. प्रती दिन | २.५ लि. दुधाकरिता १ किलो प्रतीदिन |
| संकरीत गाई/म्हशी | १.५ ते २ कि. प्रती दिन | २ लि. दुधाकरिता १ किलो प्रतीदिन |
| वाढीकरिता | १.५ ते ३ कि. प्रती दिन | |
| गर्भावस्थेत | १ .५ ते २.५ कि.प्रती दिन | |
| बैलांकरिता | १.५ ते २ कि.प्रती दिन | |

# निकृष्ट चाऱ्यावर युरिया प्रक्रिया



गव्हाचा भुसा, काड, भाताचा पेंढा, गवत, मक्याची लाटे, बाजरीचे सरमाड, ऊसाचे पाचट, वाडे, तुर, हरभरा इ. निकृष्ट चाऱ्यावर प्रक्रिया करुन त्यांचे सकस चाऱ्यात रुपांतर करता येते. निकृष्ट चाऱ्यातील प्रथिनांचे व मूळ पचनियतेचे प्रमाण युरिया प्रक्रिया करून वाढवता येते.

**युरिया प्रक्रिया करण्याची पध्दत :**

१. प्रक्रियेकरिता सिमेंट कॉंक्रीटचा ओटा किंवा सारवलेली स्वच्छ जागा निवडावी.

२. वाळलेला १० किलो भाताचा पेंढा किंवा गव्हाचे काड व्यवस्थित ४ ते ६ इंच उंचीचा समान थर करुन ठेवावा. ३.६० लीटर पाण्यात ४ किलो युरिया पूर्णपणे विरघळवावा. प्रत्येक प्रक्रियेवेळी ताजे मिश्रण तयार करुनच प्रक्रिया करावी.

३. युरिया आणि पाण्याचे तयार केलेले निम्मे मिश्रण गव्हाचे काड / भाताच्या पेंढ्यावर सम प्रमाणात झारीने फवारावे.

४. लाकडी दाताळ्याच्या साहाय्याने किंवा हाताने वैरणीचा थर उलटा करावा.

५. उर्वरीत पाणी युरीया मिश्रण वैरणीवर फवारुन घ्यावे.

६. प्रक्रिया केलेल्या वैरणीचा कोपऱ्यात व्यवस्थित ढिग करावा. ढिग करताना वैरणीचे थरावर थर देऊन भरपूर दाब द्यावा, जेणेकरुन वैरण घट्ट दाबून बसेल आणि त्यातील जास्तीत जास्त हवा बाहेर पडेल. घट्ट नसलेल्या ढिगातील वैरणीवर युरिया प्रक्रिया परिणामकारक होत नाही असे दिसून आलेले आहे. ढिगाचे पावसापासून रक्षण करणे आवश्यक आहे.

७. वैरणीचा ढिग गोणपाट किंवा प्लॅस्टिकच्या कागदाने पूर्णपणे झाकावा. पूर्ण ४ आठवडे ढिग उघडू नये आणि हलवू नये.

८. चार आठवड्याच्या कालावधीत युरीयापासून तयार होणारा अमोनिया वैरणीवर प्रक्रिया करतो; त्यामुळे वैरण मऊ होऊन त्यातील नत्राचे प्रमाण वाढते व वैरणीचा रंग पिंवळा- सोनेरी होऊन वैरण खाण्यास योग्य अशी तयार होते.

९. युरीया प्रक्रिया करावयाची जागा, स्वच्छ, टणक, पाऊस आणि दलदल यापासून संरक्षित असावी.

१०. प्रथम पशुवैद्यकीय तज्ञाकडून युरीया प्रक्रिया करणे शिकूनच नंतर स्वतःच करावी.

**युरीया प्रक्रिया केलेली वैरण कशी खाऊ घालावी :**

१. ढिगातील वैरण काढताना प्रत्येक वेळी समोरच्या बाजूचा आवश्यक तेवढा भाग काढून घेऊन पुन्हा ढिग पूर्ववत सरळ करुन पुरेसा दाब देवून ठेवावा.

२. प्रक्रिया केलेली वैरण खाऊ घालण्यापूर्वी सुमारे एक तास पसरवून ठेवावी, जेणेकरुन वैरणीतील अमोनिया वायूचा वास (दर्प) निघून जाईल.

३. प्रक्रिया केलेल्या वैरणीची चव जनावरांना एकदम न आवडल्याने जनावरे वैरण खात नसतील तर अशी वैरण इतर प्रक्रिया न केलेल्या वैरणीत थोडी थोडी मिसळून जनावरांना खायला घालावी आणि हळूहळू प्रक्रिया केलेल्या वैरणीचे प्रमाण वाढवावे.

४. प्रक्रिया केलेली वैरण जनावरांना खायला देण्यास सुरुवात केल्यानंतर १५ दिवसांनी जनावराचे दुग्धोत्पादन, शरीरस्वास्थ्य आणि शरीराची वाढ याबाबत निरीक्षण करावे. प्रक्रिया केलेली वैरण सलग पध्दतीने जनावरांना खाण्यास दिल्यास उत्तम परिणाम दिसून येतील.

५. प्रक्रिया केलेली वैरण जनावरांना हिरव्या वैरणीबरोबर किंवा स्वतंत्रपणे खाऊ घालता येईल.

६. प्रक्रिया केलेली वैरण दुभत्या, माकड, गाभण गाई, म्हशींना तसेच ६ महिन्यावरील वासरांना कोणत्याही प्रमाणात खाऊ घालता येईल.

७. सहा महिन्यापेक्षा कमी वयाच्या वासरांना व तीन महिन्यापेक्षा कमी वयाच्या करडांना प्रक्रियायुक्त वैरण खाण्यास देऊ नये. रवंथ करणाऱ्या सर्व मोठ्या जनावरांना देण्यास हरकत नाही.

**युरीया मिश्रणाचा वापर करताना घ्यावयाची काळजी.**

१. पहिले १० ते १५ दिवस प्रक्रिया केलेली वैरण कमी प्रमाणात जनावरांना खाण्यास द्यावी व हळूहळू त्याचे प्रमाण वाढवावे.
२. प्रक्रिया केलेली वैरण जनावरांना कमी तापमानाचे वेळी म्हणजेच सकाळी व संध्याकाळी खाऊ घालावी.
३. प्रक्रिया केलेली वैरण खाऊ घालताना रोज कमीत कमी ४ ते ५ कि. ग्रॅम हिरवी वैरण देण्याची व्यवस्था करावी. जीवनसत्त्वाचा पुरवठा होण्याकरीता प्रत्येक जनावरास तज्ञ पशुवैद्यकाच्या सल्ल्याने रोज जीवनसत्वयुक्त पावडर द्यावी.
४. प्रक्रिया केली वैरण, जनावरांना खाऊ घालत असताना सोयाबीचे आंबवण व तत्सम पदार्थ खाण्यास देऊ नये.
५. पशुखाद्यामध्ये प्रती किलोग्रॅम १० ते १५ ग्रॅम युरिया असते व युरीया प्रक्रिया केलेल्या ५ ते ६ किग्रॅ वैरणीत सुमारे १०० ग्रॅम युरिया असतो. युरीया मळीची प्रक्रिया केलेली वैरण खाऊ घालताना अशा वैरणीद्वारे व पशुखाद्याद्वारे मिळून प्रत्येक जनावरांस रोज १९०-२०० ग्रॅम पेक्षा जास्त युरीया दिला जाणार नाही, याची काळजी घ्यावी.

**युरीया प्रक्रिया केलेली वैरण खाऊ घालण्याचे फायदे :**

१. रोज ५ लीटर दूध देणाऱ्या गाईस आणि ३ लीटर दूध देणाऱ्या म्हशींना वरील प्रक्रिया केलेली वैरण खाण्यास दिल्यास त्यांना आंबवण देण्याची आवश्यकता नाही.
२. भरपूर दूध देणाऱ्या जनावरांच्या रोजच्या एकूण देय आंबोणातून १/३ आंबोण जरी कमी केले तरी त्यांच्या दूध उत्पादनावर ही प्रक्रिया केलेली वैरण खाण्यास दिल्याने कसलाच विपरीत परिणाम किंवा दुधामध्ये घट झाल्याचे दिसून येत नाही.
३. कमी खर्चात दुभत्या जनावरापासून जास्त दुध उत्पादन मिळवता येते. प्रक्रियेमुळे गव्हाच्या काडातील प्रथिनांचे प्रमाण ४% पर्यंत आणि एकूण पचनीय पदार्थाचे प्रमाण ५६% पर्यंत वाढल्याचे दिसून आले आहे. म्हणजेच यामध्ये कडब्यापेक्षा ३% जास्त पचनीय प्रथिने व ५% जास्त एकूण पचनीय पदार्थ असतात. ५ ते ६ लीटर पर्यंत दूध देणाऱ्या गाई / म्हशींना प्रक्रिया केलेली वैरण खाऊ घातल्यास त्यांच्या दुधात दररोज पाव ते एक लीटर पर्यंत वाढ झाल्याचे दिसून येते.
४. प्रक्रिया केलली ही कमी खर्चाची वैरण संपूर्ण वर्षभर खाऊ घालता येते.
५. गव्हाचा भूसा, काड तसेच भाताचा पेंढा, इत्यादी सारख्या टाकाऊ वैरणीचा चांगला वापर करता येतो.
६. स्वतःकडे असलेला कडबा विकून त्या बदल्यात जनावरांसाठी गव्हाचे काड / भाताचा पेंढा वापरल्यासही उत्पन्नात भर पडेल.

१०० किलोग्रॅम कुटी केलेल्या निकस वैरणीवर २ किलोग्रॅम युरीया, २ किलोग्रॅम गुळ, १ किलोग्रॅम खनिज मिश्रण आणि १ किलोग्रॅम मीठ ४० लीटर पाण्यात पूर्णपणे विरघळून घेऊन निकस चाऱ्यावर फवारावे. इथे गुळ / साखरेची मळी उपलब्ध नसल्यास गुळाचा वापर करावा. प्रत्येक वेळी मिश्रण करून ते ताबडतोब वापरावे. या पध्दतीने प्रक्रिया केलेली कुट्टी पहिले १५ दिवस रोज ३ किलोग्रॅम प्रमाणे खाऊ घालावी आणि नंतर हळूहळू हे प्रमाण वाढवत ५ ते ६ कि. ग्रॅम पर्यंत न्यावे. या कुटीबरोबर हिरवी वैरण किंवा पशुखाद्य मिसळून खाऊ घातले तरी चालेल.

महाराष्ट्र विशेषतः कोकण विभागामध्ये भाताचा पेंढा किंवा इतर भागात गव्हाचे काड भरपूर प्रमारात उपलब्ध आहे. तेव्हा त्यावर युरीया प्रक्रिया करुन जनावरांना खाऊ घातल्यास निश्चितच अल्प किंमतीत प्रथिनयुक्त चारा मिळण्यास मदत होईल

# अंधश्रद्धेला सोडा, विज्ञानाची कास धरा!

पशुपालक मित्रांनो, पशुपालन हा केवळ व्यवसाय नसून तो आपल्या उदरनिर्वाहाचा मुख्य आधार आहे. मात्र, आजही अनेक ठिकाणी जनावरे आजारी पडल्यास पशुवैद्यकाकडे जाण्याऐवजी अघोरी विद्या, अंगारा-धुपारा किंवा दैवी कोपासारख्या अंधश्रद्धांचा आधार घेतला जातो. जनावरांचे आजार हे जीवाणू, विषाणू किंवा चुकीच्या आहारामुळे होतात, कोणाच्या 'दृष्टी'मुळे नव्हे. घरगुती तोडगे किंवा बुवाबाजीमध्ये वेळ वाया घालवल्याने जनावराचा जीव जाऊ शकतो आणि तुमचे मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते. जनावर सुस्त दिसल्यास किंवा खात नसल्यास त्वरित पशुसंवर्धन विभागाच्या पशुवैद्यकीय डॉक्टरांचा सल्ला घ्या. अंधश्रद्धेला सोडा, विज्ञानाची कास धरा! विज्ञानावर विश्वास ठेवा व योग्य उपचार देऊन जनावरांचे प्राण वाचवा. सुशिक्षित पशुपालकच प्रगत गोठा घडवू शकतो.

| असे नकोच | याचा विचार कृतीसाठी करा |
|---|---|
| ❑ जनावरांच्या जिभेवर काटे आले असल्यास अशा गैरसमजातून चप्पल / गवऱ्या यासारख्या वस्तू घासणे. | ❖ जिभेला जखमा करु नका तर पशुवैद्याकडून रोगाचा उपचार करुन घ्या. |
| ❑ करणफोड करणे. | ❖ मुतखड्याची शस्त्रक्रिया करुन घ्या. |
| ❑ शेपटीस उंदरी / चाय / सरड्या झाल्यास शेपटी कुऱ्हाडीने तोडणे किंवा गरम तेलात तळणे | ❖ भूल देवून शेपटीचा रोगी भाग काढण्याची शस्त्रक्रिया सहज करता येते. |
| ❑ जनावर लंगडल्यास / एखादा भाग सुजल्यास डागणे | ❖ साध्या पशुवैद्यकीय उपचाराने सूज/लंगडणे कमी करता येते. |
| ❑ गोऱ्ह्यांचे खच्चीकरण दोन शिवळात / दोन काठ्यात धरुन करणे | ❖ पशुवैद्यकीय दवाखान्यात उपलब्ध असलेल्या चिमट्यानेच खच्चीकरण करावे तीच शास्त्रीय पध्दत आहे. |
| ❑ जिभेची फाशी तोडणे किंवा काळफोड फोडणे | ❖ रोग लक्षणांशी काळफोडचा काहीही संबंध नसतो. काळफोड फोडला किंवा फाशी तोडली तर जीभ लुळी होते, सुजते किंवा रक्तस्राव होतो म्हणून हे टाळावे. |
| ❑ डोळा पांढरा झाल्यास तंबाखू किंवा मिठाच्या पिचकाऱ्या डोळ्यात मारणे. | ❖ तंबाखू/मिठाची पिचकारी डोळ्यात दाह निर्माण करील व अंधत्व येईल म्हणून हे टाळा व डॉक्टरांकडून डोळ्यावर उपचार करा. |
| ❑ गायी-म्हशीतील अंडे ओरपणे / निरपणे | ❖ गर्भाशयातील रोगप्रसार थांबविण्यासाठी शास्त्रोक्त उपचारच करावा. |
| ❑ पोटफुगीत किंवा पोळ्याला नाकावाटे जनावरांना तेल पाजणे | ❖ नाकातून तेल पाजल्यास फुप्फूस दाह (न्युमोनिया) होतो किंवा श्वास अडकून मृत्यू ओढवतो म्हणून तेल तोंडावाटेच पाजावे |
| ❑ माजकाळात जनावरास बसू न देणे व चारापाणी न देणे. | ❖ या काळात चारापाणी देणे आवश्यक असते. |
| ❑ जनावर लचकल्यास उलट शेंदणे | ❖ पाय निकामी करणारी ही कृती टाळा व पशुवैद्यकाकडून वेदनाशामक औषधींचे उपाय करा. |
| ❑ तेल औषधी पाजतानाचा ठसका जनावरांची छाती मोकळी करतो. | ❖ ठसका हा श्वसन संस्थेत एखादा पदार्थ गेल्यामुळे होतो. म्हणून ठसका लागणे चांगले नाही. |
| ❑ दूध उलटणे हा गैरसमज | ❖ व्यालेल्या जनावरांच्या गर्भाशयातील पू कमी करणारा औषधोपचार करावा |
| ❑ साथीच्या रोगात प्रतिबंध म्हणून बिबा / रुईच्या चिकाचा पाठीवर ठिपका देणे / शिंगाला चुना लावणे | ❖ रोगप्रतिकारक शक्ती येण्यासाठी वेळोवेळी लसीकरण उपयोगी ठरते. |
| ❑ सर्दी झाल्यास जनावरांच्या नाकात काड्या घालणे (नाकाडी) | ❖ नाकात काड्या घातल्यास जखमा होतात. सर्दीवरील सोपा उपचार करुन घ्यावा. |
| ❑ दूध देणारे जनावर माजावर आले तरी न भरवणे. | ❖ दुधाचे गणित मांडताना पुढील गर्भधारणा प्रसुतीनंतर तिसऱ्या महिन्यात सुरु होणे फायद्याचे ठरते |
| ❑ कुत्रा चावल्यानंतर एखाद्या विशिष्ट - गावातील भाकरी / पाणी / गंडा / औषध जनावरास देणे. | ❖ मृत्यू टाळण्यासाठी कुत्रा चावल्यानंतरची प्रतिबंधक लस महागडी असली तरी देणे हाच उपाय आहे |




योग्य वेळी लसीकरण व उपचार केल्यास मरतुक थांबते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याने दुधालू जनावरांची क्षमता वाढते व फॅटचे प्रमाण सुधारते. बाह्य उपचारांच्या भूलथापांना बळी न पडता विज्ञानाची साथ घेतल्यास आजार लवकर आटोक्यात येतो. तुमच्या गोठ्यात विज्ञानाचा प्रकाश असेल, तरच समृद्धीचे द्वार उघडेल. तंत्रज्ञानाची जोड द्या व आपला व्यवसाय आधुनिक बनवा.

| असे नकोच | याचा विचार कृतीसाठी करा |
|---|---|
| ❑ विताना अडल्यास गावातील वैद्/मोंदूकडून वासरु ओढून काढणे. | ❖ तज्ञ पशुवैद्यकाकडून उपचार करुन वासरु व गायीचे प्राण वाचवा |
| ❑ गाठीच्या भितीमुळे लस न टोचणे | ❖ शरीरावरील गाठ बरी दिसत नसली तरी जनावरांचा प्राणघातक रोगापासून बचाव करण्यासाठी लसीकरण करावेच. |
| ❑ अडकलेल्या जारास चप्पल बांधणे. | ❖ जार गर्भाशयापासून सुटण्यासाठी पशूवैद्यकीय उपाय उपयोगी पडतात |
| ❑ जनावरो उरी भरल्यास पोहणी घालणे/छाती तुडविणे | ❖ पशुवैद्यकांकडून साधा उपचार करावा. |
| ❑ भाकड जनावरे सांभाळणे | ❖ प्राप्त परिस्थितीत पशुपालन खर्चिक असल्यामुळे व्यावसायिकता जपण्यासाठी फक्त दुधाळ व प्रजननशील जनावरेच सांभाळा |
| ❑ जनावरास तिवा घालणे / उतरवणे दही, हळद, भात उतरविणे) | ❖ तीनच दिवसांचा हा आजार आपोआप बरा होतो मात्र या काळात जनावराची प्रकृती खालावणार नाही म्हणून उपचार करावे |
| ❑ गावात वळू / सांड सोडणे | ❖ पशुपालनातील लसीकरण व पैदास या धोरणावर संकट ओढावणारा हा मोकाट प्राणी सोडण्याची प्रथा/रीत अवलंबू नका |
| ❑ दूध खराब निघत असल्यास भानामती/करणी झाली आहे असे समजणे (दगडी कास/कासदाह) | ❖ कासेची स्वच्छता नसल्यामुळे व रोग जंतुच्या प्रादुर्भावाने झालेला हा रोग दूध उत्पादन घटवतो म्हणून शास्त्रीय उपचार आवश्यक. |
| ❑ निकृष्ट पैदास करणे | ❖ जनावरे भरवताना वंशावळीचा विसर पडू न देता शुध्द पैदास अवलंबा. |
| ❑ सर्पदंश झालेल्या ठिकाणी ओबडा लावणे | ❖ वेळ न घालविता योग्य उपचार करावा अन्यथा जनावर दगावते. |
| ❑ दूध येत नसल्यास /सड बंद झाल्यास सडात काड्या / तारा घालणे | ❖ सडात काड्या तारा घालण्यामुळे सडास इजा होते म्हणून पशुवैद्यकाकडून योग्य उपचार करुन घ्यावा. |
| ❑ नैसर्गिक / पारंपारीक पैदास पध्दत अवलंबणे. | ❖ कृत्रिम रेतन पध्दतीचा अवलंब करुन शुद्ध पैदास करा. |
| ❑ कवडी करणे /डोक्यावरचे केस जाणे यातून जनावर गाभण समजणे. | ❖ सहज, सोपी, खात्रीची जनावरांची गर्भधारणा तपासणी निश्चित निदानासाठी करुन घ्यावी. |
| ❑ विचित्र वासराचा जन्माने भानामती/बाहेरची बाधा समजणे. | ❖ विकृत गर्भ निर्मितीची कारणे शोधण्यासाठी पशुवैद्यकास मदत करा. |
| ❑ कृत्रिम रेतनामुळे जनावरे उलटतात असा समज असणे. | ❖ शास्त्रशुध्द तांत्रिक पध्दतीत अजिबात दोष नसतो. जनावरे उलटण्याची कारणे शोधण्यासाठी पशुवैद्यकाचा सल्ला घ्या. |
| ❑ जखमेवर शेण लावणे | ❖ शेणामुळे रोगप्रादुर्भाव होईल तेव्हा जंतुनाशक औषधे वापरा. |
| ❑ उरमोडी झाल्यास जनावरांना डागणे | ❖ खात्रीशीर उपायाने जनावर १५ दिवसांत बरे होते उपायासाठी पशुवैद्यकाची मदत घ्या. |

महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग




नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री



देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

# पशुधन मेळावा

## शासनाचा शुभारंभ
## शेतकऱ्यांच्या समृद्धीचा



पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन आयोजित

१३ - १५ फेब्रुवारी, २०२६

# महा पशुधन एक्स्पो

परळी वैजनाथ

**ओपळे मैदान,**
वैद्यनाथ महाविद्यालयासमोर, अंबाजोगाई रस्ता,
परळी वैजनाथ, जिल्हा - बीड

**१३ - १५ फेब्रुवारी, २०२६**



देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
उप मुख्यमंत्री

सुनेत्रा पवार
उप मुख्यमंत्री

पंकजा मुंडे
मंत्री, पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल